वर्षाचा अगाऊ ५० १ डाक हांशील ०१२
सहामाही " ३ " ०८
सालअखेर " ७ " १०८
किरकोळ अंकास.............................. ०४

नोटीशीब ल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस ..........०१

per annum in advance 5 Postage 13 as
Per annum in arrears 7 ,,1Rs. 8 as
Six monthly............3 " 8 as
Single copy..........................4as

# वऱ्हाडसमाचार.

Advertisements
Below 10 lines...2 Rs
per line over10...4 as
Repetition per line 3as.

THE BERAR SAMACHAR

VOL XXV — AKOLA MONDAY 6 JULY 1891 — NO 26

वर्ष २५ — अकोला सोमवार तारीख ६ माहे जुलै सन १८९१ इ० — अंक २६

## औद्योगिकपरिषद्

किंवा

कारागीर, कारखानदार, व्यापारी व देशांतील उद्योगधंदे वाढविण्याविषयीं इर्ततेपरहर्ते खटपट करणाऱ्या लोकांची सभा.

येत्या आगष्ट महिन्यांत पुणें मुक्कामीं भरणार आहे.

सभेची तारीख, सभेपुढें यावयाचे विषय वगैरे बद्दलची कच्ची माहिती मागाहून कळविण्यांत येईल

सभेसाठीं येऊं इच्छिणार लोकांनीं तारीख १५ जुलईचे आंत खालीं सही करणार यांजकडे आपलीं नांवें कळवावी

पुणें, रेम्यूझिम कचेरी ता. १३ माहे मे १८९१ } महादेव बल्लाळ नामजोशी, देशी कारागिरीस व धंद्यास उत्तेजन देणार मंडळीचे सेक्रेटरी.

## जाहिरात.

एलिचपूर येथें होणारा सर्व प्रकारचा माल कोणास पाहिजे असल्यास आह्मांस कळवावें. माफक कमिशन घेऊन पाठवीत जाऊं. विशेष माहिती करितां टिकीट पाठवा.

जी. डी. कानिटकर
मर्चंट आणि कमिशनर एजंट
शहर एलिचपूर

## सचित्रक्याटलाग.



आर. डी. कानिटकर आणि कंपनी मुंबई गिरगांव ह्याचा नवीन तऱ्हेचा इंग्रजी किंवा मराठी अर्ध्या आण्याचें तिकिट पाठविल्यास मिळेल.

नोटीस.

तिर्यस्वरूप रा. रा. माधोजी वल्लद गंभीरजी कुणबी राहणार बोरगांव वपराळाचे तर्फे अंदुरें तालुके बाळापूर यांस:—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमची मुलगी नामें गोपी ही माझी बायको आहे. व हजश तुमची मुलें नामें गणु व रामु हें माझें मागें माझ्या घरीं येऊन गोपीस काय पाहिजे तें सांगुन तिजला घेऊन गेले व माझें घराचा विनाकारण बिघाड होत आहे. याजकरितां तुम्हांस ही नोटीस देऊन असें कळवितों कीं, माझ्या मागें तुमची दोन्ही मुलें माझें घरीं येऊं नयेत व आल्यास त्यावर मी माझ्या आब्रूबद्दल योग्य कोर्टांत काम चालवून नुकसान भरून घेईन; तर याजबद्दल तुम्ही चांगली खबरदारी ठेवून त्यास चांगलें सांगावें. वे पुन्हा आम्हास त्यांनीं त्रास देऊं नये असें करावें. आतां ही नोटीस पावल्या पासून चार दिवसांत माझें बायकोस घरीं आणून घालावें व माझा कोणत्याही प्रकारचा बिघाड होऊं नये असें करावें. म्हणून दिली नोटीस सही तारीख ३ माहे जुलै सन १८९१ इसवी.

(सही)
श्यामु वल्लद गंभीर कुणबी रहाणार बोरगांव वपराळाचे तर्फे अंदुरें तालुके बाळापूर.

वऱ्हाडसमाचार

मिती ज्येष्ठ वद्य ३० शके १८१३

हिंदुस्थानांतील गिरण्या मधून काम करणाऱ्या मुलांच्या वयाची ईयत्ता सातवें वर्षापासून बारा वर्षें पर्यंत होती त्या ऐवजीं नऊ पासून चौदा अशी नवीन ठरविण्यांत आली आहे. आणि दुसरा असाही ठराव हिंदुस्थान सरकारच्या मंजुरातीनें होणार आहे कीं प्रांताच्या जमाबंदीच्या उत्पन्नांतून फ्याक्टरी कायद्याप्रमाणें इन्स्पेक्टर नेमण्यांत यावें आणि त्यांच्या पगाराची आकारणी प्रत्येक दोनशें मजुरांच्या कामाच्या तपासणीस दहा रुपये दरानें व्हावी व अशा इन्स्पेक्टराचा पगार दरमहा तीस रुपयांहून कमी नसावा. व एकशे चाळीसाहून जास्त नसावा. ही सर्व व्यवस्था चांगली आहे आणि ती अंमलांत लवकर येईल तितकी चांगली होय. रेल्वेकडील कामगारांस फार जबर मजुरी करावी लागते तिकडे आमच्या एका मित्राकडून लिहून आलेल्या दोन आठवड्या पूर्वीच्या लेखाप्रमाणें फ्याक्टरी कायद्यांतील नियमांचें अवलंबन होईल तर फार बरें होईल.

## वऱ्हाडांतील दवाखाने.

गतसालच्या वऱ्हाडांतील दवाखान्यांची हकीकत प्रसिद्ध झाली आहे तीवरून समजतें कीं, वऱ्हाडांत साही जिल्हे मिळून एकंदर ४४ दवाखाने आहेत लोकसंख्येच्या मानानें सरासरी साठ हजार लोकांमागें एक दवाखाना पडतो. ह्या दवाखान्यांतून २,७७,२७० लोकांनीं औषधें घेतलीं त्यांपैकीं ३०७५ लोकांनीं दवाखान्यांत राहून आपले आजाराचे दिवस घालविले. सरकारानें अनारी लोकांस दवाखान्यांतच रहाण्याची सोय करून ठेविली आहे तिचा उपयोग लोक करून घेत नाहींत ही तक्रार खरी आहे. परंतु लोकांच्या सोईकडें विशेष नजर दिल्यास व त्यांच्या धर्मांतील अटीप्रमाणें त्यांची सोय झाल्यास हल्लींपेक्षां अधिक लोक सरकारच्या दयेचा उपयोग करून घेतील व भिकारी लोकांनाच अजारीपणाचें ढोंग करून ह्या संस्थेचा उपयोग करूं घेतां न येऊं देण्याबद्दल विशेष खबरदारी ठेवावी लागणार नाहीं. शिवाय औषधें किंवा इतर सोयी यांचा उपयोग फुकट करून घेणें न आवडणारांस दवाखान्यासच जोडून खासगी रीतीनें व्यवस्था होण्या जागीं कांहीं घरें बांधल्यास फार हितावह होणार आहे. परंतु अशी व्यवस्था लोकांच्या औदार्यानेंच व्हावी अशी मे. कमिशनर साहेबांची इच्छा आहे. सरकारानें उदाहरण घालून देण्यासाठीं पिशवीचें तोंड अगोदर खुलें केल्या खेरीज लोकांकडून अशा गोष्टी होण्याची आशा धरणें व्यर्थ आहे.

सरकारांतून ८२,८४१ रुपये गतसालीं खर्चीं पडले. व सर्व खात्याला १,०८,१२७ रुपये खर्च लागला ह्मणजे २५,२८६ रुपयांची मदत लोकांकडून मिळाली. रेसिडेंट साहेबांनीं सरकारांस सर्व रकमेचा तिसरा हिस्सा खर्च करावा लागतो ह्याबद्दल, आपली नाखुशी दाखविली आहे. व धर्मार्थ दवाखान्यांसारख्या बहुतेक लोकांच्या औदार्यावर अवलंबून असणाऱ्या संस्थांबद्दल हिंदुस्थानांतील इतर प्रांतापेक्षां ह्या प्रांतिक सरकारास फार खर्च येतो असें कांहीं आंकडे मोडकरून सिद्ध करून दाखविलें आहे. बंगाल, मध्यभाग इत्यादि प्रांतांत ह्या खात्याबद्दल होत असलेला खर्च व एकंदर जमा हे आंकडे देतांना त्या त्या प्रांतांतील लोकसंख्या दिली असती तर आसाहेबांस आपलें ह्मणणें कदाचित् परत घ्यावें लागतें. कारण, बेंगालांतील ७,०९,०९,००० लोक जर दवाखान्याकडे ४,११,६२८ सच रुपये खर्चीं घालूं शकतात तर वऱ्हाडांतील १,८९,६,००० लोकांनीं दिलेले २५,२८६ रुपये कोणत्या अधारावर कमी म्हणतां येतील. ह्या खात्यांत जर सरकारास फाजील खर्च येत असेल तर त्याची जबाबदारी सरकारावरच विशेष आहे. जर वऱ्हाडांतील सर्वच खात्याचा खर्च नबाबी थाटावर आहे तर ह्याच खात्यावर इतराजी होणें रास्त नाहीं. लोकांकडून योग्य मदतीपेक्षां अधिक मिळविण्यापेक्षां निरर्थक होत असलेला खर्च कमी करण्याचा प्रयत्न हितावह होणार नाहीं काय? वऱ्हाडांत सहा युरोपियन डाक्तरांची काय अवश्यकता आहे हें आम्हांस तरी समजत नाहीं. फक्त जरूरच असेल तर उमरावती व येथें दोन युरोपियन ठेवून बाकीचे ठिकाणीं अनुभविक व हुशार अशा एल्. एम्. आणि एस् नेटिव्हांची नेमणूक होईल तर पगाराबद्दल द्याव्या लागणाऱ्या रकमेंत पंधरा किंवा वीस हजाराची बचेत सहज होणार आहे. उम्या, वर्षांत दिखली सारख्या छोटेखानी गांवांतील दवाखान्यांत १४ व उमरावतींतील धर्मार्थ दवाखान्यांत ९ शस्त्र क्रियेचे प्रयोग व्हावे व तेही हिंदु डाक्तरांकडून व अकोला इलिचपूर सारख्या मोठ्या इस्पितळांत दोनही प्रयोग होण्याची मारामार पडावी! असो. ह्या वर्षीं १४२० रुपये वर्गणीनें ह्या खात्यांस मिळाले. साहेब लोकांकडून एकही छदाम अशा कृत्यांस मिळूं नये ह्यांत त्यांच्या खऱ्या औदार्याची परीक्षा सहज होते.

थोरले सर सालरजंग जीवंत असतांना म्हणजे सरासरी दहा वर्षां पूर्वीं वऱ्हाड प्रांतांची निजाम सरकारानें इंग्रज सरकारापाशीं परत मागणी केली होती. या प्रांतास मुलूख अमानी हैदराबाद हें नांव सरकारी दफ्तरांतून चालत आहे एवढ्यानेंच यावरील स्वामित्व एकाचें असून तो परक्याच्या ताब्यांत असावा असें सहजीं कळून येतें निजाम सरकारनें आपले पदरीं इंग्रजी लष्कर स्वसंस्थान रक्षणार्थ ठेवावें असें ठरलें त्या वेळीं या खर्चानिमित्त वऱ्हाड प्रांत निश्चितकाल पर्यंत इंग्रजाच्या ताब्यांत आला ह्या प्रांताचे सांप्रत काळीं सर्वमान्य प्रभु इंग्रज खरें तरी दरसाल प्रांतिक जमा खर्चाचा हिशोब करून शिल्लक जमा निजाम सरकारच्या तिजोरींत पोंहचत असते ह्या वरून निजाम सरकारचा या प्रांतांवरील हक्क अद्याप इंग्रज सरकारांस मान्य आहे असें उघडपणें म्हणण्यास कांहीं प्रत्यवाय दिसत नाहीं ह्या स्वामित्वाच्या हक्का बरहुकूम व तहाचे कलमान्वयें माजी दिवाण सालरजंग याचे मार्फत वऱ्हाड प्रांताची परत मागणी झाली होती हें सर्व श्रुत आहेच. परंतु हा प्रांत परत करावा किंवा न करावा या संबंधानें पार्लमेंटमध्येंही प्रश्न निघाला होता. परंतु हल्लींचे खुद्द तख्ताधीश निजाम सरकार अल्पवयस्क अहित ते अप्रत्या वयांत येऊन गादीवर बसे पर्यंत या प्रश्नाचा विचार नीट करितां येणार नाहीं या आशयाचा स्टेट सेक्रेटरीकडून झोंकदार उलट जबाब मिळाला. आतां ह्या गोष्टीस पुष्कळ वर्षें लोटलीं व तोच प्रश्न पुन्हां पार्लमेंट मध्यें काढण्याची योग्य वेळ ही टळून बराच काल लोटला तरी या संबंधीं दुसऱ्यानें प्रश्न आज तागाईत निघाला नाहीं व आणखी बरींच वर्षें निघेल असा संभवही फार विरळा. असले प्रकारच्या महत्वाचे बाबींत व्यक्त असलेल्या बेसावधपणाचें व मौनाचें कारण बहुतकरून असें असावें कीं दिवाण सर सालरजंगचे मागें हैद्राबादचे राज्यांत त्यांचे तोडीचा धिम्मा, खोलबुद्धीचा, दूरदर्शी व हातीं घेतलेलें काम तडीस नेण्यास नेटानें श्रम करणारा असा खरा स्वामिभक्त व स्वदेशाभिमानी राजकार्य धुरंधर पुरुष निजाम खाविंदाचे पदरीं आज मितिस झाला नसावा व दुसरें कीं खुद्द निजाम खाविंद वयानें, व अनुभवानें पोक्त स्थितीस अद्याप पोंचले नस-

ल्यामुळें त्यांस परक्यांच्या तोंडून पाणी पिण्याची पाळी येत असावी.

इंग्रजी फौजेच्या खर्चानिमित्त तुंबलेल्या कर्जाची फेड कधींच होऊन चुकली तरी व-ऱ्हाड प्रातांत इंग्रजी अंमल बहाल आहेच. इतकेंच नव्हे तर खालसा झालेल्या मुलुखांतील अमलाहून कांकणभर जास्त कडक अंमल गाजत आहे असें कित्येक चार मुलुखभर हिंडल्या फिरलेल्या अनुभवशीर गृहस्थांच्या म्हणण्यांत ऐकूं येतें. जमाबंदी, निशी न्याय मुनसबी इत्यादि सर्व अधिकारासहित पूर्णपणें ताब्यांत असलेल्या सुपीक वऱ्हाड प्रांतांची परत मागणी होण्या पूर्वी व ती महत्प्रयासानें व जोरदार रीतीनें परत देण्यास भाग पाडण्यास युक्ति प्रयुक्ति लढविण्याचा प्रसंग येण्या पूर्वींच आमचे सरकार आपण होऊन स्वसंतोषानें व इतके दिवसांच्या सुखोपभोगा कारणें कृतज्ञापूर्वक निजाम सरकारास हा प्रांत परत करतील अशी आशा बाळगणें म्हणजे मनोराज्या प्रमाणें वृथा आहे. आमच्या सरकारचे हातून परत मागणीचा प्रश्न कालवशात् निघाला तर त्याचा शांतपणें न्यायास धरून विचार झाला म्हणजेच महद्भाग्य समजावयाचें.

वऱ्हाड प्रांत निजाम सरकारास परत मिळाला कीं पूर्ववत् मोंगलाई चालेल, जीवित्व व मालमत्ता यांचें स्थैर्यास धक्का पोंहचेल अन्याय, जुलूम ज्ञान विस्ताराचा लोप व स्वविचार स्वातंत्र्याचा अपहार इत्यादि घोर विघ्नें झोटिंगशाईमुळें लोकांवर येऊन बेतील अशी इंग्रजींत रुळलेल्या व सुखावलेल्या कोमल मनांच्या व ढिसूळ हृदयांच्या लोकांस दहशत पडते. उलटपक्षीं कांहीं जणांस वतनदार, जमेदार वगैरे मंडळीस आपापल्या परगण्यांचे आपणांस जुने हक्क प्राप्त होतील, आपले लोकांस आश्रय अधिकाधिक मिळेल, युरोपियन अमलदारांच्या जागेचा जंगी खर्च कमी होत गेल्यानें चांगली काटकसर होऊन प्रजेस अधिक सुख होईल, जमिनीचा सारा अतोनात वाढणार नाहीं, व रयतेस पीक नापीक होईल त्या मानानें सूट मिळत जाईल वगैरे अनेक फायदे प्राप्त होतील हें उघड आहे. ह्या दोन्ही प्रकारचे म्हणण्यांत प्रत्येकीं अंशतः तथ्य आहे तरी हा प्रश्न आमच्या निजामसरकारच्या अंमलाखालीं राहण्याच्या खुषी नाखुषी संबंधानें होय. आणि जों पर्यंत प्रजेस आपला राजा नको असें म्हणण्याचा अधिकार हिंदुस्थानांत पोंचत नाहीं तों पर्यंत आपणास आवडो अगर न आवडो त्या संबंधीं ब्र काढूंनये इतकेंच नव्हे तर त्याचा विचारही मनांत कधीं आणूंनये. परंतु हें उघड आहे कीं या प्रश्नाचा हा प्रांत परत करण्याच्या निवाड्यांशी कांहींच संबंध नाहीं करितां सदहू प्रश्नांत रास्त गोष्ट दिसेल ती सरकारास मान्य करावयास लावणें हें कर्तव्यकर्म प्रथम झालें पाहिजे.

इंग्रज सरकारच्या अभिप्रायास वऱ्हाड प्रांत परत करण्याची गोष्ट रुचणें दुरापास्त आहे तरी असली गोष्ट असाध्य आहे अशी आमची समजूत नाहीं. वऱ्हाड प्रांतासारखा सामान्य व सुधारणेंत मांगसलेला मुलूख आपले जिम्मती घेऊन त्यास सुधारणेच्या सुमार्गास लावून व विद्या व वित्त यांनीं अधिकाधिक भूषीत करून ज्याचा त्यास परत केला अशी कीर्ति संपादण्यांत आमच्या सरकारास बरेंच पुण्य येतें. या सारखें शुद्धाचरणाचें जाज्वल्य पुण्य इंग्रजी इतिहासांत आज पर्यंत नमूद नाहीं. परंतु ह्या श्रेष्टत्वाची आवड कितपत आहे या विषयीं मणिपूर, खंबायत, काश्मीर, बडोदा इत्यादि संस्थानच्या हकिकती वरून स्पष्ट दिसून येते. वऱ्हाड प्रांत पुढें मागें निजाम सरकारास परत मिळाला तर त्यांच्या विस्तृत व बलाढ्य राज्यांतील सर्व प्रांतांसमोर आमच्या प्रांतांतील सुव्यवस्थेचा कित्ता रात्रंदिवस उभा राहील. अन्याय, जुलूम वगैरे मोंगलाईंतील प्रकार चांगल्याच्या संसर्गानें नाहींसे होतील. व सुधारलेल्या प्रांताशीं स्पर्धा सुरू झाल्यानें निजाम सरकारच्या बाकीच्या संस्थानास उन्नत स्थिती प्राप्त होईल आणि एकंदरीनें हैदराबाद संस्थांचें वैभव वृद्धिंगत पावेल.

सारांश, वऱ्हाड प्रांत मिळेल किंवा नाहीं या संबंधानें एकदांचा पक्का निर्णय होणें आम्हास फार हितावह आहे. नेटिव संस्थानें इंग्रजी राज्याच्या मजबूतीचे आधारस्तंभ आहेत हा प्रांत ही त्या आधारस्तंभांत मोडला जावा हें कोणा राजभक्तास वाटणार नाहीं बरें! बाकीचा खालसा मुलूख ब्रिटिश राज्याच्या तिजोरीला भर टाकण्याकडे अखेर वहिवाटला जातो असें अनुभवास आलें म्हणून हा प्रांत थोडा बहुत नेटिव लोकांच्याच पीत्यर्थ खर्ची पडला तर त्यांस विशेष आनंद मानण्या जोगें आहे. बेबंदी किंवा झोटिंगशाई याचा प्रादुर्भाव नेटिव संस्थानांतून होण्या पूर्वी किती लढाया होतात व रक्तपात होतो याची अटकळ नेटिव संस्थानांतील राज्यव्यवस्थेवर पोलिटिकल एजंट रेसिडेंट वगैरे विपुल अधिकार संपन्न अशा राजप्रतिनिधि अंमलदारांच्या जबरदस्त पैरवी दक्षते खालीं किती राजेरजवाड्यांच्या हक्कांची पायमल्ली होते किंवा किती संस्थानें मावळतात याचा विचार केला म्हणजे सहजी होण्या सारखी आहे तेव्हां वऱ्हाड प्रांत परत मिळाल्यास या प्रांतांतील चांगली राज्यव्यवस्था विलयास जाऊन आलें नुकसान होईल अशी भिति बाळगण्याचें कांहीं कारण दिसत नाहीं. त्या अर्थी वऱ्हाड प्रांताची परत मागणी निजाम सरकारनीं सर सालरजंगांच्या मागणीस अनुसरून पुन्हा करण्यास विलंब करूं नये असें आम्ही सूचवितों.

येत्या हिंवाळ्याच्या सफरींत आपल्या नगरास येण्याविषयीं व्हाइसराय साहेबांस निजाम सरकारनें प्रेमपूर्वक आमंत्रण केलें त्याचा स्वीकार लाट साहेबांनीं मोठ्या आनंदानें केला. ह्या भेटीच्या आनंदोत्सवांत लक्षावधि रुपयांचा वृथा चुराडा होईल म्हणून आम्हांस एवढेंच सुचवावयाचें कीं पाहुणचारानिमित्त आवश्यक खर्चा खेरीज विनाकारण उधळपट्टी होऊं नये. नाहींतर मुलांचा खेळ होतो पण बेडुकांचा जीव जातो ह्या प्रमाणे बडे पाहुणे जमतात व प्रजेची नागवणूक होते. व्हाइसराय साहेबांच्या सलोख्याच्या भेटी राजेरजवाड्यांतून वारंवार होत जाव्या असें आम्ही मना पासून इच्छितों कां कीं तेणें करून प्रेमभाव उत्पन्न होऊन लोभवृद्धि होईल व नेटीव संस्थानें चिरायु होतील तरी प्रजारूपी कामधेनूचें सौम्य रीतीनें दोहन झाल्यानें दूध विपुल व चिरकाल मिळेल असें राजेरजवाड्यांनीं धोरण ठेविलें पाहिजे.

निजाम सरकारच्या रेलवेच्या म्यानेजराकडून मद्रास व मुंबई कडील मिठावरील भाड्याचे दर सारखे करण्यांत आले आहेत त्या वरून बहुत करून मच्छलीपट्टण कडील मिठाचा व्यापार हैदराबाद संस्थानांत चांगला वाढेल असें वाटतें.

---

हैदराबाद येथील 'शौकतुल इस्लाम' नामक उर्दू पत्राच्या कर्त्यानें मेहदी अलीच्या वर्तमानपत्रावरील कडक सरक्यूलराचा अव्हेर केल्यामुळें तें पत्र बंद करण्यांत आलें आहे आणि तेथील दुसरें पत्र 'सफरी डेक्कन' नामक पत्रांत हैदराबादच्या राज्यव्यवस्थेवर कडक टीका आल्या कारणानें रेसिडेंट मार्फत तें पत्र बंद करण्याची व्यवस्था चालली आहे. वर्तमानपत्राचे असे हाल व अवस्था पाहून स्वतंत्रतेच्या शिखरास पोंचलेल्या राष्ट्रांतील लोकांमध्यें फार चळवळ होऊन तावडतोब सरकारांतून योग्य व्यवस्था झाली असती, परंतु त्या गोष्टी इंडियांतील लोकांनीं अनेक प्रकारें विसरल्या पाहिजेत. शिवाय अशा प्रकारच्या अविहित कृत्यांस भर पाडण्यास सरकारांतून नेटीव संस्थानांतील वर्तमानपत्रा संबंधानें फार कडक कायदा निघाला आहे. त्या कायद्या प्रमाणें पोलिटिकल एजंटास वर्तमानपत्रांच्या शासनाचा अधिकार पोंचतो. त्यांचें अस्तित्व चालूं ठेवणें किंवा बंद ठेवणें पोलिटिकल अधिकाऱ्यांच्या खुषीवर नेमस्त केलें आहे. या कायद्याच्या स्वरूपा विषयीं सर्वत्र चर्चा चालली आहे तेव्हां त्या पासून कांहीं चांगलें निष्पन्न होईल या आशेवर स्वस्थ राहणें भाग आहे.

---

बुलढाण्याचे मि. फारेस्ट कान्सरव्हेटर मि. विटनबेकर यांनीं लोकांपासून पैसा वसूल करून खजिन्यांत पाठविला नाहीं म्हणून त्याजवर आरोप येऊन त्याची प्राथमिक चौकशी येथील डेपुटी कमिशनर साहेबांपुढें चालूं होती हें आमच्या वाचकांस माहीतच आहे. सदहू चौकशी वरून त्याचा आरोप शाबीत होण्यासारखा मुकदमा आहे असें मे. डे. क. साहेबास वाटल्यावरून तो मुकदमा त्यांनीं मुंबई हायकोर्टांत चौकशी करितां पाठविला आहे. मुंबईस हा मुकद्दमा जाण्याचें कारण एवढेंच कीं सदहू आरोपी युरोपियन आहेत व त्यांना इकडे योग्य शिक्षा देणें कठिण आहे. हल्लीं हा मुकदमा मि. ज. क्यारन साहेबांपुढें चालूं आहे सरकार तर्फे मि. जॉर्डन साहेब काम करित आहेत. व आरोपी तर्फे मुंबईचे प्रसिद्ध ब्यारिस्टर मि. इनव्हेर्यारिटी आहेत. खटल्यासंबंधीं माहिती करून देण्या करितां मि. निकोलेट साहेब तेथें गेले आहेत. क. स्प्यान्सकी साहेब, डा. लिटल साहेब वगैरे मंडळीही तेथें गेली आहेत. त्या शिवाय सुमारे ३०० साक्षिदार आज ६ दिवस झाले तेथें गेले. सर्व साक्षिदार लोकांची एका धर्मशाळेंत उतरण्याची व जेवण्याची सोय केली आहे. साक्षिदार लोकांस जेवण शिवाय एक रुपया रोज भत्ता मिळत असतो. सरकार तर्फे ब्यारिस्टरानें प्रथम तक्रार केली होती कीं ह्या मुकद्दम्यांत साक्षिदार पुष्कळ आहेत व त्यांच्या येण्या जाण्याबद्दल बराच खर्च पडेल तर वऱ्हाडांत त्यांच्या साक्षी कमिशन मार्फत व्हाव्यात व आरोपीचे उलट तपासणी करितां मात्र कांहीं थोडेसें साक्षिदार हजर करावेत. व ह्यावरून हा मुकदमा पुढचे सेशनवर टाकावा. परंतु आरोपी ब्यारिस्टरानें यात हरकत घेतल्यावरून सर्व साक्षीदार तेथें गेले आहेत. व सर्वांच्या जबान्या तेथेंच व्हाव्यात असें ठरलें आहे.

एकंदर हजार बाराशें रुपयांची अफरातफर व त्या करितां निदान १०००० दहा हजार रुपये तरी खर्च होतील असा अदमास दिसतो आहे. बरें इतकेंही होऊन मुकदमा शाबीत झाला म्हणजे बरेंच नाहीं तर एकात्र ठिकाणीं दहा हजार खर्ची मांडावे लागतील व शिवाय सर्व लोकांचा त्रास व खटपट व्याजांत जाईल.

---

गेल्या रविवारीं नागपुरास राष्ट्रीय सभेच्या रिसेपशन कमिटीची सभा भरली होती उमरावतीहून मि. रंगराव मुधोळकर व अकोल्याहून रा. सा. देवराव विनायक, मि. शंकर गोविंद, मि. जयकृष्ण बगाजी व मि. पडुरंग बापूजी ही मंडळी गेली होती मि. नारायण स्वामी वकील यांस रिसेपशन कमिटीचे अध्यक्ष व मि. कृष्णाजी गोविंद देशपांडे बी. ए. वकील यास सेक्रेटरी नेमलें. मि० ब्राडला यांच्या स्मारका करितां मध्य प्रांतानें १०००रुपये व वऱ्हाडानें ५०० रुपये द्यावे असेंही ठरलें.

---

# The Berar Samachar

**MONDAY, JULY 6, 1891**

'Hyderabad Chloroform Commission' is a name hardly familiar to many of our readers. Occasionally there were notices of its proceedings in newspapers for the last two years, but we are not aware whether many have understood something more that what the title itself signifies. This Commission was instituted under the auspices and patronage of His Highness the Nizam. Doctors of eminent abilities and vast experience were elected to form Commission Dr. Brunton was invited from England to presideat the Commission and was rewarded with a liberal remuneration for his able services. Last Monday there was a lecture in grant Medical College of Bombay delivered by Dr. Laurie one of the doctors of that Commission. Before an assembly of professional experts with a sprinkling of many other gentlemen Dr. Lawrie formally declared the conclusions which the Commission has arrived at after continuous sittings and experients for more than two years.

Dr. Lawrie began his lecture with a reference to H. H. the Nizam. His Highness is the best sort of a ruler he ever had seen. It is a significant tendency of the present times that native Princes are making a rapid stride in the amelioration of their ryots by bestowing education, higher as well as lower, in colleges and schools of their own foundation. H. H. the Holkar has lately opened an Arts' college with a technical institution added to it. There is already one at the capital town of the Nizam's dominions. H. H. the Scinde will, it is understood, shortly institute a college for his provinces. It is then no wonder if princes of such enlightened views take to their heart to patronize works of scientific advancement and public utility. The Nizam has certainly acted upon good principles

in appointing the 'Hyderabad Chloroform Commission' and has won the approval of the India Government which contributed a large sum towards the expenses of the Commission.

We have not space enough to give a full report of that lecture but we shall close this with a quotation which summarizes the conclusions to which that Commission has come. Though it is of vital importance to men of the medical branch still it is advantageous to those of other professions to know the nature and qualities of Chloroform which is a patent factor the English pharmacoea:—

"Dr. Bomford suggested that we should give chloroform and then stop the heart by eletrical irritation of the vagus nerve and we found that, so far from being a danger under chloroform, stopping the heart actually proved to be a safeguard against poisoning by showing the circulation and delaying the conveyance of chloreformed blood to the brain and spirial chord. We were able to prove that the sudden and capricious falls of blood pressure under chloroform are due to inhibition and stoppage of the heart from stimulation of the vagus nerve from abnormal respiration or overdosing, and are as much a safeguard against poisoning with chloroform as I have just shown that the inhibition caused by electrical stimulation of that nerve is. In the third phase of the Commission's labours it was distinctly proved that uniform results can always be obtained with chloroform, provided it is sufficiently diluted to allow of regular normal breathing throughout the whole administration. As long as these conditions are fulfilled the fall of the blood pressure is regular and the hearts actions and the pulse are invariably reguler also... The pulse can never be any test whatever. It is only a taste of irregular breathing and overdosing; and it is therefore no less dangerous than useless to take it as a guide."

---

Here is a nice definition of work an sport which is worth notice:—

"Work: that activity of mind or body which exhausts the vital forces without yielding pleasure or health to the individual. Sport: that activity of mind or body which, in exhausting the vital forces, yields pleasure and health to the individual. The activity, however severe, of a bornartist at his easel, of a born poet at hisrhymings, of a born carpenter at his plane is sport. The activity, however slight, of a born artist or poet at the merchant's desk is work. Hence to work is not to play far from it."

---

No nomination in the Judicial line could have afforded us so entire a satisfaction as that of Mr. Mahommad Yassinkhan. We cannot but adequately appreciate the fitness and propriety of the selection of merit, which the Hyderabad Government has so admirably found its way to make in the recent appointment of our good and much esteemed friend Mr Mahommad Yassinkhan as a Judge of the Hyderabad High Court. The Hyderabad Government could scarcely have found a worthier successor to the late Mr. Sherifal Hussan to honour the Bench. Mr Mahommad Yassin khan has already gained great renown and popularity in Berar.

Noble, upright and throughly conscientious as he is, his straightforward dealing has done much good to Berar and has consequently been greatly admired. He has been put to test many times and has been found to stand them all to our satisfaction. He has been hitherto appointed to many important, high and responsible posts and has acquitted himself of them all with much credit and applause. His long roll of services which Berar could hardly spare has been much interesting in so far it vividly teaches the ways and means which every government officer ought to take care to use to adapt his conduct and character to the best interests of the Rayyat. Wherever he served in Berar he left traces of a pure, noble and simple heart and a frank, kind and sincere disposition. His sincerity of purpose and deep and accute sense of Duty have althrough been triumphant. His indefatigable zeal in administering justice impartially and equally to all has been evinced by his persistent efforts in taking a lively interest in the welfare of all high or low rich or poor. Equipped, then, with such an excellent array of rare, noble and distinct qualities he has, in reality equal claims to be universally honored and respected with one who might strive to make up for deficiency in these qualities by excellence in other respects.

---

In exercise of the powers conferred by section 6 of the Foreign Jurisdiction and Extradition Act, XXI of 1879, the Governor General in Council is pleased to appoint the undermentioned officers to be justices of the Peace in the Hyderabad Assigned Districts:

Mr. R. MacGill, Mr. E. Marshall, Mr. J. O'Grady. G. of I.

---

## HYDERABAD RESIDENCY ORDERS, JULY 1, 1891.

His Excellency the Viceroy and Governor General is pleased to confer upon Khan Bahadur Salamullakhan, Jagirdar of Deulghat in the Buldana District of the Hyderabad Assigned Districts, the title of Nawab as a personal distinction.

His Excellency the Viceroy and Governor General is pleased to confer the title of Shamsul-ulama as a personal distinction upon.

Saiyid Ali Bilgrami, Inspector General of Mines, Hyderabad, Deccan.

Mr. C. E. Biddulph, late Assistant Superintendent, Sind Revenue Survey, is appointed to be an Assistant Commissioner of the 3rd class in the Hyderabad Assigned Districts, with effect from the 25th February 1891.

Mr. Biddulph is granted extraordinary leave without allowances, under article 372 of the Civil Service Regulations, with effect from the same date, and until such time as he may assume charge of his duties, or till further orders.

Cousequent on the retirement of Captain C. W. Losack, Deputy Conservator of Forests, 1st grade, the following permanent and temporary promotions are ordered with effect from the 22nd March 1891:—

Mr. J. Ballantine, Deputy Conservator, 4th grade, in Berar on deputation to the Nizam's Government, to be Deputy Conservator, 3rd grade (seconded).

Mr. G. F. Taylor, Deputy Conservator, 4th grade, sub *protem*, in Berar, to officiate as Deputy Conservator, 3rd grade.

Under the authority conferred on him in Foreign Department letter No. 1515 G, dated the 18th of September 1890, the Resident is pleased to appoint Mr. Shapurji Virji, a Tehsildar of the 3rd grade, to officiate temporarily as an E. A. C. of the 5th class, with effect from the date of assuming charge and until further orders.

Mr. Shapurji is posted to Ellichpur.

Mr. H. J. Cotgrave will, on return from furlough, take charge of the Basim District Police, *vice* Mr. H. A. Heath, proceeding on leave.

Mr. H. A. Heath, District Superintendent of Police of the Basim District, has been granted leave on private affairs for six months with effect from the 9th June 1891.

Mr. H. S. Nicholetts, Deputy Commissioner of the Akola District has been granted privilege leave for three months, with effect from the 15th July 1891, or the subsequent date on which he may avail himself of it

*Residency orders* Notification No. 175, dated the 24th June 1891, granting three months' privilege leave to Mr. H. S. Nicholetts, Deputy Commissioner of the Akola District, is hereby cancelled.

Under section 12 of the Code of Criminal Procedure (Act X of 1882) as applied to the Hyderabad Assigned Districts, the Resident is pleased to appoint Mr. Govind Naik, Honorary Attache in the Amraoti District, to be a Magistrate of the 2nd class in the Hyderabad Assigned Districts, and under section 32 of the same Code to invest him with power to pass sentences of whipping.

Mr. Munsukh Rai, Sub Assistant Conservator of Forests and District Forest officer, Wun District, is granted privilege leave for three months with effect from the 25th July 1891, or the subsequent date on which he may avail himself of it.

Narayan Krishna Kulkarni is appointed as a member of the Daryapur Dispensary Committee, *vice* Ganesh Narayen Deshpanday *deceased*.

The one month's privilege leave granted to Mr. Shapurji Virji Tahsildar of Daryapur in *Residency Orders* Notification No. 168, dated the 15 th June 1891, is extended by a further period of two weeks.

Under section 32 of the Code of Criminal Procedure (Act X of 1882) as applied to the Hyderabad Assigned Districts, the Resident is pleased to invest Mr. R. A. Simpson, a Magistrate of the 2nd Class, with power to pass sentences of whipping.

---

पोंचः—'महाराष्ट्र कोकिळ' नांवाचे मासिक पुस्तकाचा पहिला अंक त्याच्या कर्त्याकडून आम्हांकडे आला आहे त्याचा आम्ही आभारपूर्वक स्वीकार करितों.

---

## वऱ्हाड.

हवामानः—गेल्या आठवड्यांत आकाश आभ्राच्छादित असून पाउसाची बुरबुर पडत होती. शनवार सायंकाळ पासून तों रविवारीं तीन वाजेपर्यंत पाऊसानें बहार करून सांडव्यामुळें पेरण्याही जारीनें सुरू आहेत. मेघराजाच्या कृपेमुळें सर्व लोकांस फार आनंद झाला आहे. रोगराई कांहीं नाहीं.

मि० आर. म्यागिल, मि० इ० मार्शल, व मि० जे० ओग्रेडी यांना वऱ्हाडांत जस्टिस् आफ् दि पीस नेमिलें.

मि. यासीनखान हैद्राबादेस जाणार सबब त्यांचे जागेवर मि. विश्वनाथ नारायण दांडेकर यांची नेमणूक झाली आहे व त्याप्रमाणें ते येथें गेल्या आठवड्यांत आले आहेत. मि. निकालेट साहेब दि. क. मुंबईहून परत आल्याशिवाय मि. यासीनखान हे मि. दांडेकर यांस चार्ज देऊं शकत नाहींत असें समजतें.

मि. अयोध्या प्रसाद ए० अ० क० यांस उमरावतीस नेमलें व त्यांच्या पुसदच्या जागीं मि. शामराव यांची नेमणूक झाली आहे.

यवतमाळ, दारव्हा, वणी व मंगरुळपीर येथील तहशीलदारांकडे आज पर्यंत रेजिस्ट्रेशनचे काम होतें ही व्यवस्था मोडून सदहु ठिकाणीं सबरजिस्ट्रार नेमण्यांत आले आहेत. यवतमाळ येथें मि० प्रभाकर वासुदेव, दारव्हा येथें मि० भिकाजी रामचंद्र, वणी येथें मि० नारायण व्यंकटेश व मंगरुळपीर येथें मि० हरी नारायण यांस सबरजिस्ट्रार नेमलें आहे असें कळतें.

रा० रा० विष्णु हरी कायमचे तहशिलदार झाल्यामुळें रेजिस्ट्रेशन खात्याची हे० क्का० ची जागा रिकामी झाली तेंव्हा त्याच आफिसचे स० क्का० रा० रा० गोपाळराव माणकीकर यांची कायमची नेमणूक झाली. हे आपल्या कामांत चांगले हुषार आहेत. रा० रा० विष्णुपंत तहशिलीचे कामावर गेल्या दिवसापासून रा० रा० गोपाळराव हेच हे० क्का० चे काम करीत होते व त्यांचें काम त्यांचे वरिष्टांना पसंत पडल्यामुळेंच त्यांना ही योग्य बढती मिळाली आहे.

मि० एदलजी संजाना ए० अ० क० हे आजपर्यंत तीन दिवस उमरावती स्मा० का० को० चें व तीन दिवस बडनेरा स्मा० का० को० चे काम पहात होते; पण आतां पुढें अशी व्यवस्था झाल्याचें कळतें कीं, त्यांनीं एक आठवडा उमरावती येथील स्मा० का० को० चें व एक आठवडा बडनेरा स्मा० का० को० चें काम करावें.

तारीख १ माहे जुलई सन १८९१

इसवीचे रेसिडेन्सी आर्डरवरूनः—

देऊळघाट येथील जाहागीरदार खानबहादूर सलामुल्लाखान याना "नबाब" हा किताब मिळाला.

हैद्राबाद येथील खाणीचे इन्स्पेक्टर जनरल मि. सय्यद अली बिलग्रामी यांना "शमसुलउल्मा" हा किताब मिळाला.

मि० सी० इ० बिडल्फ सिंध रेव्हिन्यु सर्वेतील आ० सु. यांना तारीख २५ फेब्रुवारी १८९१ पासून वऱ्हाडांत तिसरा वर्ग अ० कमिशनर नेमले. व त्याच तारखे पासून कामावर रुजुं होई पावेतों बिन पगारी रजा दिली.

क्या० सी डब्ल्यु० लोझ्याक डे० का० ऑफ फारेस्ट यांनीं पेनशन घेतल्यामुळें मि० जे० ब्यालंटाईन यांना थर्डग्रेड डे० का० नेमले व ते निजाम सरकाराकडे आहेत तों पावेतों मि० जी० एफ० टेलर यांना ऑफिशिएटिंग थर्डग्रेड डे० कान्सरव्हेटर नेमले.

मि. शापूरजी वीरजी दर्यापूर एथील तहशिलदार यांना एलिचपूर येथें तूर्त आफिशिएटिंग पांचवें दर्जाचे ए० अ० कमि० नेमले.

मि० एच ए० हीथ पो० सु० वाशीम यांना खाजगी कामा करितां ६ महिन्याची रजा मिळाली. त्यांचे जागचा चार्ज मि० एच० जे० कॉटग्रेव्ह हे रजेवरून परत आल्यावर घेतील.

मि० एच० एस निकोलेट साहेब डे० कमि० यांना १५ जुलई अगर ते घेतील त्या दिवसांपासून ३ महिन्याची रजा मिळाली होती परंतु ती रद्द केली आहे.

मि. गोविंद नाईक आ. अट्याची याना दुसरा वर्ग माजिस्ट्रेटचा व फटके मारण्याचा असे अधिकार दिले.

मि. मनसुकराय सब आ. का. आफ फारेस्ट वणी यांना तीन महिन्याची हक्काची रजा मिळाली.

मयत गणेश नारायण देशपांडे यांचे जागीं रा. रा. नारायण कृष्ण कुळकर्णी याना दर्यापूर डिस्पेन्सरी कमेटीचे मेंबर नेमलें.

मि ० शापूरजी विरजी तहशीलदार यांची रजा आणखी दोन आठवडे वाढविली.

मि. आर. ए. सिंप्सन आ. क. यांना फटके मारण्याचा अधिकार दिला.

---

## वर्तमानसार.

राजकोट येथें असलेली २४ वी पायदळ पलटण ही येत्या तिसऱ्या तारखेस मोडून टाकण्यांत येणार असून २६ वी पायदळ पलटण सप्टेंबर महिन्यांत मोडून टाकण्यांत येईल असें बाहेर आलें आहे. ह्या दोन पलटणी मोडून त्या ठिकाणीं त्यांच्या ऐवजीं अफगाणिस्थानांतील लोकांच्या दोन पलटणी तयार करायाच्या असें म्हणतात. ही गोष्ट खरी असेल तर सरकारचें हें कृत्य विस्तवांत तेल ओतल्या सारखें होणार आहे. ज्या पलटणींनीं आज कित्येक वर्षें आमच्या सरकारची निमक हलालानें नोकरी केली; ज्यांनीं केवळ सरकारच्या हितासाठीं म्हणून आपल्या देशबांधवावर व जाती बांधवावर तरवारी चालविल्या; ज्यांनीं दोन दोन चार चार दिवस उपास काढून आपल्या सरकारच्या शत्रूंशीं टक्कर मारली त्या लोकांस अशा रीतीनें काढून टाकणें आणि पुन्हां बेविश्वास म्हणून काढून टाकणें कधींही न्यायाचें ठरणार नाहीं. ड्यूक ऑफ क्यानाट यांच्या नांवानें स्मारक करण्यासाठीं म्हणून लष्करी शाळा स्थापन करावी असें घाटत असतां त्या वेळीं आमच्या सरकारानें इकडील मराठे लोकांवर जो डाग दिला आहे त्या डागास हल्लींच्या या कृत्यामुळें अधिक जोर येत आहे.

नैनीतालच्या मुख्य पोष्ट ऑफिसापैकीं तालीताल येथील पोष्टमास्तरानें तेल मिश्रित आफू खाऊन आत्महत्या केली. बाजारांतील एका खाटकानें ५० रुपयाची मनीआर्डर केली होती ते पैसे यानें खाल्ले होते, मरतेवेळीं या पोष्टमास्तरानें एक लेख लिहून ठेवला असून त्यामध्यें म्हणतो कीं, सदरहू रकम भरून देण्यास माझ्या जवळ पैसा नसल्यामुळें पुढें होणाऱ्या बेअब्रू आणि तुरुंगवासा पेक्षां मरण बरें.

जी. आय. पी. लायनीवरील एका गार्डानें लगेज केलेल्या एका पेटींतील १० रुपयांचें घड्याळ चोरल्याचा एक खटला मुंबईच्या माजिस्ट्रेट पुढें चालू आहे. मागें प्रसिद्ध झालेल्या सोनेरी टोळीपैकीं हे गृहस्थ आहेत कीं काय?

इंदूर येथें इंदुर कालेज रा. ब. बेहरकर यांचे हस्तें स्थापन झालें व त्यांत सध्यां एम्. ए परीक्षेचे अभ्यास चालवितील. पुण्याहून गेलेले पाठणकर हे संस्कृत शिकवितील हल्लींचे डायरेक्टर भिडे हे गणित व इतिहास हे विषय शिकवितील. विलायतेहून एक विद्वान पदवीवर मुद्दाम आणण्यांत येऊन त्यांकडे इंदूर संस्थानचा शाळाखात्याचा अधिकार (डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन) व इंग्रजी शिकविण्याचें काम देण्यांत येणार. आणि कलकत्याहून एक एम. ए. पर्शियन शिकविण्यासाठीं आणणार आहेत.

एतद्देशीय बालकाकरितां एक आरोग्यस्थल बांधण्याचा विचार कांहीं परोपकारी गृहस्थांनीं मनांत आणला असून त्याकरितां स्थलयोजना नासिकाजवळ केली आहे. मुख्य इमारतीस २०,००० व इतर छापागृहांस १७०० इतके रुपये खर्च होईल असा अजमास आहे. ज्या उदार गृहस्थांस ह्या संस्थेला हातभार लावण्याची इच्छा असेल त्यांनीं त्याबद्दल मि. एच्. फिप्सन, आनररी सेक्रेटरी, ६ अपालो स्ट्रीट, मुंबई यांच्यापाशीं पत्रव्यवहार ठेवावा. अशा स्थलाची इकडे फार जरूर होती ती येणें प्रमाणें निवेल तर फार चांगलें होईल.

हिंदुस्थानांतील लोकमता विरुद्ध पास केलेला संमतिवयाचा कायदा स्टेट सेक्रेटरीसही मान्य झाला.

सोन्याच्या व रुप्याच्या भावांत नेहमीं गडबड होत असल्यामुळें व्यापारास फार धक्का बसतो असें पाहून अमेरिकेंतील एका राष्ट्रीय सभेनें दोन्ही प्रकारची नाणी सुरू करावी असें जाहीरनाम्यानें प्रसिद्ध केलें आहे.

काशीस नुकतीच एक टोळधाड येऊन गेली.

आग्रा येथील ताजमहालाप्रमाणें रशियांत दुसरा अलेक्झांडर यांच्या नांवानें एक इमारत उठविण्यांत येणार आहे. या इमारतीस एक कोटी पन्नास लक्ष रुपये खर्च करण्याचें ठरलें आहे.

इंग्लंडांतील आरमारांत १२५०० लोक ज्यास्त ठेवण्यांत येणार आहेत असें म्हणतात.

दहवर्ते पासून राणीकेंत पर्यंत टोळांनीं बरेंच नुकसान केलें आहे. या टोळांचें सैन्य सुमारें पांच मैल पर्यंत सारखें पसरलें होतें.

लाहोरच्या पत्रांत असें म्हटलें आहे कीं काश्मीर आणि जमू प्रांतांत पुन्हां गुप्त मेत चालू झालें आहेत लक्ष्मणदास पास ज्या वेळीं कैद केलें त्यावेळीं ज्या कित्येक लोकांस हद्दपार करण्यांत आलें होतें त्यांस पुन्हां संस्थनांत येण्याची परवानगी मिळाल्यामुळें असें होत होत असावें आणि यासाठीं तशा लोकांस परवानगी देण्या पूर्वीं त्यांस इंग्रज रेसिडेंटाची संमत मिळावी असें होणें जरूरीचें आहे.

निजामचे मुख्य दिवाण सर अस्मानजा यांस दुसऱ्या पत्नीपासून नुकतेंच एक पुत्ररत्न झालें आहे यासंबंधानें हैद्राबाद येथें मोठा उत्सव चालू आहे. ठा० भ०

आमचें सरकार मध्य एशियाच्या रशियन लोकांस हरकत घालण्या करितां बलुचिस्थानच्या पश्चिम भागांत आपली एक छावणी ठेवणार आहे व रेलवे ही तेथपर्यंत नावयाची आहे हा बांद वालुचा न होवो!

कलकत्याकडे मोठे वादळ होऊन शेंकडो घरें पडलीं, धरणीकंप झाला. आगगाड्या उलथल्या स्टेशनें उडालीं व झाडें मोडलीं व नावाही बुडाल्या! हें कृत्य पांच मिनिटांत झालें ईश्वराच्या इच्छेचें हें एक उदाहरण होय.

पार्लमेन्टमध्यें लॉर्डरिपन यांनीं जराशीं ओरड केल्याबरोबर हिंदुस्थान सरकारचें धाबे दणाणून गेले ह्मणूनच कीं काय? मणीपूरचा मुंबई टाइम्सचा बातमीदार अगदीं आतां लीन झाला आहे. व त्यानें जी तारायंत्रद्वारें हकीगत पाठविली आहे, तिचा विचार करतां मणीपूर संस्थानचा कारभार इंग्रजांकडे राहत नाहीं. हें संस्थान परत मालकाच्या स्वाधीन करणार असें मणीपूरमध्यें जाहिर झालें आहे, व त्यामुळें हा टाइम्सचा बातमीदार आतां असें ह्मणत आहे कीं मोठमोठाले वजनदार लोक आतां साक्षीस येणार नाहींत, त्यांना मणीपूरचा राजा वाईट रीतानें वागवील अगर साक्ष दिल्याबद्दल सूड घेईल. हे टाइम्सच्या बातमीदाराचे उद्गार वाचून आह्मी असें म्हणतों कीं मणीपूर तूर्त तर इंग्रजांचें स्वाधीन आहे तें ह्या पुढें होणारी गोष्ट आज मनांत आणता कामा नये. आह्मीं असें ह्मणतों कीं, हल्लीं मणिपूर इंग्रजांकडे असल्या मुळें जे साक्षीदार झाले ते तरी इंग्रजी अमलाला भिऊनच झाले नसतील कशावरून? असो व्हायसरॉय यांचेकडून मणीपूरचे थोंगळचे सेनापती आणि दुसरे यांना फाशीच्या दिलेल्या शिक्षा रद्द करण्याचा हुकूम झाला आहे त्या वरून विचार करतां मणीपुरचे रिजन्ट आणि युवराज यांना दिलेली फांशीची शिक्षा अवश्य रद्द झाली पाहिजे.

पु० वै०

व्यापारासंबंधीं एक युरोपिअन राष्ट्राचा कानफरन्स बर्नयेथें पुढल्या महिन्यांत भरणार आहे त्या वेळेस युरोपांतील सर्व राष्ट्रामध्यें व्यापारा संबंधी तहनामे होतील.

मद्रास इलाख्यांत टिनेवेली, चिंगलपट व उत्तर आर्कोट या प्रांतांत मनुष्यें उपाशी मरावयाच्या बेतात आहेत. सरकारनें कामें वगैरे सुरु केलीं आहेत त्यामुळें सुमारें १६००० असामींना काम मिळून पोटाला मिळतें; परंतु पाणी सारें १ महिन्याच्या बेगमीचें असल्यामुळें मोठी काळजी पडली आहे.

राजपुतान्यांत सरकारनें लोकांस तळीं, विहिरीं वगैरे खोदण्यासाठीं १ लक्ष रुपये दिले असें समजतें.

नेटिव संस्थानांत ता. १ आगष्ट १८९१ पासून पोलिटिकल एजंटच्या लेखी परवानगीशिवाय वर्तमानपत्र, मासिकपुस्तक वगैरे काढूं नये; काढल्यास त्याला ७ दिवसांच्या आंत घालवून दिलें जाईल असें जाहीर केलें आहे.

बार्लीन येथें वाफेनें ट्रामवेच्या गाड्या चालविण्याचा लवकरच सुरुवात होणार आहे. सु० प्र०

श्रीमान् चांभार— राजस्थान समाचाराचा बातमीदार असें कळवितो कीं, धवलपूर येथून एक चांभारवें वऱ्हाड ग्वाल्हेरीस लग्ना करितां आलें होतें. त्या वऱ्हाडा बरोबर ८ घोडेस्वार, २ सांडणस्वार, आणि ६ गाड्या वऱ्हाडीमंडळ, अशा इतमामानें तें आलें होतें. असें म्हणतात कीं, हा चांभार वरील संस्थानांत खजीनदार आहे. तेव्हां त्याचा वरील इतमाम असणें साहजिकच होतें.

एका शस्त्र वैद्याचें कौशल्य—एक मुलगी १८ महिन्यांची असतां तिचे बुद्धीस कांहीं न्यूनता भासली. ती तशीच वाढत चालली. तिला पुढें अपस्माराच्या लहरी येऊं लागल्या त्या सात वर्षेंपर्यंत येतच होत्या. आठव्या वर्षीं डाक्टराकडून तिची परीक्षा करविली. त्यावेळेस त्याला असें आढळलें कीं, वयाबरोबर तिचे इतर सर्व इंद्रियांची वाढ होत आहे. परंतु बुद्धिमात्र बाल्यावस्थेंतच आहे. शिवाय त्यास अशी शंका आली कीं, कपाळावरील हाडांचा संयोग फारच लवकर झाला असावा. नंतर त्यानें कपाळावर शस्त्रप्रयोग करण्याचा निश्चय केला. व कपाळ खुलें करून वरच्या भागावरील कांहीं हाडांचे बारिक बारिक तुकडे काढून मेंदूवर पडलेला भार कमी केला; त्यामुळें त्यांस वाढण्यास जागा मिळून तो मेंदु वाढूं लागला व ती जखम आठ दिवसांत भरून आली, आणि तिची बुद्धि ज्यास्त वाढत चालली. द्वि० बं०

नोटीस

रावबा ईश्वर मुनसी रहाणार शहर अकोलें यांसः—

नोटीस देणार रामचंद्र सखाराम सोनार वहिवाटदार गोविंद काशीनाथ गुमास्ते—नोटीशीनें असें कळवितों कीं तुमचा आमचा गहाणवटाचा व्यापार आज बरेंच वर्षें चालला आहे. तुम्हांकडे गहाणवटाबद्दल आज संवत् १९४७ च्या दिपवाळी पावेतों एकंदर ऐन गहाणवटाबद्दल रुपये येणें ६३० व आज पावेतों व्याज जें होईल तें हिशोब करून ऐन व व्याज सुद्धां एकंदर रुपये हिशोबा प्रमाणें जे होतील ते नोटीस पावल्यापासून ८ दिवसांचे आंत आणून देऊन निकाल करावा. असें न केल्यास रीती प्रमाणें काम चालवून अखेर निकाल होई पर्यंत व या नोटीशीचा खर्च वगैरे सर्व नुकसान तुमचे पासून भरून घेतलें जाईल म्हणून दिली नोटीस.

तारीख २९–६–९१ इसवी (सही)

रामचंद्र सखाराम सोनार दस्तुर खुद्द.

गोविंद काशीनाथ गुमास्ते दस्तुर खुद्द.

---

नोटीशीचें उत्तर.

रा. रा. विमणाजी वल्लद शंकरजी कावडकार राहणार गणेशपूर तालुके दर्यापूर यांसः—

नोटिस देणार सखाराम वल्लद सरावनजी कावडकार रहाणार मौजे गणेशपूर तालुके दर्यापूर. नोटीशीनें असें कळवितों कीं, तुम्ही ता० २९ जून सन १८९१ इसवी रोजीं शुद्धवऱ्हाडी पत्रांतून नोटिस दिली ती पावली. त्यांतील मजकूर खोटा आहे कारण सर्वे नंबर ४९ एकर २३५ गुंठे आकार रुपये ४४ याचें खातें मानसिंग वल्लद चंद्रभान साकर गायवाडीकर यांचें नांवें असून त्यांत तुमचा हा हिस्सा आहे तो त्यांनीं तुम्हाला मोबदल्यांत दिला नाहीं व त्याचाही हिस्सा तुमचे ताब्यांत नाहीं. खातेदार यानें सदरहू आपला हिस्सा आम्हाला एक हजार रुपयास खरेदी दिला आहे. व खरेदीखत रीतीप्रमाणें नोंदलेंही आहे. आम्ही जबरदस्तीनें कबजा घेतला नाहीं, खातेदार यानें खरदी देऊन कबजा दिलेला आहे आमचे खरेदीखत मुळींच लबाडीचें नाहीं कारण आम्ही सदरहू शेताचे कीमतीचे रुपये सबरजिस्टर यांचे समक्ष दिले व खरेदीखत नोंदून घेतलें, सबब आमचें वर्तन लबाडीचें मुळींच नाहीं. आम्ही सदरहू खरेदीखतावरून गुन्ह्यास मुळींच पात्र होणार नाहीं व नोटीशीचा खर्च देणार नाहीं. आमचे नोटीशीचा खर्च तुम्हांस द्यावा लागेल कारण तुमच्यामुळें आह्मांस नोटीशीचें उत्तर देणें भाग पडलें. आतां विनाकारण तुम्ही आम्हांस त्रास दिला त्याबद्दलचें सर्व नुकसान जें होईल तें तुम्हांपासून रीतीप्रमाणें भरून घेतलें जाईल. म्हणून दिलें नोटीशीचें उत्तर

(सही)

सहीची निशाणी सखाराम वल्लद सरवनजी कावडकार यांच्या हातची असे.

---

☞ हें पत्र अकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्षाचा अगाऊ रु० ५ डांक हाशील ०।।।३
सहामाही " ३ " ०८
सालअखेर " ७ " १०८
किरकोळ अंकास.................................०४

नोटिशी बल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ..........०१

Rs.
per annum in advance 5 Postage 13 as
Per annum in arrears 7 ,, 1Rs. 8 as
Six monthly..........3 " 8 as
Single copy.......................................1as

Advertisements
Below 10 lines...2 Rs
per line over 10...4 as
Repetition per line 3as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXV AKOLA MONDAY 13 JULY 1891 NO 27

वर्ष २५ अकोला सोमवार तारीख १३ माहे जुलै सन १८९१ इ० अंक २७

### औद्योगिकपरिषद्

किंवा

कारागीर, कारखानदार, व्यापारी व देशांतील उद्योगधंदे वाढविण्याविषयीं हस्तेंपरहस्तें खटपट करणाऱ्या लोकांची सभा.

येत्या आगष्ट महिन्यांत पुणें मुक्कामीं भरणार आहे.

सभेची तारीख, सभेपुढें यावयाचे विषय वगैरे बद्दलची वगैरे माहिती मागाहून कळविण्यांत येईल.

सभेसाठीं येऊं इच्छिणार लोकांनीं तारीख १५ जुलईचे आंत खालीं सही करणार यांजकडे आपलीं नांवें कळवावीं.

पुणें, रेम्युझिम कचेरी ता. १३ माहे मे १८९१ — महादेव बल्लाळ नामजोशी, देशी कारागिरीस व धंद्यास उत्तेजन देणारे मंडळीचे सेक्रेटरी.

### जाहिरात.

एलिचपूर येथें होणारा सर्व प्रकारचा माल कोणास पाहिजे असल्यास आह्मांस कळवावें. मारफत कमिशन घेऊन पाठवीत जाऊं. विशेष माहिती करितां टिकीट पाठवा.

जी. डी. कावेटकर
मर्चंट आणि कमिशनर एजंट
शहर एलिचपूर

### सचित्रक्याटलाग.



आर. डी. कानिटकर
आणि कंपनी
मुंबई गिरगांव ह्याचा नवीन तऱ्हेचा इंग्रजी किंवा मराठी अर्ध्या आण्याचें तिकिट पाठविल्यास मिळेल.

### पत्रव्यवहार.

ह्या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास अनुसरून असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस

कृतानेक सा० नमस्कार वि० वि० मृगनक्षत्रानें डोळे पांढरे केले होते, लोक घाबरले होते, धारण महाग होऊं लागली होती. गुराना पाणी व चारा यांचे अगदीं दुर्भीक्ष होण्याच्या बेतात होतें. शेंकडा कडब्याचा भाव ३।४ रु० तो ११।१२ झाला होता. अशा प्रसंगीं सर्व साक्षी परमेश्वराला दया येऊन आरद्रा नक्षत्र लागल्या पासुन परजन्यानें बहार करून दिली ह्या नक्षत्राचा सहाइंच पाऊस पडला. लोकांची काळजी निवारण झाली. गुरांना पाणी झालें शेतकऱ्यांनीं पेरणीचें काम मोठ्या सपाट्यानें चालविलें आहे. सध्यां येथें म्हणण्या सारखी रोगराई नाहीं परंतु येथून साहा सात कोसावर मोंगलाईंत माहामारी सुरू असल्याचें कळतें यामुळें थोडी भिती वाटते. ह्या गांवचें प्रसिद्ध बापूसाहेब राजे काहीं कामा करितां मोंगलाईंत परभणी कडे गेले होते तिकडे त्याचा बळी माहामारीनें घेतला बापुसाहेबां सारखे सभ्य गृहस्थ ह्या गांवीं बापूसाहेबच होते. आणखी असतील परंतु त्यांची बरोबरी करणारा असा कोणी असेल असें वाटत नाहीं. दाजी साहेब राजे यांचें गांवचे जहागीरदार हे नंतर काशीवास करण्या करितां गेले दाजी साहेबांची राजकारणी पुरुषां मध्यें गणणा असे. आता येथील राजवराण्याचा बोज राखणें हें रावसाहेब दाजी साहेबांचे चिरंजीव याचे कडे आहे.

मि० शामराव येथील अव्वाची यांची बदली पुसदास झाली. मि० अयोध्या प्रसाद यांची बदली पुसदाहून येथें झाली होती परंतु आतां असें कळतें कीं त्याची बदली उमरावतीस झाली व येथें मि० शापूरजी विरजी हे दर्यापुराहून येणार आहेत. येथें अनुभविक कामदार कां पाठवीत नाहींत कोण जाणें. कोणी नवीन आला कीं ढकला येथें. हल्लीं अनुभविक कामदार येथें नसल्या मुळें सर्व कामाचा बोजा मि० केशवराव यांचेवर पडला आहे. काम करितां करितां यांना क्षणभर फुरसत सांपडत नाहीं अशी स्थिती आहे. तर कमिशनर साहेब या गोष्टीचा विचार करून या जिल्ह्यांतील पक्षकार लोकांची अडचण मनांत आणून येथें आणखी एक अनुभविक कामदार पाठवितील तर लोकांना कुरकुर करण्यास जागा राहणार नाहीं.

सुमारें विस दिवसां पासुन येथें मेहेरबान डेविस साहेब अक्टिंग डेप्युटी कमिशनर यांच्या पुढें जंगल खात्यांतील जमादार मि० महंमद शाबासखा यांच्यावर मि० विटन बेकर प्रमाणेंच मुकदमा चालला आहे.

येथें एक नवीन वकील आले आहेत. ते कोंकणस्थ आहेत. त्यांचें नांव विनायक विष्णु गोखले असें आहे. ते फार हुशार असून त्यांना मुकद्दम्याचें स्वरूप फार लवकर समजतें व ते आपल्या कुळांशीं फार ममतेनें वागतात असें त्यांचीं आज दोन महिन्यांत झालेलीं कुळें बोलतात. आतां येथें इंग्रजी वकील तीन झाले. तिघेही हुषार आहेत परंतु हुशार लोकांचा भरणा होत जातांना कुबानें राम म्हणण्यास बरेंच दिवस झाले. हुषार लोकांना जर अशा गोष्टी न आवडतील तर इतरांचे काय जातें.

उमरखेडाकडील विश्वयोषींतांचा एक मुकदमा येथें आला आहे लोकांची मजा आहे, गाण्याची गल्लोगल्ली व रस्तोरस्ती रेलचेल उडून गेली आहे. कळावें हे विनंती.

आपला
X.

मिति आषाढ शुद्ध ७ शके १८१३

### ही सुधारणा नव्हे.

मागें गेलेल्या कालाचें अवलोकन करून त्या प्रमाणें चालूं काळांत वर्तन ठेवणें व पुढें येणाऱ्यांत कसें वर्तन ठेवावें ह्याचे अनुमान करणें, ह्यास उत्तम साधन इतिहासाखेरीज दुसरें कोणतेंच नाहीं. जगावर अनंत उपकार करून अजरामर कीर्ति राखून ठेवणाऱ्या साधूसंत, तत्वज्ञानी, शूर, उदार इत्यादि महा थोर लोकांचें उदाहरण दृष्टीपुढें ठेवून त्याप्रमाणें वर्तन ठेवण्यास व त्यांच्या वर्तनांतील काळमाना प्रमाणें दिसून येणारें गौण्य भरून काढून हंसाच्या वृत्तीचें अनुकरण करण्यास इतिहासासारखें जय्यत साधन राखून ठेवल्याबद्दल जुन्या लोकांचे जितके आभार मानावे तितके थोडेच. जगांत इतिहासा सारखें पुढच्या पिढ्यांच्या उन्नतिकरितां कांहीं साधन करून ठेवण्याचे श्रम घेण्याचे दगदगींत मागील लोक जर न पडतें तर जगाच्या आरंभा पासून आतां पर्यंतच्या काळांत ज्या उलाढाली झाल्या व पुढें सरण्याचा जो जगाचा नेहमींचा प्रयत्न दृष्टीस पडतो त्या उलाढाली कधींही झाल्या नसत्या, व आरंभीच्या स्थितींत व आतांच्या स्थितींत फारच थोडा फरक झाला असता. असो. इतिहासाचें महत्व दाखविण्याचा उद्देश धरून लेखणीला हात लाविला नसल्या कारणानें प्रस्तुत विषयाकडे वळावें हें बरें.

पाश्चिमात्यां प्रमाणें जरी नाहीं तरी जे कांहीं थोडे बहुत आमचे प्राचीन लेख (इतिहासा दाखल) उपलब्ध आहेत त्यावरून आमचे पूर्वज विद्वान, शूर व कलाकौशल्य निपुण असून धर्माभिमानी असत असें सहज सिद्ध करितां येतें. ह्या त्यांच्या अंगांतील गुणांनीं त्यांस एका वेळीं सुधारणेच्या उच्च पदावर नेऊन बसविलें होतें असें अनुमान करण्यास पुष्कळ आधार आहे. त्यांचेच वंशज आम्ही असून त्यांच्यांत व आमच्यांत केवढा फरक झाला आहे! जगाची सुधारणा होत आहे, उद्योगाकडे मनुष्य जातीचें लक्ष विशेष ओढ घेत आहे इत्यादि विधानें जगांतील सांप्रतच्या स्थितीस बरोबर लागूं पडत असतील परंतु खुद्द हिंदुस्थानासंबंधानें विचार केला असतां बहुतेक सर्व प्रकार उलट दिसून येतात असें ह्मणावें लागतें हें आमचें म्हणणें सिद्ध करून देण्यास फार दूर जावयास नको. ज्या देशांतील बहुतेकांस, आपल्या जठराग्नीचें शांतवन अल्प प्रयासानें करितां येतें व गरज पडल्यास चार चौघांचें पोषण करण्याचें सामर्थ्य असतें, ज्या देशांत उदीम व्यापार शेतकी व कारागिरी इत्यादिकांच्या उत्तेजनार्थ द्रव्याची सामुग्री विपुल असते व ज्या देशात प्रामाणिकपणा सत्यता, धैर्य व स्वदेश भक्ति यांस मान असतो त्या देशास सुधारलेला देश असें म्हणतां येतें. वर सांगितलेल्या गुणापैकीं एक ही गुण ह्या देशाच्या वाट्यास येत नाहीं आणि म्हणूनच हिंदुस्थानदेश सुधारणा देवीचा भक्त होण्यास सध्यां पात्र नाहीं असें कबूल करणें भाग आहे. आतां प्रश्न हाच आहे कीं, त्याला तिचा कल्याण शिष्य बनविण्याबद्दल चालूं असलले उपाय कितपत हितकर आहेत; आणि म्हणूनच त्या प्रयत्नापासून होत असलेली सुधारणा इष्ट आहे काय? ह्याचा विचार कर्तव्य आहे.

ज्याला जो मार्ग सुचेल अथवा पसंत पडेल त्या मार्गाचे अवलंबन करून त्यानें यथा शक्ति हात भार लावून देश सेवेच्या जबाबदारीतून मोकळें व्हावें असा अलीकडे सर्व साधारण नियम ठरलेला आहे. आणि 'मीं जो मार्ग शोधून काढिला आहे त्या खेरीज अन्य मार्ग कुच कामाचे आहेत', असें हेकेखोर पणाचें वळण गिरविण्यांत येत असल्या कारणानें समाजाच्या रहाटीस बराच विस्खळित पणा आला आहे. स्वाभाविक उत्पन्न झालेल्या बुद्धिचा विनियोग करण्याचा अधिकार सर्वांस सारख्या रीतीचा जरी आहे तरी समाजाच्या संबंधात तिचा उपयोग करण्याचा कामांत कितपत खबरदारी घेतली पाहिजे ह्याचा विचार प्रत्येक सुधारणेलु कडून अगोदर झाला पाहिजे. चालूं असलेल्या प्रकारा वरून लोकांस अली कडील स्थिति सुखावह होत नसली पाहिजे हें सिद्ध आहे. परंतु एक येकांची मतें एक मेकांला पसंत नसल्या कारणानें सावळा गोंधळ माजून काळचा दिवस बरा गेला असें म्हणण्याचा प्रसंग हमेश येत आहे. जाती भेद मोडल्या पासून होणाऱ्या फायद्याचे सुखानुभव जेव्हां येतील तेव्हां येवोत परंतु ते भेद मोडण्या करितां ज्या उपायांची योजना होत आहे ते उपाय अप्रयोजक आहेत असें म्हणावें लागते. कांहीं काळानें आपोआप होणाऱ्या सुधारणेस मलत्याच उपायांची योजना करून वैमनस्य वाढविण्या पलीकडे कोणता फायदा झाला आहे? कालांतरानें कमी होणाऱ्या महत्वा पेक्षां जाती भेदाचें महत्व उपायांची योजना करून कितपतसें कमी झालें आहे. स्वजातीयांचा द्वेष व परकियांचा तिरस्कार ह्या पेक्षां विशेषसा फायदा जाती भेद मोडूं इच्छिणारांनां झाला असेल असें म्हणतां येत

नाहीं. शिवाय देश वाढत गेल्या कारणानें सर्व साधारण हितावह अशा सुधारणांस अडथळें मात्र बरेंच आले. असंमत वैधव्य, बालविवाह, विधवा केश वपन इत्यादि सामाजिक गोष्टींत हात घालतांना किती घाई झाली याचा अनुभव येत चालला आहे. केवळ परकियांच्या समाधाना करितां व त्यांच्या पासून वहावा मिळवुन घेण्या करितां ज्यांनीं सामाजिक व्यवस्थेत ढवळाढवळ करण्याचा प्रयत्न केला, त्यांच्यावर लोकांचा विश्वास बसून त्यांच्या मनाजोग्या सुधारणा होण्यास किती अडथळे येतात याचा अनुभव सद्यस्थितीचें अवलोकन केल्यास सहज येणार आहे. देशांतील निम्मेवर लोक अर्धपोटीं रहातात, मेघराजानें थोडीशी वक्र दृष्टि केली तर हजारों लोक मृत्युमुखीं बळी पडतात, आंगभर वस्त्र नाहीं, पोटभर अन्न नाहीं, दिवसेंदिवस जमीनितील कस जात चालला, व्यापार धंदे तिऱ्हाइतांनीं सांभाळिले, देशांतील संपत्तीस शेंकडों वाटा फुटल्या, अशा आणिबाणीच्या प्रसंगीं ह्या देशांतील कांहीं भाग्यशाली खाऊनपिऊन सुखी असलेल्या लोकांनीं अशा वेळीं तूर्त तरी निरर्थक अशा सामाजिक सुधारणेंचे घोडे पुढें ढकलावें व लोकमताची पर्वा न करतां दुसऱ्याच्या जिवावर घाटेल त्या मार्गानें वागावें व आधींच भडकलेल्या अग्नींत तेल ओतण्याचा प्रयत्न करावा या सारखी लज्जास्पद गोष्ट दुसरी कोणतीही नसेल. पोटाची खळी भरून काढण्याच्या विवंचनेंत असणाऱ्या समाजास इतर गोष्टींचा विचार करून शांततेच्या व अबादानीच्या दिवसांत सुचणाऱ्या गोष्टींचा उहापोह करण्यास अवकाश कसा मिळावा. अगोदरच त्रस्त झालेल्या लोकांकडुन त्यांच्या कल्पनाही चालल्या नसतील अशा तऱ्हेच्या सुधारणा अमलांत येतील अशी आशा धरणें किती अश्लाघ्य आहे.

मुखमार्जन, स्नान, भोजन इत्यादि विधि प्रत्येक मनुष्यास दररोज उरकणें भाग आहे. परंतु वाटेल त्यावेळेस वाटेल तो विधि उरकून घेणें ज्याप्रमाणें सुखावह होणार नाहीं त्याच प्रमाणें जरी बालपुनर्विवाहादि सुधारणा अवश्य असल्या तरी क्रमाक्रमानें व सोईसोईनें त्या अमलांत आल्या असतां विशेष फायदेशीर होणार नाहींत काय? आंग्लविद्या संपादून जठराग्निची अल्प प्रयासानें शांतता करणाराकडून असल्या तऱ्हेच्या सुधारणा अमलांत आणण्याची खटपट सुरूं आहे परंतु त्यांस विनयपूर्वक इतकेंच सुचविणें आहे कीं, आपल्या स्थितीवरून इतर लोकांच्या स्थितीचें अनुमान करणें अगदीं अप्रयोजक होणार आहे. २९ कोटि प्रजेंत तुमच्या सारखे सावलींत बसून सुखानें दिवस घालविणारे लोक कितीसें निघतील ह्याचा थोडासा विचार करा! रात्रंदिवस उन्हांत, थंडींत व पावसांत कष्ट करून 'कुच रोटी कुच लंगोटी' अशा शोचनीय स्थितींत असणारे बहुतेक लोक आहेत. त्यांस तुमच्या सुधारणा कितपतशा पसंत पडणार? त्यांना त्यांच्या स्थितींतुन काढण्याचा तुमचा हेतु जर असेल तर आपल्या मार्गाची दिशा फिरवा. सामाजिक सुधारणा वाटेल त्यावेळीं अमलांत येण्या सारख्या आहेत.परंतु व्यापार शेती इत्यादिकांनीं जर दगा दिला तर मात्र घडगत नाहीं. गरीब लोकांच्या तरणोपायाची व्यवस्था जर न लागेल तर सर्वच सुधारणांचा अंत होणार आहे. सांप्रत कांहीं कांहीं जारी असलेल्या सुधारणा निरर्थक व कदाचित् नुकसानीलाही कारण होणार आहेत. आणि ह्मणूनच ही सुधारणा नव्हे असें ह्मणण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं.

---

व्हाइसराय साहेबांनीं एक नवें सरक्युलर काढिलें आहे कीं, सरकारी कामा निमित्त जें सामान लोखंडी व पोलादी लागेल तें हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत तयार झालेलें असें खरेदी करण्यासाठीं स्थानिक सरकारांतून व्यवस्था केली जावी. ज्या लोखंडी व पोलादाच्या वस्तु या देशांत तयार होतात त्या बाजूस ठेऊन त्या ऐवजीं विलायतच्या ब्रेतल्या जाऊं नयेत अशा अर्थाचा हा नवा ठराव करण्या पासून दोन प्रकारचा फायदा आहे. विलायती जिनसा पेक्षां देशीं जिनसा स्वस्त भावानें मिळतात तेव्हां त्या विकत घेतल्यानें सरकारचा चांगला नफा होईल आणि देशी कारागिरीस अशा ठरावानें चांगलें उत्तेजनही दिल्याचें सरकारास श्रेय येणार आहे. लोखंडी व पोलादी जिनसांच्या कारखान्यांची या देशांत फार उणीव आहे व जुने लोहारांचे धंदे पुष्कळ प्रकारें मोडकळीस येत चालले आहेत अशा समयीं या सरक्युलराचे आम्ही बहुमोल मानतों.

हिंदुस्थानांतील कारागिरी संबंधानें मुख्य ओरड अशी आहे कीं जुने सर्व धंदे बंद होत जाऊन त्या ऐवजीं नवीन सुरूं झाले नाहींत. या कारणानें आम्हा नेटिव लोकांस देशांतील निरनिराळे कारखाने काढण्यास पुष्कळ गोष्टींनीं सवड आहे परंतु त्या करितां भांडवल पाहिजे तें सर्वांनीं मनावर घेऊन संयुक्त भांडवल उभारणाऱ्या मंडळ्या काढल्या शिवाय पुरेसें जमणार नाहीं. ही गोष्ट अलिकडे नुकतीच लोकांच्या ध्यानांत येत चालली आहे व त्या प्रमाणें कांहीं किरकोळ चळवळी चालल्याचें आपणांस वारंवार कळत असतें. औद्योगिक परिषद् येत्या आगष्ट महिन्यांत भरवून वरील प्रकारच्या सर्व अडचणी लोकांस कळविण्याचा त्या सभेचा विचार आहे कोणकोणत्या स्थळीं कोणकोणते उद्योग व कारखाने निघाले पाहिजेत या मुद्याचाही त्या वेळीं सूक्ष्मरीत्या विचार होईल. साधारण कातड्याच्या धंद्याचें उदाहरण एका मासिक पुस्तकानें घेऊन प्रतिपादिलें आहे कीं ज्या कातड्याची कमावणी हिंदुस्थानांत होऊन तीन रुपये किंमत येईल अशा कातड्यावर विलायतेंत आणखी उत्तम प्रकारची कमावणी करून पंधरासोळा रुपये पर्यंत किंमत उभारतां येते. यावरून आपल्या देशांत कातडें कमावण्याचे कारखाने निघाले तरी सुद्धां पुष्कळ फायदे होण्या सारखे आहेत. आमच्या जाती, धर्मपंथ, आणि आचार व रूढी या धंद्याला फार प्रतिकूळ आहेत हेंही स्मरणांत ठेवण्यासारखें आहे. म्हणजे एकंदरीनें असा विचार निघतो कीं देशकाल वर्तमाना प्रमाणें आपलीं सामाजिक बंधनें थोडी बहुत शिथिल झाली पाहिजेत व अधिभौतिक देशांतील संपत्ति वाढविण्याचे लोकांस शिक्षणही मिळालें पाहिजे. वरील दोन्ही उपाय अंशतः साध्य होत चालले आहेत तरी आपल्या लोकांस एक दिलानें व एकोप्यानें वागण्याचा मार्ग जों पर्यंत लागला नाहीं तों कालपर्यंत कांहीं अभ्यांश दिसत नाहीं.

---

आरबी समुद्रामध्यें पावसाळ्यास प्रतिकूळ असा वारा वहात होता तो अलिकडे बंद झाल्यावरून मुंबई व कारवार या दरम्यानच्या भागास चांगली पर्जन्य वृष्टि होईल असा तर्क आहे आणि त्या प्रमाणें पाऊस जोरदार रीतीनें मुंबईस पडूंही लागला आहे. बहुतेक सर्व महाराष्ट्रांत थोडथोडा पावसास नुकतांच आरंभ होत चालला आहे हवेचें वजन वऱ्हाड व नागपूरच्या टापुला बरेंच कमी होत आहे त्या मानानें यंदा उशीर झाला आहे तरी पर्जन्य वृष्टि विपुल होऊन पीकपाणी बरें येईल असा अंदाज आहे.

---

मि. जार्ज हरबर्ट विटन बेकर, बुलढाणें जिल्ह्यांतील फारिस्ट खात्यांतील अधिकारी यांचे वरील खटल्याचा निकाल मागील मंगळवारी झाला. हा खटला प्रथम मि. निकोलेट्स यांचे पुढें चालूं होता. व गुन्हा लागू होण्या पुर्ता पुरावा होता ह्मणून मुंबई हायकोर्टाकडे पाठवून दिला होता. हा खटला हायकोर्टापुढें २।४ दिवस चालला होता या खटल्यांत सुमारे १००।२०० साक्षीदार होते. मि. विटन बेकर यांचे तर्फे मुंबईचे प्रसिद्ध वकील मि. इनव्हऱ्यारिटी हे होते व मि. जारडाइन हे सरकारतर्फे काम चालवीत होते. या खटल्या संबंधानें वेळोवेळ आह्मी आमचे वाचकांस माहिती दिलीच आहे व या खटल्याचे निकालाकडे आमच्या वाचकांचे लक्ष लागून राहिले असेल यांत शंका नाहीं. मि. जारडाईन यांनीं पुरावा कसा काय आहे हे सांगितल्यावर आ मि. इनव्हऱ्यारिटी चांगले मोहक व खुबीदार रीतीनें बोलले. आनरेबल जस्टिस मि. फॉरन यांनीं कृपावंत होऊन मि. विटेन बेकर यांस फक्त २ वर्षे सक्त मजूरीची शिक्षा दिली. शिक्षा देतांना जस्टिस साहेब ह्मणाले कीं मि. विटनबेकर त्यानीं सर्व लोकांस किस्सा घालून देतें रास्त होते परंतु पैसा जेव्हां त्यांचें हातीं आला तेव्हां त्यांचे मन फिरलें पैशामुळें त्यांचा निग्रह ढळला. — हा त्यांचा पहिलाच अपराध आहे, व पैशा सारख्या लालूच उत्पन्न करणाऱ्या गोष्टीमुळें हा अपराध घडला आहे व हें आजारी आहेत असें डाक्टराचे जबानी वरून सिद्ध होत आहे ह्मणून फक्त २ वर्षे सक्त मजूरीचीच शिक्षा दिली आहे. याप्रमाणें पुष्कळ दिवस पुढें असलेल्या खटल्याचा निकाल झाला.

इतर सर्व गोष्टीं मध्यें हिंदु आणि युरोपिअन या मध्यें जो तफावत दिसून येते तो या खटल्यांत मुळीच दिसत नाहीं मि. विटनबेकर यांचे खटल्यांतील जुरीचे लोक बहुतेक युरोपियनच होते व त्यांनीं एक विचाराने मि. विटनबेकर यांस दोषी ठरविलें तेव्हां या संबधानें कुर कूर करण्यास कोणास जागा नाहीं. मि. विटनबेकर यांची तरफदारी करणारे वकील तर नामांकित आहेतच. या निकालाकडे आमचे हडेल हपी अमला खालीं असणाऱ्या प्रांतांतील अधिकारी लक्ष देऊन त्या प्रमाणें वागतील अशी आशा आहे. दुसरी गोष्ट फारेस्टखात्यासंबंधानें—फारेस्ट खात्यांत बरीच सवलत मिळते वर्तणेंकरून पैसे वगैरे मारतां येतात असें दिसतें. सध्यां अशाच प्रकारचा एक खटला वाशिमास सुरू आहे. व त्यांत फारेस्ट खात्यांतील अधिकारी गुंतलेले आहेत. फारेस्ट खात्यासंबंधानें लोकांमध्यें फार दिवसांपासून गवगवा व या अशा खटल्यामुळें लोकांना कुरकुर करण्यास जागा आहे हें सिद्ध होतें. यासाठीं त्या खात्यांतील अधिकारी या गोष्टी बंद होतील अशा प्रकारची व्यवस्था करण्याची खबरदारी घेतील अशी आशा आहे.

---

मणिपूरच्या तिघा राजपुत्रांस फांशीची शिक्षा मिलीटरी कोर्टानें सुनावली आहे त्या विषयींचा अखेर निकाल व्हाईसराय साहेबांनीं चालू महिन्याच्या अखेर पर्यंत लांबविला आहे व त्या मुदतींत मणिपूरच्या राजपुत्रांनीं आपला पुरावा व्हाइसरायच्या कौंसिलांत सादर करावा असें ठरलें आहे. ही मुदत कळवितांना व्हाइसराय साहेबांनीं अशी तार पाठविली होती कीं या अवधी वरून कायद्यान्वयें न्यायाची निवड करतांना कांहीं फरक होईल असें समजूं नये. या तारेचा अर्थ इंग्रजी पत्रांनीं असा जाहिर केला कीं ही मुदत दिली म्हणून शिक्षा कांहीं कमी होईल. असें नाहीं. ही कायदे पण्डिती लढविण्याचा मुद्दा असा निघतो कीं फांशीची शिक्षा रद्द करून घेण्या विषयींच्या खटपटी वकिलास निराशा साक्षात् भासावी. मणिपूर खालसा करावें व राजघराणें निर्मूळ व्हावें, असें प्रतिपादणाऱ्या इंग्रजी पत्र करांच्या मतें क्विंटन प्रभृति आफिसरांच्या मरणा निमित्त वरील फांशीच्या शिक्षे शिवाय सूड पुरा उगवला जाणार नाहीं यांत आश्चर्य कसचें!

---

पदच्युत महाराजांस गादीवर पुन्हा बसविण्याचा हिंदुस्थान सरकारचा विचार होता परंतु तो क्विंटन व ग्रिमवुड याच्या दुराग्रहामुळें सिद्धीस गेला नाहीं. युवराज गादीवर बसले तेव्हां सरकारानें मौन धरिलें. परंतु सेनापति सारखा पुरुष इंग्लिशाच्या दृष्टीसमोर खपेना म्हणून दरबार बोलावून त्यांस कैद करण्याचा घाट घातला. अशा कृत्यांत विश्वास घात नाहीं असें आफगाणिस्थानच्या लढाईच्या वेळचे व आणखी एक दोन उदाहरणे देऊन दाखविलें आहे. मागील दुष्कृत्यांचा पुरावा पुढील कृत्यास देण्याचा नियम हा अगदीं नवा आहे. उघड आहे कीं ज्याच्या हातीं सत्ता तो शहाणा!

---

प्राण संरक्षणार्थ लढाई शिवाय अन्य मार्ग न राहील अशा कडेकोट रीतीनें मणिपूर वर स्वारी क्विंटन साहेबानें करावी आणि मग लढाई सुरू झाली व त्यांत प्राणहानि झाली म्हणून दातीं तृण धरून शरण आलेल्या राजपुत्रांस फांशी द्यावें हा इंग्लिश राष्ट्राचा न्याय पाहून इतिहासकार काय शेरा व अभिप्राय देतील हें सूज्ञ वाचकांच्या सहजीं लक्षांत येईल. मणिपूर स्वतंत्र संस्थान नव्हतें तेव्हां त्याच्या हातून घडलेल्या प्राणनाशा निमित्त लढाईच्या सदरा खालीं

सूट मिळणार नाहीं कांकीं लढाई म्हणजे दोन समसमान राष्ट्रां मधील चकमक होय. हा युक्तिवाद चांगला दिसतो परंतु हिंदुस्थान सरकारच्या हातुन एखादा कसकशा चुका होत गेल्या व त्या मुळें कोणत्या गोष्टी कोणत्या थरास जाऊन पोंचल्या हें पाहिलें म्हणजे प्रस्तुतच्या मणिपूर प्रकरणास लढाईचें स्वरूप कां देऊं नये हें आम्हांस समजत नाहीं.

---

ज्या स्वामिभक्ति परायण चाकरांनीं आपल्या धन्याच्या हुकूमा अन्वयें इंग्रजी आफिसरांची कत्तल उडविली व ज्या एप्रिलच्या बंडांत आपल्या संस्थानच्या संरक्षणा साठीं ज्यांनीं आपले प्राण धोक्यांत घालण्यास मागें पुढें पाहिलें नाहीं अशा राजनिष्ट मणिपूरच्या प्रजेवर इंग्रजी आफिसरांनींखूनाचे आरोप लावून त्यांस सुळावर चढवीत आहेत हे एकुन फार खेद वाटतो प्रथमतः मणिपूरास बंड उद्भवलें त्यांत इंग्रजांशीं कोणत्याही रीतीनें द्वेषभाव दिसून आला नाहीं. परंतु पुढें ज्या इंग्रज आफिसरांनीं अन्यायानें मध्यस्ती केली त्या चुकी बद्दल त्यांचे प्राण गेले त्यांत त्या बिचाऱ्या मणिपूरकरांस फांशी देणें हा मोठा अन्याय होय. साहेबांवर हात टाकील तर तो मरणद्वारीं असतो अशी सर्वत्र इंग्रजी अंमलाची दहशत आहे परंतु हा दरारा कायम ठेवितांना अगदींच न्यायाला विसरणें हें चांगलें नव्हे शिवाय त्या बापड्या मणिपूर वाल्यांस फाशी दिल्यानें सूड ही उगवल्या सारखें होत नाहीं येशुख्रिस्त मनुष्य जाति साठीं सुळावर चढला परंतु त्याच्या अनुयायांनीं आपल्या पैकीं कांहीं जणाच्या प्राण प्रानहानी साठीं— निष्कारण प्राण हानि नव्हे—स्वामिभक्त अशा मनुष्यांस फांशी द्यावें हें त्या धर्माच्या व न्याय मूर्ती इंग्रजांस शोभतें का?

---

The Berar Samachar

MONDAY, JULY 13, 1891

## LONDON CONGRESS OF 1892.

The 'Bengalee' is the first newspaper to draw the attention of the public to this important question. The Congress at Calcutta recorded a resolution that the Congress would hold its sittings of 1892 in London. All things being convenient provisional arrangements would be made for not less than a hundred delegates to go on voyage to England. The resolution is a pledge of the Congress to the world. The proviso of every thing being convenient has no reference to the difficulties and objections that will beset the starting of such an assembly of patriots. It has reference to the political aspect of Indian affairs and the rise and influence of the movers of the British Committee of the Congress, within more than a year the Englishmen at home will be enlightened on Indian topics by the energetic agencies at work under the auspices of Sir William Digby. They will of their own accord extend to us their sympathy with interest in Indian affairs. The present times promise a happy tendency to the prevalence of liberal principles and have practically negatived the proviso But for all this there must be a real and hearty co-operation in the move. We have pledged ourselves that as Congresswallas we shall fight our political cause in the very centre of the sovereign nation. We have travelled in the path of action so far that success demands of us a gradual and steady onward movement to arouse the English nation to the grievances of a race of loyal subjects. We cannot retrace a single step unless we rest content with the political serfdom before the scientific despotism of the Indian Govt. But this contentment of a pig will, in the eyes of all nations, signalize a state of nation doomed to decline and total extinction. God forbid such an ideas. Here then is a question which turns up on the possibility of a political life for India.

The Editor of the Bengalee remarks in his observation on the situation of our Congress institution:—

"We have no hesitation in saying that if we desire to win the great battle of political reform in which we are engaged, then we must make it absolutely clear to the English public that we are absolutely in earnest about this matter, that behind our speeches and resolutions are deep and burning convictions which consume the national mind with an ever present flame and that our talk and our recorded proceedings but inadequately express the depth of feeling by which we are animated. It is then and then only that we are likely to succeed in rousing the attention of the British public and in obtaining from them the inestimable gift of representative institutions. Their own history teaches Englishmen that when a nation is in earnest, there is no power that can successfully resist its legitimate demands. The strength of armies, the autocratic might of kings have melted away before the power of deepest, resolute earnestness. We are convinced that the session of the Congress in London will show the British public that we really mean what we say in our Congresses and that we are prepared to make heavy sacrifices for the purpose of giving effect to our ideas."

Experience has taught us to declare as an orthodox principle that social barriers are not of such a nature that they may not relax, even in the presence of a great crisis and in the performance of a great national duty. It is time that we should bestir ourselves early in the matter. We call upon the different Standing Committees to lose no time in taking this blessed work.

---

Last week George Herbert Wittenbaker's case was decided in the High Court of Bombay. The accused was found guilty of a breach of public trust amounting, in rough speaking, to Rs. 1100. The guilt was clearly proved and it told a heavy tale of the poor soul. The accused was sentenced to two year's rigorous imprisonment. It is natural to feel compassion for a man getting into trouble but compassion should in no way meddle with the dues of justice. The unhappy position of George Herbert Wittenbaker would have been pitied the more, had he but made a clear and open breast of the whole tangled affairs. The evidence adduced in behalf of prosecution was too strong and convincing to be shuffled away by his lame pleas. With him the way to get out of the difficulty was a simple one; it was to assume innocence and to throw the entire charge on his ever pliant subordinate natives. But he hopelessly missed the mark and found himself in the clutches of justice. So at least due justice was brought to bear upon him to the satisfaction of all involved in the affair who were watching in suspense and anxiety, the issue of this stormy proceeding.

Now that G. H. Wittenbaker is found to be capable of doing anything to escape the unavoidable danger, we cannot wonder how he made bold to give expression unreservedly and unhesitatingly to his deep and inmost feelings. His heart was stirred with inveterate hatred and malice. His manly nature was so hopelessly upset, his passions were so absorbing and his rashness so abnormally desperate that he ventured in the last hour to start a purely inventional and totally unfounded line of argument to defend his cause. He tried to fulminate a spurious tale about the whole affair. He endeavoured & took great pains to get some how or other Col. Szczespanski involved in some matters in which Mrs. Cotgrave was concerned.

Baffled in his attempts to take his stand on such an untenable ground he proceeded to excuse himself by bodily indisposition. Vain were his attempts. None could be brought to believe in his statements. His doom was thus sealed. At the end of the trial the jury which was for the most part composed of British European subjects, gave a unanimous verdict of "guilty" and the honourable Justice Mr. Farran had the painful duty to give effect to it. The jury was requested to expell from its mind the reference to Col. Szczespanski and Mrs. Cotgrave. His Lordship observed very touchingly while passing his judgment. The accused, as a European British subject, should have set an example to others but it appears that when money was entrusted to him he was not proof against the temptation to take it. Feeling sure that the accused had given way to temptation and that he had suffered much pain as was shown by the medical evidence add bearing also in mind that this was his first offence his Lordship said he would take a lenient view of the case and accordingly passed a sentence of two year's rigorous imprisonment.

The Berar Commission has however bought this judgment very dearly. It had to pay heavy sums to institute the prosecution and to defray the expenses of a swarm of witnesses. Wittenbaker's case has had a parallel in the Basim District. The Forest Department is it seems slack and loose in its discipline. There is no proper supervision and the working of the department does not seem efficient. The Berar Government is further requested to take notice of the Forest administration and to introduce a salutary control over the ways of collecting its revenues and the strict observance of its regulations.

---

On account of the transfer of Mr. Apte from Registration Department we hear that one or two posts of Sub-Registrars have to be filled up by promotion. We hope we shall not be giving offence to the Head of the Registration Department if we suggest that the claims of a deserving officer may be taken into consideration along with the claims of others. Mr. Mukund Yeshwant sub registrar of Amraoti is a clever and hardworking officer in the Department. His knowledge of English is pretty good and he has been faithfully serving the Department for the last 16 or 17 years. He opens his office very early and closes it late in the evening. He is popular with the people of Amraoti and that means a great deal in his favour. Merits have as well to be taken into consideration as length of service. In the case of Mr. Mukund both are in his favour and we have not the least doubt that Col. Lane will give due consideration to this officer's claims.

---

Mr. T. H. S. Biddulph, Comptroller, Hyderabad, is appointed to officiate as Deputy Comptroller General.

---

Mr. W. H. Dobbie, Deputy Accountant General, North Western Provinces and Oudh, is appointed to officiate as Comptroller, Hyderabad.

G. of I.

---

पोंच:—' कयारत्नावली 'मासिक पुस्तक मुंबईस प्रासिद्ध होऊं लागलें आहे.' भोजन बंधु पान तंबाखु,' 'सुलेखनविद्या,' 'कुटुंब सुधारणा,' दारूपासून अनर्थ,' व हीं छोटेखानी पुस्तकें तयार करणार के. वा. रा. रा. गोविंद नारयण माडगांवकर यांचे लघु चरित्रासकट आमच्याकडे आली आहेत. त्यांचा आम्हीं आभारपूर्वक स्वीकार करितों. नीति सुधारणेस व विद्यावृद्धीस असल्या पुस्तकांची फार जरूरी आहे. खेडेगांवांतून अथवा अडाणी लोकांच्या घरांतून ख्रिस्ती मंडळ्याकडून निघालेली शेकडों पुस्तके दृष्टीस पडतात त्या ठिकाणीं वरील पुस्तकें दिसतील तर किती बहार होणार आहे बरें! असें होण्यास त्यांच्या किंमती आहेत त्या पेक्षां ही कमती झाल्या पाहिजेत. व सर्व लोकांच्या पहाण्यांत ही पुस्तकें येतील अशी व्यवस्था झाली पाहिजे

---

## वऱ्हाड.

हवमान — मागील आठवड्यांत दोन दिवस जो कांहीं पहिलाच पाऊस झाला त्यावर पावसाचा थेंबही नाहीं. पेरण्या होऊन लोकांचे पावसाकडे डोळे लागले आहेत. आभाळ नेहमीं अभ्राछादित असतें. काल रात्रीं भिज पाऊस पडण्यास सुरवात झाली. हवेचा उपद्रव वाढत्या प्रमाणावर सुरूं आहे.

बुलढाण्याचे माजी फारेस्ट आफीसर मि. विटेनबेकर ज्यांच्यावर वनचराईचे सरकारी पैसे खाल्या बद्दल आरोप येऊन येथें खटला चालला होता व येथून मुंबईस हाय कोर्टांत अखेर निकाला करितां पाठविला होता त्या खटल्यांत साहेबावर आरोप शाबीत होऊन त्यास दोन वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा झाली.

मि. शाबासखा तहसिलदार यांस खामगांवास नेमिलें.

मि. यासीनखा हे आपल्या हायकोर्ट जज्जाच्या जागेवर रुजू होण्यास परवां येथून हैदराबादेस निघून गेले.

मि० बिडल्फ हैदराबादचे कंट्रोलर यांस डे० कंट्रोलर जनरल नेमिलें व त्यांचे जागीं मि. डोबी यांस नेमलें आहे.

---

### नोटीस

रा. रा. गुलाबरायजी गोविंदरामजी साहू दुकान अकोलें यांस नोटीस देणार शालिग्राम छगनलालजी भुसावळकर याजकडून:—

नोटिशीनें असें कळवितों कीं, तुमची व आमचा सख्याची देववेव होऊन वैशाख वद्य ३० रोजीं सदर्हू सख्याचा भावाचा हिशेब तुमचे संमतीनें होऊन बाकी मजकडे रु. १३.२०२ निघाले. ते रु. तुमचे दुकानावर पाठविले असतां तुह्मी घेतले नाहींत. व तुम्ही घेऊनही जात नाहीं. तेव्हां या नोटिशीनें असें कळविलें जातें कीं, नोटीस पावल्या पासून चार दिवसांचे आंत हे रुपये. चुकते घेऊन जावें. व चुकत्याची पावती द्यावी पुढें तुम्ही व्याजाची तकरार केली तर ऐकलें जाणार नाहीं. तुमचे रु. आमचे दुकानीं अनामत आहेत. आतां या नोटिशींत लिहिलेल्या व्यवहाराबद्दल नफा नुकसानीचे वगैरे आम्ही जबाबदार नाहीं. कळावें. तारीख ११—७—९१ इसवी.

( सही. )

शालिग्राम छगनलालजी साहू भुसावळकर तर्फे गुमास्ते प्रितसिंग बक्तारचंदजी मारवाडी.

---

## वर्तमानसार.

हल्लीं युरोपांत पुन्हा गडबड होण्याचा रंग दिसत आहे. इताली, आस्त्रिया आणि जर्मनी या बड्या राष्ट्रांत जो एक तह आहे तो पुन्हा अमलांत आणण्यासाठीं इताली सरकारानें आपल्या पार्लमेंटांत खटपट केली पण ती व्यर्थ जाणार असा रंग दिसत आहे. या तहाविरुद्ध तेथील बहुतेक मेंबर असून युरोपांत शांतता रहाण्यास हा तह फार जरूरीचा आहे असें इतालीच्या सरकारी कामदारांचें मत आहे. हा तह पुन्हा अमलांत आला असतां युरोपांतील शांतता जास्त सुरक्षित होईल असें इंग्लंडनें आपलें मत प्रदर्शित केलें आहे. या मतावरून फ्रांसांत असा समज झाला आहे कीं, या तहास इंग्लंड चुपी तऱ्हेनें सामील आहे. हा तह पुन्हा होणार हें ऐकून फ्रान्सच्या राजकार्य धुरंधरांत मोठी गडबड उडून राहिली आहे. या संबंधानें रशियन पत्रकारांनींही आपलें मत प्रदर्शित केलें असून हा तह फ्रांस व रशिया यांणीं एकत्र होणें फार जरूरीचें आहे असें त्यांचें मत आहे. या एकंदर हकिकतीवरून युरोपांत शांतता आहे असें ह्मणतां येत नसून उलट युरोपांतील बडे राजे अरसांत धुसपुसत असून बार उडविण्याची वेळ पहात आहेत असें म्हणणें भाग पडतें. आमच्या सरकारास या गडबडीमुळें बराच धक्का बसण्याचा संभव असल्यामुळें युरोपांत तशी गडबड झाली असतां हिंदुस्थानांतही कामदारांची गडबड उडविण्याचा संभव असल्यामुळें ती भयंकर वेळ येऊं नये एवढीच आमची इच्छा आहे.

आमच्या सरकारच्या मार्गें वायव्य सरहद्दीचा लागलेला रशियाचा कधीं नाहींसा होईल तो होवो. प्रसिद्ध सर चार्लस डिल्के यांणीं 'इंग्लंडची सैन्याची तयारी' या विषयावर 'फार्ट नाइटली रिव्ह्यू' नांवाच्या मासिक पुस्तकांत एक लेख प्रसिद्ध केला आहे त्यांत ते ह्मणतात कीं, रशियाच्या सैन्याचा विचार केला असतां इंग्लंडचें सैन्य सूर्यापुढें जसा अंधःकार त्याप्रमाणें आहे. इंग्लंडचें सैन्य २२० हजार असून रशियाचें ४११ हजार पायदळ, ८५ हजार घोडेस्वार, ६८ हजार तोफखाना, २० हजार सापर्स आणि ३५ हजार लष्करी शिक्षण मिळालेले म्हणजे एकंदर ६२० हजार सैन्य असून २८ हजार त्यावर अधिकारी आहेत. या विषयासंबंधानें लार्ड रंडाल्फ चर्चील यांचें असें मत आहे कीं, रशिया व इंग्लंड यांचें कायम ऐक्य करून सैन्य कमी करावें पण चर्चिलच्या या म्हणण्यास सर डिल्के विरुद्ध आहेत. व अशी गोष्ट कालत्रयीं व्हावयाची नाहीं असें त्यांचें मत आहे. सर डिल्के म्हणतात कीं, कांहीं दिवसांनीं रशिया बराच जवळ येऊन ठेपेल, तो आपली रेल्वे पुरी करील व इतर तयारीही संपून टाकील आणि मग त्याच्याशीं टक्कर मारण्यास हिंदुस्थानांतील सैन्य कधींही पुरावयाचें नाहीं. याला उपाय एकच आहे. तो असा:—इंग्लंड व हिंदुस्थान या दोन ठिकाणीं नव्या दोन लष्करी शाखा स्थापाव्या व या दोहोंपैकीं एकावर संकट आल्यास दुसऱ्या शाखेनें मदत करावी असें ठरवावें म्हणजे झालें. दुसरें सर डिल्के यांचें म्हणणें असें आहे कीं, हल्लीं जें पायदळ सैन्य आहे त्याला तोफखान्याचा टेकू असावा तसा नाहीं आणि त्याच्यावर जितके हुकूम करणारे कामगार असावेत तितके नाहींत. फ्रांको जर्मन लढाईंत जो अनुभव आला त्यावरून व आजपर्यंतच्या अनुभवावरून सर डिल्के म्हणतात कीं, अशा हुकूम करणारांची संख्या फार असली तर कच्चें सैन्यही तरबेज सैन्याबरोबर टक्कर मारूं शकतें. हिंदुस्थानांत आज प्रत्येक संस्थानिकाजवळ सैन्य मागण्याची जी भिक्षान्देहि चालूं आहे त्या सैन्याच्या मदतीस तोफखाना नसेल तर त्या सैन्याचा कांहीं उपयोग नाहीं. डिल्के पुढें म्हणतात कीं, आज फक्त विलायतेसच तोफा पाडण्याचा कारखाना इतर ठिकाणीं नाहीं. हें चांगलें नाहीं; तसेंच लंडनवर जर एखाद्या परराष्ट्रानें स्वारी केली तर हल्लीं असलेला तोफखाना अतिशय अपुरी आहे. आज इंग्लंडांतील एकंदर तोफांची गणती केली तर २० तोफखाने किंवा १२० तोफा इतका भरेल. पण फ्रान्साकडे किंवा जर्मनीकडे लक्ष दिलें तर ते देश इतक्या तोफा पहिल्या सपाट्यास रणांगणावर आणून शिवाय तितक्याच तोफा मागें मदतीसाठीं म्हणून ठेवूं शकतील लढाई सुरू झाल्यास या विलायतेच्या तोफा हिंदुस्थानांत उपयोगीं पडतील असें कधींही मानतां यावयाचें नाहीं कारण विलायतचें रक्षण करण्यास ह्या जर त्या समर्थ नाहींत तर हिंदुस्थानचें काय करणार? हिंदुस्थानांत तोफा पाडण्याचा एखादाही कारखाना नसावा हें मोठें आश्चर्य आहे. हिंदुस्थानांत मुंबईच्या रक्षणासाठीं जर तोफा जास्त लागल्या तर त्या विलायतच्या कारखानदारांस सवड मिळाली तर मिळणार! ही खरी वस्तुस्थिति सरहद्दीवर रशियाशीं लढाई करणाऱ्या आमच्या सेनापतीस किती जाचक व त्रासदायक होईल याचा विचार फार लौकर झाला पाहिजे. सरतेशेवटीं हिंदुस्थानांत कमी खर्चाचें पण हल्लीं आहे याहून जास्त सैन्य जय्यत असावें, विलायतकडे पाहण्याची वेळ येऊं नये म्हणून हिंदुस्थानांतच तोफांचा कारखाना काढावा म्हणजे युरोपांतील राजांनीं किती ही बोटें मोडलीं तरी कांहीं व्हावयाचें नाहीं असें डिल्केचें म्हणणें आहे. कमी खर्चाचें म्हणजे नेटिव सैन्य ठेवणें भाग आहे. तोफांचा कारखाना घालणें म्हणजे विलायतच्या धंद्यावर पाणी घालणें आहे तेव्हां या दोन्ही गोष्टी आम्हांस कबूल आहेत मात्र त्यांत तिसरी एक गोष्ट पाहिजे आहे ती ही कीं, आपल्या प्रजेस संतुष्ट ठेवणें या तिन्ही गोष्टी झाल्या म्हणजे आम्ही रशिया सारखे ५६ हजार राजे आले तरी भिणार नाहीं! पण या तीन गोष्टी घडतील काय व तिसरी अती महत्वाची गोष्ट कधीं तरी घडेल काय!

मि. एडिसन ह्यांनी आपल्या फोनोग्राफच्या यंत्रांस फोटोग्राफचें यंत्र जोडून एक चमत्कारिक यंत्र तयार केलें आहे. नाटक चाललें असतां हें यंत्र पुढें नेऊन ठेविलें म्हणजे नाटकांतील पात्रांच्या हावभावांचे फोटोग्राफ दर सेकंदास ४६ ह्या प्रमाणानें निघतात, आणि त्या पात्रांचीं भाषणें त्या फोनोग्राफमध्यें जाऊन बसतात. नंतर ते फोटोग्राफ म्याजिक ल्यांटर्नच्या योगानें पडद्यावर भराभर पाडिलें म्हणजे तीं पात्रें प्रेक्षकांपुढें खरोखरच हावभाव करीत आहेत अशीं दिसून, फोनोग्राफ उलटा चालू केला म्हणजे त्यांचीं भाषणें ऐकूं येतात!

इंग्लंडांत बर्मिंगहाम हें मोठें कारखान्यांचें शहर आहे. त्यामध्यें एका आठवड्यांत तयार होत असलेल्या जिनसांपैकीं कांहींचें परिमाण येथें सांगतों:—१,४०,००,००० टांक, ६,००० लोखंडी पलंग, ७,००० बंदुका, ३०,००,००,००० नखजिने, १०,००,०००, बटन २०,०००, चष्मे, ४,००० मैल लांब लोखंडी व पोलादी तार, १० टन टांचण्या.

मि. महादेव गंगाधर दामले यांस हायकोर्टांत वकिली करण्याची सनद मिळाली.

बॉट नांवाच्या एका इंग्लिश इंजिनरानें एक बंदूक शोधून काढली असून ती उडविली असतां तिच्या पासून आवाज होत नाहीं. धूर निघत नाहीं' व ती मागें येत नाहीं.

येमन येथील बंडखोरांची संख्या वाढत असून त्या बंडखोरांस नेमाड जातीचे लोक ही मिळाले आहेत. या लोकांच्या विरुद्ध टर्कीनें सैन्य पाठविलें असून त्याचा या बंडखोरांनी पुन्हां पराजय केला तसेंच बंडखोरांपुढें आरबी लोकांचें ही कांहीं चालत नाहीं हें बंड धर्मरक्षणासाठीं ह्मणून करण्यांत येत आहे अशी लोकांनी समजूत होऊन तें अधिक प्रमाणानें वाढेल अशी टर्कीस भीति पडली आहे.

लंडनची ता. २८ जूनची तार सांगते कीं डब्लिन येथें धान्याचा व्यापार करणारांनीं कट केला आहे आणि त्यामुळें धान्यांनी भरावयाचीं तारवें बंदरांत रिकामींच पडून राहिलीं आहेत. आणि यामुळें धान्याचा दुर्भिक्ष पडतो कीं काय अशी भीति वाटूं लागली आहे.

कोईंबतूर प्रांतांतील करूर नांवाच्या शहरांत गेल्या मंगळवारीं भयंकर दंगा झाला. वरील शहरांत मरियंमान नांवाचा एक महोत्सव असल्यामुळें त्यासंबंधानें कित्येक हिंदुलोकांनीं अनेक प्रकारचीं सोंगें घेतलीं होतीं. त्यांतच त्यांनी वाघाचीं सोंगें घेण्याबद्दलचा परवाना तयील तहशिलदारापासून काढला होता. परंतु हीं वाघाचीं सोंगें घेण्यास परवानगी देऊं नये असा मुसलमानानीं आग्रह धरिला, व हिंदुलोक वाघाचीं सोंगें घेतील तर दंगा होण्याचा रंग तहशिलदारासही दिसल्यावरून, त्यानें पूर्वीचा परवाना रद्द केल्याबद्दल जाहिरनामे लावून प्रसिद्ध केलें. तथापि तो हुकूम कित्येक तरुण हिंदुलोकांनीं न ऐकून त्यांनीं वाघाचीं सोंगें सजविण्याची तयारी चालविली. ह्या बद्दलची तहशिल्दारनें बातमी ठेवून कांहीं शिपायांनिशीं तो वाघ रंगत होते त्या ठिकाणीं गेला व त्यांस त्यानें तसें न करण्यास सांगितलें. पुढें तहशिलदार मरियंमाच्या देवळांत जेथें उत्सव चालला होता तेथें गेला तों इकडे रंगलेल्या वाघासह मोठा समाज मिरविण्यासाठीं निघालेला मरियंमाच्या देवळाजवळ आला. तेव्हां त्यांस हरकत करण्यासाठीं तहसिदार पुढें गेला तों त्याजवर दोन वेळां हल्ला होऊन दगडांची वृष्टी झाली. त्याला दोन ठिकाणीं लागलें व त्यास जवळच्या एका घरांत जाऊन दडून बसावें लागलें. असें झालें तेव्हां त्या समाजावर मुसलमान लोक "दिन! दिन!!" करून घसरले. त्यावरून हिंदुलोक फारच खवळून त्यांणीं त्यांस मागें हटवून तेथेंच असलेल्या त्यांचे मशिदींत ते शिरले व तेथें असलेल्या सर्व सामानाचा वगैरे त्यांणीं विध्वंस केला तेथलीं कित्येक थडगीं उकरून टाकिलीं तसेंच जवळपास असणाऱ्या मुसलमानांच्या घरांवरही हल्ला करून त्यांतल्या सामानसुमानाची धुळधाण केली व घरांत शिरून कांहीं मुसलमानांच्या बायकानाही चोप दिले, आणि मशिदींतल्या कुराणाचीं पुस्तकें फाडून टाकलीं हिंदुलोक मुसलमानांच्या घडून आलेल्या ह्या विनाकारण हरकतीनें फारच खवळून गेले होते पोलिसांच्यानें दंगेखोरांचा बंदोबस्त करवला नाहीं. कारण ते अगदीं थोडे असून हिंदुलोकांचा समाज फार मोठा होता. दुःखांत सुखाची गोष्ट ही आहे कीं, एवढ्या ह्या प्रचंड दंग्यांत प्राण हानी झाली नाहीं तरी बहुत लोक फार जखमी झाले असून जिंदगीचा नाश फार झाला. ठा. अ.

---

नोटीस

मे० शेख फरीद वल्लद शेख महंमद इस्मत मुसलमान वस्ती मौजे कंजारें ता० खामगांव जिल्हे अकोलें यांसः—

नोटीस देणार पितांबरदास मनसुखराम साहु दुकान पेठ खामगांव तालुके मजकूर. सुमार सन १३०१ फसली कारणें नोटीस देण्यांत येतें कीं, तुम्हांकडेस आमचे नगदी रुपये २३०१ घेणें असून ते रुपये लागलींच नगदी देण्याचे असतां आमचे पश्चात आमचा गुमास्ता नामें अंतीदास शांतीनाथ सेतवडशी तुम्ही मिळून सदहू रकमेचा सवाई सुद्धां ठराव रुपये. ३५९९ चा केला. त्यापैकीं रुपये६०० रोख नगदी देण्याचे व बाकी रुपये २९९९ चा दरसाल २०० रुपये प्रमाणें सालबंदीचा दस्तऐवज लिहून देण्याचा या प्रमाणें ठराव केला. पैकीं रुपये २९९९ चा दस्तैवज सालबंदीचा लिहून दिला. आणि नगदी रोख रुपये ६०० शें देण्याचे ते घेणें आहेत ते दिले नाहींत. हल्लीं या नोटीशीनें तुम्हांस कळविण्यांत येतें कीं, सदरील जो ठराव तुम्ही केला आहे त्या पैकीं रुपये ६०० तुम्ही लागलींच देण्याचे ते दिले नाहींत. ते रुपये दिल्या शिवायही सर्व तोडजोड आम्हांस मान्य करणें भाग नाहीं असा ठराव आहे. याज करितां नोटीस पावल्या पासून चार दिवसांचे आंत रुपये ६०० शें तुम्ही आम्हांस देऊन पावती घ्यावी. या प्रमाणें तुम्हीं न केल्यास तुम्ही केलेली तोडजोड ही तुम्ही करार मोडल्या मुळें पक्की नाहीं असें समजून एकदम कोर्टांत फिर्याद करून अखेर निकाल होईपर्यंत या नोटीशीचे खर्चा सुद्धां जें नुकसान होईल तें सर्व भरून घेतलें जाईल कळावें. तारीख ८ माहे जुलई सन १८९१ इ०

(सही.)

पितांबरदास मनसुखराम दस्तुर अंतीदास.

---

☞ हें पत्र अकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्षाची अगाऊ रु० ५ डांक हाशील ०।३
सहामाही " ३ " ०८
सालअखेर " ७ " १०८
किरकोळ अंकास.................................०४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस .........०१

Rs.
per annum in advance 5 Postage 13 as
Per annum in arrears 7 ,,1Rs. 8 as
Six monthly..........3 " 8 as
Single copy...........................4as

# वऱ्हाडसमाचार.

Advertisements
Below 10 lines...2 Rs.
per line over10...4 as
Repetition per line 3as

THE BERAR SAMACHAR

VOL XXV AKOLA MONDAY 20 JULY 1891 NO 28

वर्ष २५ अकोला सोमवार तारीख २० माहे जुलै सन १८९१ इ० अंक २८


## पत्रव्यवहार.

ह्या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मताप अनुसरून असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

मुक्काम वाशीम १५।७।९१ इ.

वि. वि. मध्यें आठ दिवस पाऊस अगदीं नव्हता. उघाडीमुळें पेरणीचें काम बहुतेक संपलें. ता० १२ पासून पाऊस पुनः पडण्याची सुरवात झाली. उत्तम प्रकारें तीन दिवस वृष्टि झाली. शेतीच्या कामीं जसा पाहिजे तसा पाऊस पडला. पिकांचा अंकूर चांगला असून शेतकरी लोक आनंदांत आहेत. गेल्या सालीं आज तागाईत पाऊस १५ इंच पडला होता. ह्या सालीं सुमारें ८।९ इंच पडला असें ह्मणतात एकंदरानें पावसाचें मान जरी कमी आहे तरी पिकांना चांगलें आहे. चाऱ्याची कमती असल्यामुळें गुरें चांगल्या स्थितींत नाहींत. येथें महामारीचा थोडथोडा प्रवेश झाल्यासारखें दिसतें अजून कोणी दगावले नाहीं. लागलेले बहुतेक उतरले असें ह्मणतात ह्याबद्दल येथील डाक्टर लोकांची तारीफ करावी तितकी थोडी. हे गृहस्थ हॉस्पिटल् असिस्टंट असून स्वभावानें उत्तम असल्यामुळें ते सर्व लोकांना आवडते झाले आहेत. व ते अतिशय मेहनत घेऊन आजारी झालेल्या लोकांना फार खटपट करून औषधोपचार करतात. बडे डाक्टर साहेबही फार खबरदारी ठेवतात. ह्या जिल्ह्यांत कित्येक ठिकाणीं हा उपद्रव सुरू असल्याचें कळतें. परंतु वेळेवर लोकांना ज्या त्या ठिकाणीं औषधें मिळण्याची खबरदारी येथील डाक्टर साहेब बहादुरांनीं ठेविली आहे. लोकांच्या जीवित्वाकडे ह्या साहेबाचें फार लक्ष असल्यामुळें हे लोकांच्या स्तुतीला पात्र आहेत.

येथें मि. शामराव यांचे जागीं नेमिलेले मि. शहपूरजी साहेब हे दाखल झाले व त्यांनीं आपले कामाचा चार्ज घेतल्याचें कळतें. मि० शहपुरजी हे फार हुशार आहेत. पार्शी लोक मूळचे हुशार असतात. त्याप्रमाणें हे हुशार आहेत ह्यांना दिवाणी काम जरी पूर्वीं माहीत नाहीं आहे असें लोक बोलतात तरी हे लवकर त्यांत तयार होतील अशी यांची हुशारी आहे. ते लोकांत आपल्या कामाच्या हुशारी मुळें मोठ्या इभ्रतीस चढोत.

उमरखेडचे आनररी मॅजिस्ट्रेट मि० यादवराव हे येथें एक डाका पकडून घेऊन आले आहेत. हे ब्राह्मण असून देशपांडे आहेत. हल्लीं जो डाका त्यांनीं धरून आणिला आहे त्यांत दहा पंधरा मनुष्यें आरोपी आहेत असें ह्मणतात. ज्यावेळीं तो डाका धरिला त्यावेळीं मोठी धामधूम झाली. तींत कांहीं इसम घायाळ झाले अशी वार्ता आहे व कांहीं यमसदनासही गेले असें लोक बोलतात. असें खर्च झालें असल्यास मोठें नवल नाहीं. धामधुमींत अशा गोष्टी होतच असतात येथे हें डाक्याचे चौकशीचें काम खुद्द जिल्हाधिपतीच्या पुढें चालावयाचें आहे पाहावें पुढें काय होतें तें. मात्र आमच्या यादवरावाच्या मरदुमकी बद्दल त्यांचें नांव सर्व वाशिम जिल्ह्यांत तर गाजलेंच परंतु सरकार ही त्यांचा योग्य सन्मान समजून करील यांत संशय नाहीं. जिवावर उदार होऊन रात्रीं मागें पुढें न पाहातां त्यांनीं हा मोठा पराक्रम केला त्या बद्दल त्यांची योग्य संभावना होणें योग्य आहे असे पराक्रमी पुरुष अझून जमेदार लोकांत आहेत हें एक जमेदार लोकांना मोठें भूषण आहे. व जेव्हां जेव्हां काम पडेल तेव्हां तेव्हां जमेदार मंडळीनें कमर बांधून सरकारच्या कामीं पडण्यास तयार असलें पाहिजे. सरकार जमेदार मंडळीचे गुण वाखाण्याची वेळ आल्यास कधींही मागें पायघेणार नाहीं.

येथें फारेस्ट जमादारावर केस चालली आहे ती अझून किती दिवस चालणार कोण जाणें. सुरु होऊन सुमारें बरेंच दिवस झाले असें म्हणतात. बिचारा जमादार जामिनवर आहे म्हणून बर. नाहीं तर ... चौकशींतच जिवाची त्रेधा उडाली असती असो न्याई न्यायाधीशा कडे काम चाललें आहे तेव्हां खरें तेंच बाहेर येईल यांत संशय नाहीं.

येथील हुजूर नाझर यांची बदली इलीचपुरास झाल्याची वार्ता बाहेर येऊन बरेच दिवस झाले. यांचे येथील जागेवर तेथील मिस्तर करकरे या नांवाचे गृहस्थ यावयाचे होते. परंतु आतां अशी वार्ता उठली आहे कीं सदरहु मिस्तर करकरे यांनीं येथें येण्याचें नाकारलें. कां? हें समजलें नाहीं. कसेंही असो आमचे येथील लोक प्रीय नाझर यांस पर्जन्य काळांत बदलणें व विचाऱ्यास तखलिफीत घालणें बरोबर नाहीं. करितां दयाळु वरिष्ट अधिकारी या गोष्टीचा विचार करून त्यांना ते येथें येत नसल्यास तेथेंच ठेवितील तर फार बरें होईल. बहुत दिवस येथें राहिल्यानें पाउसाच्या दिवसांत दूर पल्ल्यावर जाणें मोठें कठीण.

राष्ट्रीय सभेला चार महीने राहिले--अझून वर्गणी जमा करण्याची हालचाल ह्या जिल्ह्यांत मुळींच नाहीं हें कसें. वऱ्हाडांतून १६ हजार रुपये राष्ट्रीय सभेला देण्याचे पुढारी मंडळींनें ठरविलें आहे. त्या ठरावांत ह्या जिल्ह्याच्या वांट्यासही हजार पंधराशें रुपये येणार ते खटपट केल्या शिवाय जमा कसें होणार तेव्हा स्वतंत्र मंडळीनें ह्या कामीं लागलें पाहिजे. जिल्हाभर सभा केल्या पाहिजेत लोकांच्या मनांत सभे विषयीं अभिरुची उत्पन्न करून लोक पैसे देतील अशी खटपट करून व्याख्यानें दिलीं पाहिजेत तर मिस्तर माहाजन व मिस्तर दिगे या गोष्टीचा विचार करितील व या जिल्ह्याचें नांव राखतील व वऱ्हाडवाशी पुढाऱ्यांना ह्या जिल्ह्याचा हिस्सा देतील तर अयोग्य कोण म्हणेल. कळावें हें विनंती.

आपला

X.

## वऱ्हाडसमाचार

मिति आषाढ शुद्ध १४ शके १८१३

पंडिता रमाबाईनीं अमेरिकेंतील ख्रिश्चियन मंडळीच्या उदार साह्यानें स्थापिलेल्या 'शारदा सदना' विषयीं अलीकडे वर्तमानपत्रांतून पुष्कळ लेख येत असतात त्यांतील मजकूर शारदासदनांच्या अव्यवस्थेस अनुलक्षून आहेत. केसरी, जगद्धितेच्छु, पुणेवैभव इत्यादि पत्रांतून या सदना विषयीं लोकांच्या आक्षेपांचें दिग्दर्शन होत असतें व दुसऱ्या पक्षीं सुधारक, सुबोधपत्रिका व त्यांच्या सारख्या अभिप्रायांच्या वर्तमानपत्रांतून त्या आक्षेपांचें खंडन करून नंतर शारदा सदनाच्या उपयुक्ततेच्या अनुरोधानें त्या संस्थेच्या प्रत्येक गोष्टी मंडनात्मक लेखांनीं चांगल्या ह्मणून लेखिल्या असतात. या उभय पक्षांच्या म्हणण्याचें नीट मनन केलें ह्मणजे शारदासदना विषयीं लोकांच्या शंका व त्यांचे तर्क कितपत खरे व सप्रमाण दिसतात हें कळविण्याच या लेखाचा उद्देश आहे

अमेरिकन लोकांनीं एक मोठा फंड उभारला व तो वरील विदुषी बाईच्या स्वाधीन करून शारदासदना सारखी संस्था स्थापण्याच्या कामीं खर्चीं घातला. या सत्कृत्या वरून त्या स्वातंत्र्य प्रियलोकांचे हिंदुस्थानच्या स्त्रिया विषयीं प्रेम व त्यांच्या उन्नतावस्थे विषयीं आस्था हीं स्पष्टपणें व्यक्त होतात पंडिता रमाबाईच्या विद्वत्ते शिवाय त्यांच्या चांगूलपणाविषयीं आह्मांस विशेष अनुभव नव्हता व त्यांनीं परद्विपीं गमन केलें व ख्रिस्ती धर्माची दीक्षा घेतली तेव्हां त्यांच्या संबंधानें आह्मांस फारशी आशा उरली नव्हती. परंतु त्यांनीं आपल्या नवीन धर्म बंधूच्या मनांत आपल्या देशभगिनींची अनाथ अवस्था बिंबवून त्यांतून त्या अबलांचा मोक्ष करण्यासाठीं जीवापाड मेहनत करून शारदासदन स्थापिलें हें पाहून आह्मांस या बाईच्या अद्भुत साहसी वर्तना विषयीं अचंबा वाटला व त्या काळा पासून त्यांच्या लोकोत्तर चरित्राची लोकांस थोडी बहुत ओळख होत चालली. पण्डिता बाईनीं सर्व थोर थोर गृहस्थांच्या विचारानें या सदनाची व्यवस्था चालविण्याविषयीं आश्वासन दिल्या कारणानें व अमेरिकन लोकांनीं ख्रिस्ती धर्म प्रसारासाठीं ह्मणुन फंड उभारला नसून निरपेक्षबुद्धीनें हिंदुस्त्रियांस सुशिक्षण देण्याच्या उद्देशानें उभारला आहे अशीं वारंवार लोकांची खात्री करण्याचा प्रयत्न चालू ठेविल्या कारणानें पंडितारमाबाई लोकांच्या विश्वासास व स्तुतीस अधिकाधिक पात्र होत चालल्या होत्या.

शारदासदन लोकाश्रयास पात्र होऊन हतभाग्य देशभगिनींचे आश्रमस्थान व विद्यापीठ ह्मणून नाणवलें जावें ह्मणुन भांण्डारकर, तेलंग, नूलकर, रानडे प्रभृति शहाजोग गृहस्थ रत्नांची व्यवस्थापक मंडळी स्थापण्यांत आली व त्यांच्या आज्ञे प्रमाणें सदनाची व्यवस्था चालविण्याचा संकल्प ठरला. या कामीं मिस ह्याम्लीन या बाईनीं मोठ्या खोल व पोक्त विचारानें मंडळी स्थापिली व त्यांच्या ह्मणण्या प्रमाणें पंडिताबाईनीं शारदासदनाची नीट तजवीज कांहीं काळ बरी वाईट चालू ठेविली ह्मणून पंडिताबाईनीं ख्रिस्ती धर्मीची दीक्षा घेतली होती व ख्रिश्चन मंडळीच्या पैशावर सदनाचा खर्च चालला होता तरी हळू हळू त्या सदनाचा उपयोग करून घेण्यासंबंधानें लोकांच्या मनाच्या प्रवृत्तीत व अभिप्रायांत चांगलें अंतर दिसून येऊं लागलें होतें व कालावधीनें शारदासदन फार लोकप्रिय होईल अशीही आशा वाटली होती.

परंतु मध्यंतरीं सदनांतील मुलींस तुळशीची पूजा करूं देत नाहींत व धर्माचरणांत व्यत्यय आणितात असें व अशा प्रकारचे दुसरे आरोप सदनांतील व्यवस्थेसंबंधानें बाहेर येऊं लागले व त्यांतील कांहीं खरें आहेत अशी खात्री झाली तेव्हां कांहीं प्रमुख गृहस्थांनीं व्यवस्थापक मंडळींतून आपलें अंग काढून घेतलें. पण्डित रमाबाई मुलींस हिंदु देवळांत जाण्यास हरकत करतात व ख्रिस्ती देवळांत चाहील तेव्हां नेतात इत्यादिही गोष्टी लोकांच्या नजरे समोर येत असत. त्यामुळें सदनाच्या सुव्यवस्थेचा ऱ्हास होत चालला व मिस ह्याम्लीन बाई हिंदुस्थानांतून गेल्या कारणानें सर्व कारभार पण्डिता बाईच्या हातीं येऊन पोंचला तेव्हां त्यांस स्वैरपणें वागण्यास सांपडूं लागलें.

पण्डिता रमाबाईस मूळ सल्लामसलत अमेरिकेंतील मंडळीची आंतून होती तेव्हां त्या मंडळीच्या लेखाच्या आधारें येथील व्यवस्थापक मंडळीस रजा दिली व त्या त्या गृहस्थांस असें कळविलें कीं, मंडळी या नात्यानें तुमची मदत नको व या पुढें मंडळी ह्मणून त्यांस कांहीं एक व्यवस्था करितां येणार नाहीं. ही व्यवस्थापक मंडळी रद्द केली तेव्हां त्यांतील व्यक्तिविशेषाच्या विचाराची कितीशी मातबरी राहिली हें सांगण्यास नको. या गोष्टीमुळें लोकांचा विश्वास नाहीं-

सा झाच्या व पण्डिता रमाबाईंच्या शारदासदनाची दिशा निराळीच धर्मप्रसाराच्या संस्थे प्रमाणें असावी अशी पक्की खातरी होऊं लागली.

पुढें आपल्या शारदा सदनाच्या उत्कर्षासाठीं पण्डिता रमाबाईंनीं आतेबहिणीस व आणखी दोन तीन आप्तांमधील मुलीस घरून सदनांत आणून ठेविलें. परंतु त्यांची बहीण कृष्णाबाई हिला त्या सदनांतील सर्व प्रकार धर्मभ्रष्टतेस अनुकूळ वाटले व सदनांतील सर्व व्यवहार आवडले नाहींत व पण्डिता बाईस बहिणीचीही नावड व तिची सदनांतील व्यापारास प्रतिकूळता हीं सहन न होऊन त्यांनीं कृष्णाबाईला सदनांतून हांकलून दिलें. कृष्णाबाई परमुलुखांत निष्कांचन व एकट्या पडल्या ही गोष्ट पण्डिताबाईस लाजीरवाणी आहे.

पण्डिता रमाबाईंनीं रावबहादूर रानडे यांस पत्र लिहिलें त्यांतील आशय असा कीं शारदासदनाची व्यवस्थापक मंडळी मोडली गेली या सदनाविषयीं प्रतिकूळ लेख वर्तमान पत्रांतून प्रसिद्ध होत आहेत. तेव्हां त्यासंबंधानें आपण प्रतिवाद करावा कीं लोकांस आक्षेप घेण्यास कारण नाहीं. व व्यवस्थापक मंडळींतील गृहस्थांच्या विचारानें--मंडळी ह्मणून नव्हे तरी—सर्व व्यवस्था चालू राहील. रावबहादुरांची या सदनाच्या उपयुक्तते संबंधानें विचार अगदीं निराळे आहेत ह्मणजे कोणत्याही धर्माच्या पुरस्कर्त्यानें सदन काढलें असो, व कोणत्याही धर्मतत्वावर त्या सदनाची व्यवस्था असो तरी त्या संस्थेपासून आपलें चांगलें करून घेणें आपणांकडे आहे व त्यांतून कांहीं चांगला कार्यभाग साधण्यासाठीं दुसऱ्या कांहीं धर्माचारास विरोधी गोष्टी पत्करण्यासही आळस करितां कामा नये. तेव्हां अशा अभिप्राया समोर शारदासदना सारख्या संस्थेंत रमाबाई सारख्या बाटलेल्या विदुषी हिंदुधर्मपद्धतीस अनुसरून कितपत वर्तन चालू ठेवतील याचा वाचकांनींच विचार करावा.

सारांश, अमेरिकन लोकांनीं शारदासदनासाठीं फंड उभारला या कृत्यांत 'शुभवर्तमाना'चा प्रसार करण्याचा हेतु नाहीं, पण्डिता रमाबाई आपल्या धर्मक्रांतीची दीक्षा आपल्या सदनांतील मुलीस देणार नाहींत इतकेंच नव्हे तर हिंदु धर्माप्रमाणें आचार विचार स्वतंत्रपणें व बिनहरकत चालवितील इत्यादि गोष्टी विषयीं लोकांचा पूर्ण विश्वास बसेल अशा रीतीनें सर्व व्यवस्था ठेविली आहे असें लोकमान्य व धर्मनिष्ट गृहस्थांनीं सर्टिफिकिट दिलें म्हणजे लोकांनीं आपल्या मुली सदनांत पाठविण्याचा विचार करावा असें आम्ही म्हणतों; आणि ही गोष्ट घडून येई पर्यंत पाहिजे त्यास आपल्या जबाबदारीवर शारदासदनाचा उपयोग करून घेतांना कोण मनाई करील? कां कीं, ही गोष्ट ज्याच्या त्याच्या खुषीची आहे.

---

व्हाइसराय लॉर्ड लॅन्स डाऊन यांचा स्वभाव विनोदी असावा असें दिसतें. थोड्या दिवसा पूर्वीं त्यांस एका युरोपियन आफिसरांच्या मंडळी कडून मेजवानी देण्यांत आली. इंग्रजी पद्धती प्रमाणें अशा मेजवान्यांच्या वेळीं राजकीय व सामाजिक विषयावर संभाषणें होत असतात त्या प्रमाणें त्या मेजवानीच्या समारंभाच्या प्रसंगीं लाट साहेब बोलले तें भाषण फार निर्दोषपर असून त्यांत त्यांनीं आपले मनोगत आपल्या मित्रमंडळीस मोठ्या खुबीवटीनें कळविले. व्हाइसराय साहेबांस मोठा आचंबा वाटला कीं ज्या गोष्टी त्यांच्या मनींमानसींही नव्हत्या त्या त्यांच्या संबंधाच्या गोष्टी वर्तमान पत्रांतून त्यांना कळत असत. प्रकृतीस हिंदुस्थानची हवा मानवत नसल्या मुळें व्हाइसराय साहेब आपल्या कामाचा राजिनामा देऊन विलायतेस परत जाणार आहेत ही बातमी अलिकडे तीनचार महिन्या पासून वर्तमान पत्रद्वारा पुष्कळ जणांस जाहिर झाली आहे. तिचें तथ्य शोधून काढण्यासाठीं व्हाईसराय साहेबांनीं आपल्या तबेतीची सिमल्याच्या पाहाडा वरून वारंवार चढून उतरून चांगली कसून परीक्षा केली व प्रकृति भक्कम पणें सुबरत आहे हें सांगतांना त्यांनीं बराच कोटीक्रम केला आहे. वर्तमान पत्रांतील वरील बातम्या वाचून त्यांचा ग्रह झाला होता कीं प्रस्तुतची मेजवानी म्हणजे त्यांच्या राजकीय कारकिर्दीच्या समाप्तिप्रीत्यर्थ असावी परंतु त्यांनीं आपल्या मित्र मंडळींचे आभार मानले कीं पांच वर्षांच्या कारकर्दींतली निम्मीं वर्षें झाल्यावर त्यांस मंडळींनी विश्रांती साठीं आपल्या गृहीं निमंत्रण केलें.या विश्रामस्थानाचा उपभोग घेण्याचें लार्ड साहेबांनीं मोठ्या आनंदानें स्वीकारलें आहे. सारांश व्हाइसराय राजिनामा देऊन परत जाणार म्हणून बातमी निघाली होती ती खोटी होय. व्हाइसराय साहेब इतर प्रकरणीं फारसे बोलले नाहींत व मणिपूरच्या संबंधानें त्यांनीं मुद्दाम होऊनच कांहीं एक उद्गार काढिले नसावेत. तथापि एके ठिकाणीं सरकारच्या राज्यपद्धति संबंधानें मोघमांत उल्लेख केला आहे त्यांत इंग्रजी अधिकाऱ्यांची योग्यता व त्यांचा नांव लौकिक या विषयीं सरकार फार खबरदारी घेईल असें अभिवचन दिलें. यावरून मणिपूर प्रकरणीं ज्या अधिकाऱ्यांच्या हातून चुका घडून त्यांस कपीपणा आला आहे व त्यांचा प्राणही खर्ची पडला आहे तेव्हां कोणती विलक्षण खबरदारी जाईल तें न कळे!

---

मणिपूरचे सेनापति त्रिकेंद्रजित यांचा बंदिवास मरणाहूनही अधिक कष्टद आहे कांकीं मरणानें मनुष्यांच्या हाल अपेष्टांचा अंत होतो व फाशीच्या शिक्षेनेंही मरण प्राप्त झाल्यास फार थोड्या निमिषांत त्या लयास जातील. पाय बिड्यांनीं पाय आंवळून टाकले आहेत, हातांस हात बिड्या अडकविलेल्या आहेत, तुरुंगांत कोंडूनही पहारा फार जबरदस्त ठेविला आहे. किंवा मनुष्यमात्रास प्राणाहूनही अधिक कांहीं प्यारा नाहीं त्या प्रमाणें सेनापतीस आपल्या प्राणाची अशा तुरुंगांतही फार मातबरी वाटत असावी. नाहीं तर इंग्रजांस शिरकमल मात्र मिळेल असें ह्मणणारा लढवय्या सेनापति व पराभव झाल्या नंतर दांतीं तृण धरून आलेला सेनापति हा एकच मनुष्य असावा. असें आमच्या स्वप्नींही आलें नसतें.

महाराजांस पदच्युत करणाऱ्या युवराजास गादीवर बसविल्या नंतर महाराज ह्मणून कबूल केलें व युवराजास गादीवर बसविणार सेनापति यांस हद्दपार करण्याचा घाट घातला हें हिंदुस्थान सरकारानें न्यायाचें केलें असें कोण ह्मणेल? हा न्याय ह्मटला तर इंग्लडच्या गादीवर दुसरा चार्ल्स बसला तेव्हां त्यांस गादीचा मालक ह्मणून पतकरावयाचें व त्यास गादीवर बसविणारा जनरल मंक यांस देशांतून हाकलून द्यावयाचें हेंही न्याय्य ह्मणतां येईल.

---

✓ रेंव्याच्या महाराणीची स्थीति फार शोचनीय आहे. तिचा लहन मुलगा तिच्या ताब्यांत नसून त्यास एका युरोपियन शिक्षकाच्या हाताखाली दिलें आहे. मागें महाराणा आसन्नमरण होता तेव्हां त्यानें सहालक्षाहून अधिक खर्च करूं नये ह्मणून सांगितलें होतें त्या ऐवजीं सध्यां बारा लक्षाजवळ खर्च आणून ठेविला आहे. इंग्रजी आफिसरांचा पगार वाढविला,व महाराणीस आवडत नव्हता असा दिवाण नेमला. या सर्व गोष्टीस सर लिपेल ग्रिफीनची पोलिटिकल एजंटास सल्लामसलत मिळाली. महाराणीचें राज्य कारभारमारांत कांहीं आंग असूं दिलें नाहीं. एकंदरीनें महाराणीच्या हक्काची पादक्रांति झाली तेंव्हा ती वैतागून अरण्यांत कंदमुळें खाऊन आयुष्याचा कालक्षेप करूं लागली पुढें व्हाईसराय साहेबांनीं खलिता धाडून तिला पुन्हां राजधानींत आणिलें होतें. परंतु अलिकडे पोलिटिकल एजंटानें पुन्हा पूर्ववत मोंगलाई सुरू केली आहे आणि सर्व प्रकारें महाराणीची दाणादाण करून सोडली आहे. सारांश चक्रवर्तिनी महाराणी सरकारच्या छत्रा खालीं रेंव्याच्या महाराणीचा असा छळ व्हावा हें फार वाईट आहे.

---

✓ नेटिव संस्थानांतील वर्तमान पत्रा संबंधानें हिंदुस्थान सरकारनें नवीन कायदा केला आहे त्या अन्वयें पोलिटिकल एजंट साहेबांस नवीन वर्तमान पत्र सुरूं करण्यास व जुनें बंद ठेवण्यास सर्व प्रकारें अधिकार दिले आहेत म्हणजे वाटेल तेव्हां वर्तमान पत्र बंद करितां येईल इतकेंच नव्हे तर त्या पत्रकर्त्यास सात दिवसांच्या आंत हद्दपार करण्याची शिक्षाही देतां येईल. पोलिटिकल एजंट राजे रजवाड्यांशीं सलोख्यानें वागतात असें फार विरळा. सर लिपेल ग्रिफीन साहेब सारखे नरपुंगव पोलिटिकल अधिकारी असले, सरकारी कागदपत्राच्या प्रसिद्धी विषयीं कडक कायदा अमलांत असला, राजे रजवाड्यां विषयीं इंग्रजी अधिकाऱ्यांचें कांक्षिखोर वर्तन सदैव चाललें आणि अशा गोष्टींस वर्तमानपत्रा संबंधाच्या कायद्याची कुमक मिळाली म्हणजे नेटिव संस्थानें रसातळास पोंचण्यास कितीसा विलंब लागणार आहे हें निराळें लिहिण्यास नको.

नेटिव संस्थानांतून देशी वर्तमान पत्रें फार मोजकीं सांपडतात, व त्यांस चांगल्या स्थितींत कायम राहण्यास राजकारस्थानामुळें अनेक विघ्नें येत असतात अशा समयीं वर्तमानपत्राच्या स्वतंत्रतेवर एवढी जबर गदा पडावी कीं वर्तमान पत्रकार म्हणजे पोलिटिकल एजटांचे सर्वथैव हस्तक बनावे इतकेंच नव्हे तर त्यांचें अस्तित्व केव्हां नष्ट होईल याचाही नेम नाहीं ही गोष्ट फार शोचनीय आहे. हिंदुस्थान सरकारच्या नेटिव संस्थानांतील वर्तमान पत्राच्या या व्यवस्थेसारखी साऱ्या दुनियेंत कोठें दुसरीकडे आढळणार नाहीं आणि इंग्रजी राज्यपद्धतीस या कायद्या मुळें निराळें लांछन लागत आहे. स्वतंत्रतेच्या माहेर घरीं निवास करणाऱ्या आमच्या राज्यकर्त्यांनीं आपल्या माण्डलिक राजे रजवाड्यांच्या राज्यांतील वर्तमान पत्रांचें स्वातंत्र्य नष्ट होईल अशा रीतीनें नवीन कायदा केला या गोष्टी मुळें ब्रिटनशाईतील वर्तमान पत्राच्या कायद्याहूनही अधिक लोकांच्या राजनिष्ठेस बाधक अशी निराळी सामुग्री तयार करून ठेविली आहे असें म्हणावें लागेल.

राजनिष्ठेस बाधक हा कायदा होईल असें आम्हीं म्हटलें आहे तें नेटिव संस्थानांतील वर्तमानपत्रा संबंधानें दुहेरी लागू पडतें. संस्थानांतील कारस्थानें फार विलक्षण असतात व राजदरबारांतून अनेक गुप्त व्यवहार चालतात अशास्थळीं वर्तमानपत्रकर्त्यास आपल्या कर्तव्यास स्मरून वर्तमानपत्र चालविणें म्हणजे कित्येक प्रसंगीं पाण्यांत राहून माशांशीं वैर करण्या सारखें होतें अशा प्रकारच्या नाजूक स्थितींत वर्तमानपत्र चालवितांना पोलिटिकल एजंटाच्या हातीं आपलें सर्वस्व गेल्या मुळें आपल्या राजे साहेबांची मर्जी संभाळून पोलिटिकल एजंटाच्या राजी खुशीनें वर्तन ठेवण्यास पत्रकर्त्यास फार दुरापास्त आहे. एका म्यानांत दोन सुऱ्या नाळगण्याचें हें व्रत पत्करणारा कदाचित मिळाला तरी राजे साहेब व पोलिटिकल आफिसर या उभयतांचें विल्याभोपळ्या प्रमाणें सरळ असलें म्हणजे खरोखर वर्तमानपत्रक-

दुसरा कोणताही उद्योग राहणार नाहीं. या सर्व गोष्टी लक्ष्यांत आणून आमचें सरकार आपला नवा ठराव रद्द करील किंवा सुधारून दुसरा करील काय?

---

# The Berar Samachar

MONDAY, JULY 20, 1891

'Opium trade in India' is a question which serves at the present day, an interesting topic to many English philanthropists on which they talk with too much familiarity and freedom. It is a question of considerable moment both to India and to England. But a true & correct view of the question is greatly distorted by the excessive and unlimited zeal of some well meaning liberals, to promote the welfare of their Indian fellowsubjects. It is a patent fact that poppy is allowed to be cultivated in great quantities in many parts of India. It is also true that the extensive cultivation of Opium is due mainly to the considerable demand for it from China and from certain limited classes in India. Many of our readers, it may be admitted, are fully aware of the horrible effects produced by the free use of Opium. It dulls and enervates the active force of intellectual faculties. It subdues and blunts the moral tone so far and so much that it degrades and degenerates the moral habits and sentiments. It impairs the body to a serious extent. It defaces, deforms and weaknes the physical frame and constitution. It not only mars the manly look but irretrievably brings it down to the level of a distorted rickety and emaciated puny stature with a disgusting and loathsome mien. These and others are among the numerous results that opium produces. We

do not deny that they are to be observed among the Chinese and among many of our own countrymen. And we cannot but, at the same time, admire and appreciate the wonderful energy and enthusiasm with which some English liberals— with Sir John Pease at their head, are proceeding in the cause of humanity, to improve the condition of their fellowsubjects in India by trying to strike at the very root of the evil. We cannot but credit them for their good intentions and good work. They have displayed honest and sincere motives and it is all the more praiseworthy in them if they manifest the same fixed bent of mind towards the material welfare of their voiceless Indian fellowsubjects. But, as remarked before, they ignore some points of material importance in the heat of controversy. Their zeal is too much to allow them to see clearly through those points. Their argument for the suppression of the 'Opium trade in India' is acceptable from a moral point of view. As far as their theory goes it is perfectly clear and allowable on all hands, that every body should be moral and temperate. That such drugs or substances or spirits as have enervating and demoralizing effects should promptly be prevented from being generally used except for medical purposes. So far then they are perfectly right. But it is highly questionable how far they can succeed to apply a practical test to their statements without looking to the practical side of the question; they fail to see the force of the statement that if the standard of morality of the masses is to be raised it should be raised as carefully and cautiously and by as slow and sure, steady and gradual attempts as wisdom may direct. It is highly improbable that at one stretch and with one stroke the low classes should be lift ordinary level. However pleasant and delighting their ideal, and however grand and elevated and magnificient their conceptions, they cannot whatsoever their intention and howsoever their zeal in the promotion of welfare, profitably adapt them to the present requirements of the people that they want to improve.

Again they hardly seem to have thought it worth while to get themselves thoroughly informed on the head through proper authorities. Sir John Pease moved his Resolution with a stirring and eloquent introduction and soon won over to his side a large number of supporters. The Government of India was not even requested to supply them with at least a rough information requisite for the justification of their measure. They seem to have either inadvertently passed over or made light of the advisability of proposing new schemes for reimbursement in the Government treasury of India. They hardly seem to have taken notice of the fact that opium trade in India contributes some five or six millions of pounds sterling. Now if the Resolution moved by Sir John Pease turns out as the final one it is binding on Indian Officials entrusted with fiscal matters, to devise means to make up for the tremendously great deficiency consequent upon the abolition of opium trade. Next comes the question how the present system of levying taxes can be remodelled to suit the coming difficulty. The easiest course, then open, will appear to be to increase it in some alarming proportions. But such a course will be highly unwelcome to all. Officials will curse it because the income tax will have to be increased. Merchants will be all unwillingly forced to pay heavy sums for duties. The hardworking and industrious peasantry will but silently and helplessly groan under the revised mode of collecting land revenue. Such a new and novel Resolution is then not only unwelcome but is sure, to cause discontent and alarm among the millions affected by it. This is a view that requires to be pre-eminently urged before all the rest. If the evil is to be altogether eradicated to its total extinction it is advisable to hold the use of opium under strong check and control; and by gradually increasing the restraints there will gradually diminish the use of opium. This and this alone is the way that we can propose to the English philanthropists to get at the desired end. The Abkari system must, we assert, be allowed to go to the wall some day or other; and the consequent deficiency should be made up for by such other means as can be most advantageously used in the public interests. Expenses that are now being profusely made should be curtailed to such an extent as would leave little or no complaint of a deficient supply of revenue. This is our wish. How far it agrees with the views of the proper authorities in the matter is another question. But we should, as our duty, always try to express our wish to those on whom it solely depends for its realization We have then so far done what seems to be our duty and hope that such amendments will be introduced in the new Resolution of the House of Commons, if it is resolved to make it a law at all, as will meet with our wishes, and serve to place our material advancement on a surer and firmer footing.

---

In his 'problems of Great Britain Sir Charles Dilke Bart. advises his countrymen to observe that tone of moderation which will tolerate the 'spirit of the age' of which the National Congress is the natural outcome:—

"Argument upon the matter is to be desired but not invective, and there is so much reason to think that the Congress movement represents the cultivated intelligence of the country that those who ridicule it do harm to the imperial interests of Great Britain, bitterly wounding and alienating men who are justified in what they do, who do it in reasonable and cautious form and who ought to be conciliated by being met half-way. The official class themselves admit that many of the Natives who attack the Congress do so to ingratiate themselves with the British Rulers and to push their claims for decorations. Our first duty in India is that of defending the country against anarchy and invasion, but our other greatest duty is to learn now to live with what is commonly called the Congress movement, namely, with the development of that new India which we have ourselves created. Our past work in India has been a splendid task, splendidly performed, but there is a still nobler one before us, and one larger even than that labour on the Irish problem to which our public men on both sides seem too much inclined to give their whole attention."

Malkapur, 16th July 1891

To

The Editor of Varhad Samachar

Twelfth July—A day which opened our Native General Library here will ever be a memorable day in the annals of Mulkapur. The building is surrounded by trees large and small through which it peeps out with Majestic grace. On the two sides of the principal entrance were erected arches over which crept the ever green with its charming windings. Inside the hall the walls were lined with auspicious mango leaves. The chairs and benches were arranged in two rows in the midst of which was prepared the seat of the President beautifully decorated by bunches of selected flowers and candle stands. At 6 P. M. the invited gentlemen began to flow in & at about 7-15 p. m. the hall was full of men who anxiously awaited the approach of our popular H. A. C. Mr. E. Marshall who cheered the throng by his appearance and entered the hall through the light of various coloured 'Havayis'. He was unanimously proposed to the chair Mr. Hari Moreshwar read the report for the Secretary. Then rose our new respectable pleader Mr. Wasudeo Balaji to deliver his short but weighty and impressive address which was followed by one, breathing nothing but loyalty, from the lips of Mr. Goolam Mahamad Saudagar of Pimpalgaon Raja. Then came the turn of the President who after dealing upon the management of the Library, thanking the Secretary Kumar Shri Harbanji who took great pains in the cause and the speakers expressing a hope to hear such a loyal speech as of Goolam Mahamad concluded his wishing the Library long life and prosperity. A few days ago a famous Bohara here poisoned himself, and nobody knows why. After a lapse of nearly a fortnight we had some heavy showers of rain yesterday which were hailed by peasants.

Yours
N. D. K.

---

## वऱ्हाड.

हवामान—गेल्या आठवड्यांत शुक्रवारीं व रविवारीं पाउसानें फार बहार करून दिली महामारीच्या उपद्रवानें आज पर्यंत अदमासें १९२ माणसें लागलीं व ६६ मेलीं आतां पाऊस चागला पडल्यामुळें उपद्रव नाहींसा होईलसें वाटतें श्री हरी काय करील तें खरें.

येथील स्माल काज कोर्टाचे क्लार्क रा. दामोदर नानाजी शिंदेकर यांची बदली खामगांवास व खामगांवचे रा. शंकरराव यांची बदली येथें झाली. येथील नाझर रा. माधवराव यांस वाशीमास बदलून वाशीचे नाझर यांस येथें नेमलें.

कर्नल बुलक सा० यांनीं पेनशन घेतल्यामुळें मि० एलिअट सा० यांची सिव्हिल आणि सेशन्स जज्जचे जागीं कामयची नेमणूक झाली व मि० आब्रई सा० यांची यवतमाळास डे० क०चे जागीं नेमणूक झाली असें ह्मणतात.

रा० रा० बंडूनाना नाझर इलिचपूर यांची वाशमास बदली झाली होती ती रहित झाली.

येत्या आगष्ट महिन्याचे ३१ वे तारखेस उमरावती येथें होणाऱ्या वकीलीचे परिक्षेस १०४ उमेदवार आहेत.

मि. सी. एच. प्राईस, ए. अ. क, मि. पंडित सुरज नारायण. अ. क., मि. केशव जयकृष्ण. ए. अ. क. आणि मि. विश्वनाथ नारायण दांडेकर, ए. अ. क. यांस अनुक्रमें वणी, इलिचपूर, वाशीम आणि आकोला या जिल्ह्यांस डे. क चे कोर्टाचे सर्व अधिकार दिले आहेत.

मि. मीर सफरअली यांनीं राजीनामा दिल्यामुळें त्यांचे जागीं जळगांव तालुका बोर्ड मध्यें कृष्णाजी मल्हार यांस मेंबर नेमिलें.

मि. माणिकशा रतनजी, खांमगांव फ. क्ला. म्याजिस्टेट आणि ए. अ. क. यांस २६० कलमान्वयें समरी चौकशीचा अधिकार दिला.

मि. गणेश बापुजी, ऑ ए. अ. क. आणि फ. क्ला. म्या. अकोला यांस चांगल्या वर्तणुकी बदल जामीन घेण्याचा व पाणी संबंधानें वगैरे हुकूम करण्याचा असे दोन जास्ती अधिकार दिले.

मि. एफ प्रिडो थर्ड क्लास अ. क. यांस ता. १ आगष्ट १८९१ पासून अगर त्या पुढें त्यास वाटेल त्या दिवसा पासून एक महिन्याची हक्काची रजा देण्यांत आली आहे.

मि. एकनाथ मोरेश्वर ऑ. ए. अ. क. यांचे कोर्टास ह्यापुढें दुसरा वर्ग अ. क. चे कोर्टाच अधिकार दिले.

---


## जाहिरात

सर्व लोकांस खालीं सही करणार यांजकडून या जाहिरातीनें असें कळविलें जातें कीं, माझा भाऊ नामें रामु वल्लद पुंजाजी राहणार पिंपरी खोद्री तालुके जळगांव हा मयत होऊन आज सुमारें ४ चार वर्षें झालीं आहेत याच्या मागें याची माणसें आहेत तीं, त्याचे दोन मुलगे नामें नामदेव व आवधूत व बायको कवती व त्याची मातुश्री या सर्वांचा त्याचे मागें मी पालन करणारा व त्याच्या स्थावर जंगम जिनगीची व्यवस्था करणारा आहे व त्या प्रमाणें करीत आहे. मी सर्वांस असें कळवितों कीं, माझ्या संमतीशिवाय माझे भावाची स्थावर जंगम जिनगी कोणी गहाण घेतल्यास अगर त्याजवर कर्ज दिल्यास त्याजबद्दलचे नफा नुकसानीचे जबाबदार जिनगी, मुलें, बायको, व आह्मी कोणीही जबाबदार नाहीं हें सर्वांस जाहीर व्हावे ह्मणून दिली जाहिरात कळावें तारीख १७ माहे जुलई सन १८९१ इ० (सही)

माधव वल्लद पुंजाजी पाटील रहाणार पिंपरी खोद्री ता. जळगांव दस्तुर खु.

---

नोटीस.

रा. रा. देवकरण गिरधारीलाल मारवाडी दुकान पिंपळगांव काळे तालुके जळगांव यांसः—

नोटीस देणार माधव वल्लद पुंजाजी पाटील रहाणार पिंपरी खेद्री तालुके जळगांव नोटिशीनें असें कळवितों कीं, माझा भाऊ रामु वल्लद पुंजाजी पाटील हा मयत होऊन आज सुमारें चार वर्षें झालीं. यास दोन मुलगे आहेत त्यांचीं नांवें नामदेव व आवधूत व बायको नामें कवती व त्याची मातुश्री हीं माणसें त्याचे मागें आहेत. व त्याचीं शेतें व घरदार ही जिनगी आहे. या सर्वांचा मी कायदेशीर पालन करणारा असून त्याप्रमाणें त्याच्या मागें सर्व कामकाज वगैरे करीत आहे. परंतु आतां नुकतेंच असें मजला समजतें कीं, आमचा भावजय नामें कवती इजपासून तुह्मी कांहीं शेतें गहाण लिहून घेतलीं आहेत. तर आपल्यास ह्या नोटिशीनें असें कळवितों कीं, माझ्या परवानगीशिवाय तुह्मी माझे भावाची बायको अथवा मुलें यांजपासून गहाण वगैरे कोणचेही प्रकारचा व्यवहार केल्यास त्याजबद्दल माझ्या भावाची जिनगी स्थावर व जंगम मुलें याजवर कोणच्याही प्रकारचा तुमचा अगर कोणचाही हक्क चालणार नाहीं. त्याजबद्दल नफा नुकसान कर्ज वगैरे जें असेल तें माझे भावाची बायको इच्या जातीवर कोणी पाहिजे तर द्यावे. जिनगीवर दिल्यास त्याबद्दलचे जबाबदार जिनगी व आह्मी व त्याचीं मुलें कोणच्याही प्रकारचे नाहींत ह्मणून दिली नोटीस कळावें तारीख १७ माहे जुलई सन १८९१ इ०

(सही.)

माधव वल्लद पुंजाजी पाटील दस्तुर खु०


---

## वर्तमानसार.

ओरेनेनटाइन प्रांतांत बंडखोरांचा उत्तरोत्तर विजय होत असून त्यांनीं तेथील गव्हरनरास पदच्युत केलें.

बनारस येथें ठोळांची एक टोळी टेहाळणी करून गेली असें ह्मणतात.

दक्षिण इराणांत टोळांनीं बहुतेक धान्याचा नाश केल्यामुळें तेथील शहाणे लोकांनीं बाह्य प्रदेशी जाणारें धान्य अर्जीनात बंद केलें आहे. हा स्वराज्या पासून फायदा!

रावळपिंडी येथें असलेल्या सैन्यांत तापाची साथ उठली आहे असें ह्मणतात.

न्यूयार्क येथें गेल्या सातव्या तारखेस चौथा खुनी आरोपीतास विजेच्या योगानें फांशी देण्यांत आलें.

येत्या हिवाळ्यांत लटक्या लढाई प्रीत्यर्थ सर्व हिंदुस्थान मिळून एक लाख रुपये खर्च होणार आहेत. दोन लाख रुपये खर्च केले ह्मणून विचारणार आहे कोण? हलवायाच्या घरावर ब्रह्मार्पण!

शनवार पेठेंत मेहुणपुऱ्यांत रा. सा. साहोनी यांचें घरानजिक जोग यांचे तीन चार महिन्यांचें मूल पाळण्यांत निजलें होतें. घराचें मागील बाजूनें एक माकड घरांत आलें व त्यानें मुलास पाळण्यांतून खालीं पडून मुलाची टाळू फोडली व दुसऱ्या थोरल्या मुलाचे मांडीस चावा घेतल्याचें समजतें.

कलकत्यास हल्लीं एक ७॥ फूट उंचीचा मनुष्य गेला असून त्याला पहाण्यासाठीं प्रेक्षकांची गर्दी होत असते.

बुखाऱ्याच्या अमिरास रशियांत रहाण्याची परवानगी मिळाली. सदरहू अमीर आपल्या बरोबर जंगी लवाजमा घेऊन सेंटपिटर्सबर्ग येथें येत्या अक्टोबरांत जातील. या अमिराच्या गैरहजेरींत रशियन फौज त्या प्रांताची सुव्यवस्था व शांतता ठेवील असें सेंट पिटर्सबर्गची ता. ९ मिनहूची तार सांगतें हें काय प्रकरण आहे समजत नाहीं.

मध्य एशियांत कापूस पिकूं लागल्यामुळें रशियांत ज्या प्रमाणानें हिंदुस्थानांतील कापूस जात होता तें प्रमाण हळूं हळूं कमी होत चाललें आहे. गेल्या वर्षी हिंदुस्थानांतील कापूस रशियांत ४० लाख रुबलचा कमी गेला आणि तो कमी गेलेला कापूस तुर्कस्थानांतून रशियास पुरवला गेला. मध्य एशियांत हल्लीं जो कापूस विकत आहे तो अमेरिकेच्या कापसाशीं बरोबरी करूं शकतो असें कित्येकांचें ह्मणणें आहे. हा कापूस कितपत चांगला आहे याची परीक्षा करण्यासाठीं एका फ्रेंच गिरणीनें या कापसाचे १०० गठ्ठे विकत घेतले आहेत हा कापूस रशियांतील गिरण्यांत तर उपयोगीं पडण्यांत येतोच तसेंच तो मास्को येथें ही जातो या कापसाचा हल्लींच्यहूनही जास्त फैलाव होण्यास भांडवलाचीच काय ती उणीव आहे. यावरून हिंदुस्थानांतील कापसाच्या व्यापारास कांहीं दिवसांनीं मोठा धक्का बसेल असें दिसत आहे.

असें ह्मणतात कीं, निजाम सरकारच्या मनांत हैद्राबाद येथें लवकरच सर्व जगांतील मालाचें एक जंगी प्रदर्शन भरवावयाचें आहे.

उज्जनीचे बळवंतराव बुटी यांजसंबंधानें झालेल्या अन्याया बद्दल पार्लमेंटांत सेमूरके यांजकडून अंडर सेक्रेटरी साहेबांस प्रश्न विचारण्यांत आला आहे.

मेसर्स विराजराई साकरलाल, विष्णु नारायण भातखंडे आणि अनंत विश्वंभर साखरदंडे यांस मुंबईच्या हाय कोर्टानें वकिली करण्याची सनद मिळाली.

हल्लीं पुण्यास क्रिकेटचे डाव चालूं असून नाच चालूं आहेत!

पत्रें पोंचविणारीं खबुतरें किती जलद जातात याची परीक्षा पहाण्यासाठीं बव्हेरिया प्रांतांतील न्युरेंबर्ग येथून कांहीं खबुतरें व्हिएना ( येथें जाण्यासाठीं उडविलीं. यां पैकीं पहिलीं खबुतरें व्हिएना येथें ४ तास ११ मिनिटांनीं दाखल झालें व दुसरीं ४–४ तास ४० मिनिटांनीं दाखल झालीं. न्युरेंबर्ग आणि व्हायना यांच्या मध्यें ३२० मैलाचें अंतर आहे एकंदर २२० खबुतरें उडविलीं होतीं व तीं सकाळीं ६॥ वाजतां उडविलें तीं संध्याकाळीं ६॥ वाजतां सर्व व्हिएना येथें दाखल झालीं!

पार्लमेंटांत ता. ८ रोजीं फुकट शिक्षण देण्याबद्दलचें बिल पास झालें.

लार्ड व लेडी हारिस हे येत्या सप्टेंबरमध्यें व्हाइसराय साहेबांस भेटण्या करितां सिमल्यास जातील.

जपानांत लढाऊ जहाजें उत्तमप्रकारचीं तयार व्हावयास लागलीं आहेत.

कलकत्यांत रेशमाची नवी गिरणी निघाली आहे त्या गिरणीचा माल बहुतेक सगळ्या ब्रह्मदेशांत खपतो.

युरोपांत प्रतिवर्षी सुमारें ६०,००० लोक आत्महत्या करतात.

मणिपूरच्या सेनापति तर्फें मि. मनमोहन घोस हे वकिलीचें काम चालवितील.

सर मथुस्वामी आयर यांस मद्रास हायकोर्टचे आ० चीफ जस्टिस नेमिलें.

जर्मनी, आस्ट्रिया व इटली यांजमधील तहनामा झाला आहे तो ६ वर्षे पर्यंत अमलांत राहील असें ठरल्याचें समजतें.

मणिपूरच्या राजघराण्यांतील लोकांच्या हातापायांत बेड्या घालणें ह्मणजे मोठा जुलूम आहे. त्यांचें राज्य हिसकावून घ्यावयाचें व व त्यांच्या हातापायांत बेड्या घालून त्यांना कोर्टापुढें आणावयाचें हें किती न्यायीपणाचें वर्तन आहे! ! सु० प०

प्रचंड जलस्तंभ—वायव्य प्रांतांतील जिल्ह्यांत बुलिया येथें कलेक्टर कचेरी समोर ता० ६ मिनहू रोजीं भागीरथी नदीवर प्रचंड जलस्तंभ झाला होता. तो सुमारें एक तासभर एकसारखा उभा होता नंतर तो विरघळला. विरघळण्या बरोबर भयंकर पर्जन्य पडला त्यांत लहान मोठे मासे आणि कांसवें जमिनीवर पडलीं. असें टाइम्स आफ इंडियास आलेल्या तारे वरून समजतें.

आस्ट्रेलिया देशांत एक १६ वर्षाचा मुलगा उत्पन्न झाला आहे, त्याचे शरीरावर ४ इंच लांब केंस असून डोकीचे केस ४ फुट लांब आहेत, नखें ४ इंच लांबीचीं आहेत, हा योगी बोलत नाहीं पण प्रयत्नांत असतो असें तिकडील बातमी वरून समजतें.

त्रिनेत्री त्रिशृंगी गौ—बंगाल्यांत बुरिसाल येथें एका मनुष्यानें एका गाईचें हल्लीं प्रदर्शन मांडिलें आहे. त्या गाईला तीन डोळें व तीन शिंगें असून सदहू गाय आपणांस हिमालयांत एकानें दिली व तिला स्पर्श केला तर असाध्य रोगी हो बरे होतात, असें त्या गाईचा मालक सांगतो. पैसे मिळविण्यास त्याला हा एक व्यापार साधला आहे.

योग्य सूचनाः– रा. सा. बळवंत रामचंद्र सहस्त्रबुद्धे खानदेशचे डे. ए. इन्स्पेक्टर, यांणीं थोडे दिवसां पूर्वी धुळ्यांस एक व्याख्यान दिलें. त्यांत विवाह काला विषयीं पूर्वापार विचार सांगितला व शेवटीं अशी सूचना केली कीं म्याट्रिक्युलेशन परिक्षेस जे उमेदवार घ्यावयाचे ते अविवाहित असल्या शिवाय न घेण्याचा युनिव्हासिटीनें टरांव केल्यास बालविवाह पुष्कळ बंद होतील सूचना योग्य आहे. न्या० सिं०

सोलापुर–येथें के. रा. मोहनसिंग चव्हाण यांचे मळ्यांत शेळीचें एक करडूं आहे. त्याला नराचें व मादीचें अशीं दोन्हीं इंद्रियें आहेत, इतकेंच नव्हे, पण त्या इंद्रियांचे व्यापार देखील चांगले यथास्थित चालतात हा विलक्षण प्राणी लहान असेपर्यंत फारसा चमत्कार वाटला नाहीं. पण हल्लीं तो वयांत असल्यामुळें याच्यापासून शेळ्यांना गर्भधारणा होत आहे; मात्र याला स्वतःला अद्यापि गर्भधारणा झाल्याचें दिसत नाहीं.

मद्रास इलाख्यांत दुष्काळाचे चिन्ह चांगलें दिसं लागलें आहे

बंगालच्या हायकोर्टानें मुनसफीच्या यादींत वकील लोकांचीं नांवें दाखल करण्याचें बंद केलें आहे. कारण जागा नाहींत.क० त०

दोषमुक्त होऊन सुटला.– मुंबईच्या शेहरांत राजाबाई मानेक्यावरच्या दोन स्त्रियांचे अपघाताच्या आरोपावरून ज्या माणिकजी असलाजीवर खटला चालला होता तो निर्दोष ह्मणून जूरीनें ठरवून त्याला सोडून [illegible] काय करितात ते पहावें. जज्जानें एकंदर साक्षी पुरावा खोटा असें ठरविलें! ह्या अपघाताचे संबंधानें मुंबईचे पोलिसावरची जबाबदारी अधिक झाली असें ह्मणण्यास हरकत नाहीं. ज्ञा.च.

---

नोटीस

हंबीरजी वल्लद भिवमजी रहाणार महान तालुके अकोलें यांसः—

नोटिशीचें उत्तर देणार धनाजी, गणाजी व परशराम वल्लद विक्रमजी कुणबी रहाणार महान. नोटिशीनें असें कळवितों कीं, तुह्मी तारीख ४ जुलई सन १८९१ इसवींचे वैदर्भ पत्रांतून नोटीस दिली ती पावली. त्यांत लिहिलेला मजकूर सर्व खोटा आहे. आह्मी हल्लीं ज्या घरांत रहातो तें घर आह्मी सिताई मर्द रामजी ठाकरीन हिजपासून खरेदी घेतलें आहे. व खरेदी रस्त रीती प्रमाणें नोंदून वगैरे घेतलें आहे. तुह्मी नोटिशींत कळवितां कीं, ती जागा कोणत्याही प्रकारें तुमची [illegible] विनाकारण त्रास देणें आहे. आतां तुम्हांस ही नोटीस देणें आम्हास भाग पडले. याचें कारण तुह्मीच आहां. याज करितां ह्या नोटिशीचा खर्च तुह्मा पासून भरून घेतला जाईल. व ज्या घरांत आह्मी रहातो हें वर जर तुमचें आहे तर तुह्मी खुशाल फिर्याद करा त्याज बद्दल आमचें तुह्मास कांहींच ह्मणणें नांहीं. आतां तुह्मी विनाकारण कुरापत काढून त्रास देतां याज बद्दल कोणत्याही प्रकारचें काम चालविणें आह्मांस भाग पडल्यास त्याचा निकाल होई तो पर्यंत जो खर्च व आमची जो नुकसान होईल ती सर्व तुमचे पासून रीती प्रमाणें भरून घेतली जाईल. ह्मणून दिलें नोटिशीचें उत्तर कळावें तारीख १९ माहे जुलई सन १८९१ इ०

( सही. )

धनाजी गणाजी व परशराम
वल्लद विक्रमजी कुणबी
रहाणार महान याच्या
हातची नि० असे.

---

नोटीस

मोती धोबी रहाणार अडगांव बुजरुख यांसः—

नोटीस देणार सोन्या वल्लद नरो धोबी रहाणार अलवाडी ता० अकोट. नोटिशीनें असें कळवितो कीं, माझी बायको नामे तानी इजला तुह्मी माहेरपणा करितां आठ पंधरा दिवस गेल्या दिपवाळींत नेली होती. दिपवाळी झाल्यावर मी तिजला आणण्या करितां दोन चार वेळां आलो. व बरोबर चार जात भाई व पंचही आणिले होते. मी आलो तेव्हां ती अकोटास मुकाजी धोबी याच्या घरीं गेली असें समजलें. नंतर मी चार पंच घेऊन अकोटास मुकाजी याच्या घरीं गेलो परंतु मुकाजी यानें सांगितलें कीं, मी तुमचे बायकोस आणले नाहीं. मोती धोबी यानें आणली आहे. तर त्याजकडे जाऊन तुह्मी तिजला घेऊन जा. अशा प्रकारानें इतके दिवस मजला शिणवीत आहा तर तुम्हास या नोटिशीनें असें कळवितों कीं, नोटीस पावल्या पासून पंधरा दिवसांचे आंत तानी इजला [illegible] त्यासुद्धां आणून घालावी. असें केलें नाहीं तर तुम्हावर कोर्टांत फिर्याद करून ह्या नोटिशीचे खर्चासुद्धां अखेर निकाल होईपर्यंत जे नुकसान होईल तें सर्व भरून घेतले जाईल ह्मणून दिली नोटीस सही तारीख १३ माहे जुलै सन १८९१ इ०

( सही. )

सहीची निशाणी सोन्या वल्लद नरो धोबी रहाणार
अळवाडी ता० अकोट
यांच्या हातची असे.

---


## जाहिरात.

एलिचपूर येथें हांणास सर्व प्रकारचा माल कोणास पाहिजे असल्यास आह्मांस कळवावें. माफक कमिशन घेऊन पाठवीत जाऊं. विशेष माहिती करितां टिकीट पाठवा.

जी. डी. कावेटकर
मर्चंट आणि कमिशनर एजंट
शहर एलिचपूर

---

## सचित्रक्याटलाग.



आर. डी. कानिटकर
आणि कंपनी
मुंबई गिरगांव याचा नवीन तऱ्हेचा इंग्रजी किंवा मराठी अर्ध्या आण्याचें तिकिट पाठविल्यास मिळेल.


---

☞ हें पत्र अकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सहामाही " ३ " ८
सालअखेर " ७ " १८
किरकोळ अंकास............... ४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस ......०१

Six monthly...........3 " 8 as
Single copy..............................4as

Advertisements
Below 10 lines...2 Rs.
per line over10...4 as
Repetition per line 3as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXV — AKOLA MONDAY 27 JULY 1891 — NO 29

वर्ष २५ — अकोला सोमवार तारीख २७ माहे जुलै सन १८९१ इ० — अंक २९

**सचित्रक्याटलाग**



आर. डी. कानिटकर
आणि कंपनी
मुंबई गिरगांव ह्याचा नवीन
तऱ्हेचा इंग्रजी किंवा मराठी
अर्ध्या आण्याचें तिकिट
पाठविल्यास मिळेल.

वऱ्हाडसमाचार

मिति आषाढ वद्य ७ शके १८१३

डाक्टर रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांनीं आपल्या गतभर्तृका कन्येचा राजश्री पाणंदीकर यांशीं पुनर्विवाह केला ही गोष्ट त्यांनीं आपल्या ज्ञातीच्या म्हणजे गौड सारस्वत ब्राह्मणाच्या शिष्टाचारास अनुसरून केली नाहीं म्हणून त्या ज्ञातींतील मुंबईच्या कांहीं गृहस्थांनीं डाक्टर साहेबांस बहिष्कृत करण्या निमित्त सभा भरविल्या त्या वेळीं जुन्या नव्या मतांच्या लोकांचा जंगी वादाविवाद होऊन बहिष्कार प्रकरणाचा निकाल न होतां उभय पक्षांमधील दुही व फाटाफूट इतक्या विलक्षण थराला पोंचली कीं मारामारी पायपोसापायपोशी इत्यादि हलकट प्रकार दृष्टीस पडले. बहिष्काराचा व अंक्त पणाचा हा वाद अजून धुमसत आहे व त्या धुमचक्रीचें स्वरूप गोंवें मुक्कामच्या सारस्वत ब्राह्मण ज्ञातीमध्यें दिसलें. पुनर्विवाहाच्या पक्षाच्या मंडळीस तेथील लोकांनीं देवालयांत येण्याची मनाई केली आहे व त्या मनाईला गोंवें सरकारची परवानगी मिळाली आहे असेंही समजतें. उद्यां गोंव्यास बहिष्काराच्या प्रकरणाचा अखेर निकाल लागणार आहे.

डाक्टर भांडारकर किंवा त्यांचे अनुयायी आप्तमित्र या बहिष्काराला भिणारे गृहस्थ नाहींत किंबहुना हीं सर्व विघ्नें लक्षांत आणून त्यांनीं कंबर बांधली आहे व ज्ञातीच्या विरोधी अभिप्रायाची त्यांस कांहीं पर्वा नाहीं. तेव्हां भांडारकर प्रभृति गृहस्था संबंधानें बहिष्काराच्या वादाची कांहीं मातबरी नाहीं. पुनर्विवाह ज्ञातीस संमत आहे किंवा नाहीं, नसल्यास ज्ञातीच्या हातीं अपराधी मंडळीस पारिपत्य करण्याचें सामर्थ्य कितपत आहे, व रिपत्याचा परिणाम गोळाबेरजेनें व्यव चाली रीतींत कितपत होईल इचा विचार या बहिष्कार प्रकरणावर होणार आहे म्हणून या या वादा विषयीं कांहीं गोष्टी त आहों.

लग्नाच्या चालीरीति इतक्या हल्लीं खिळल्या आहेत कीं त्यांचें उल्लंघन परिणामीं सुखावह होईल अशा प्रकारें थोडा बहुत प्रयत्न समाजांतील आग्रणी व धुरंधर लोकांनीं केला पाहिजे व तो शिष्ट मंडळीस आवडेल व चालीरीतींनीं सर्व पैव बद्ध झालेल्या जनसमूहास आवडला नाहीं तरी द्वेषभाव, मत्सर, फाटाफूट, अवहेलना वगैरे प्रकारांनीं संयुक्त न होईल अशा खोल व प्रबुद्ध विचारानें केला पाहिजे. मुलामुलींच्या वयाची ईयत्ता हळूं हळूं वाढत आहे व प्रसंगानुसार मुलाची संमत्ति विचारतात तरी स्वयंवराची चाल प्ररूढ होण्या साठीं खटपट करणें वृथा आहे. हिंदुस्थानांतील लग्नादि शरीर संबंधाचा विचार सर्वोपरीनें मातापितरांच्या सल्यानें झाला पाहिजे व त्यांतच जनसमूहाचें एकंदरीनें हित आहे. प्रस्तुत वयाचें प्रमाण, हुंडा व मानपानादि सोहळा वगैरे प्रकरणांत दुजोरी सुधारणा होत आहेत म्हणजे बालविवाह, लग्नादि कार्या निमित्त कर्जबेंचानें होणारी संसाराची दुर्दशा वगैरे घातुक प्रकारांनीं उद्भवणारे सहस्रावधि अनर्थ लोकांच्या नजरेसमोर असल्या कारणानें आणि निर्धनता बळावत चालली, प्रपंचाचा बोजा दुस्सह वाटूं लागला, दुबळी प्रजा निपजूं लागली, मुलाबाळांचें संगोपन करून त्यांच्या संसाराची इमारत उभारणें म्हणजे निवापाड दुर्घट गोष्ट वाटूं लागली आहे अशा तऱ्हेच्या कालचक्राच्या सपाट्यांत चुराडा होत चालल्या कारणानें लग्नाच्या चाली रीतींत आवश्यक सुधारणा क्रमाक्रमानें दिवसानुदिवस होत आहेत. व त्या संबंधानें सदोदित वादविवाद होऊन लोकांचे विचार इष्ट मार्गाकडे वळत आहेत ही गोष्ट चांगली आहे.

फार करून पुनर्विवाहाच्या चाली संबंधानें प्रचंड मतान्तर झालें पाहिजे. ही चाल बंद ठेवणें किंवा चालूं ठेवणें याविषयीं लोकांचीं मतें स्थिर नाहींत. कांहीं गृहस्थ पुनर्विवाहाच्या पक्षाचे प्रोत्साहन करतील, कांहीं पुनर्विवाहाच्या वयाच्या संबंधानें ईयत्ता ठरवाव्या ह्मणतील, अक्षतयोनींच्या विधवांचा पुनर्विवाह होत जावा व क्षतयोनी विषयीं पुनर्विवाह निषिद्ध असावा असा धरबंध कांहींजण इच्छितील, कांहींजण विधुरावस्थेंत ऋतुस्नात पोक्त बायको संपादण्यासाठीं लोकाचारास न जुमानतां अपंक्त राहणें पतकरतील, कांहीं बाणीदार गृहस्थ परिभुक्त स्त्रियेचें पाणिग्रहण स्वतः पुरतें करणार नाहींत, कांहीं भेकड विधुर आपल्या मुलाबाळांच्या शरीर संबंधादि प्रकरणांत सुस्थिती राहावी व बहिष्कृताच्या सपाट्यानें होणारी नानाविध हानि व लोकापवाद टाळावे ह्मणून पुनर्विवाहाच्या पाळीच्या ऐन सुमारास जुन्या प्रचारा प्रमाणें लग्न करितील तरी पुनर्विवाह त्यांस मनापासून आवडत असून इतर सांसर्गिक कारणामुळें तो नाकबूल करितील इत्यादि भिन्नमतांच्या लोकांचा पुनर्विवाहपक्षांत समावेश केला ह्मणजे लोकांच्या मतांस काडीमात्र स्थैर्य पावलें नाहीं हें कळून येईल. पुनर्विवाहाचे कट्टे द्वेष्टे शास्त्रोभिक्षुक, व जुने दुराग्रही गृहस्थ तर पुनर्विवाह हीं असें तोंडून दुसऱ्यांस काढूं देणार नाहींत व त्यांचा पगडा समाजावर अद्याप कायम असल्या कारणानें बहिष्कार किंवा प्रायश्चित्तें यांचें स्तोम माजलें आहे.

प्रस्तुत स्त्रियेच्या पुनर्विवाहा संबंधानें हिंदु लोकांतील फक्त उच्च उच्च वर्णाविषयीं प्रश्न आहे कांकीं इतर जातींमध्यें पुनर्विवाह प्रचूर आहेत व त्यांच्या पुनरावृत्तिबद्दलही कांहीं मर्यादा नाहीं. हल्लींच्या मनूप्रमाणें कायद्यान्वयें पुनर्विवाहा पुरतें आपल्या देहावरील स्वामित्व विधवेला पोंचतें तेव्हां समाजाच्या रूढी व मतें हीं झुगारल्यास तिला स्वयंवर पहाण्याची मोकळीक आहे. व अशी कोणी निर्भीड बाई निघाल्यास तिला दाही दिशा मोकळ्या आहेत व त्यांचा शोध समाचार व कुशल पहाण्यास मंडळीही निघाली आहे. तेव्हां पुनर्विवाहाची नड काय ती गृहीशिक्षेत नाहली या अबलेविषयीं आहे आणि जोंपर्यंत लोकांच्या विचारांत फरक होणार नाहीं तों पर्यंत त्यांचें दुर्दैव त्यांच्या पुनर्विवाहास आड येणार आहे. आतां ही गोष्ट कबूल केली पाहिजे कीं समाजांतील चाली रीती संबंधानें स्वैर वर्तन केलें तरी बहिष्काराची मोठी भिती असते तो बहुतकरून पुनर्विवाहित दंपत्याच्या अपत्या संबंधानें विशेष असते. आजि तिशाही तोड कांहीं निघेल कीं नाहीं असें सध्यांच्या व मागील पुनर्विवाहाच्या वादविवादाच्या परिणामावरून सहजीं कळून येईल. तेव्हां पुनर्विवाहितांची निराळी जात होत जाईल व देशस्थ, कोंकणस्थ व कऱ्हाडे यांच्या मधील लग्नादि व्यवहार संबंधानें खटपटी चालल्या आहेत त्याप्रमाणें त्या अपंक्त जातींशीं सर्व व्यवहार आपोआप कालें करून चालूं होतील. सारांश, धर्माचारांस भिऊन कांहीं पुनर्विवाहाची चाल पडणार नाहीं तेव्हां ज्या गृहस्थांस सावनस मुश्री सांपडेल त्यांनीं आपल्या मनगटाच्या जोरावर पुनर्विवाह करावेत. आणि त्यांच्याच हातून ही सुधारणा होण्या सारखी आहे. पुनर्विवाह साधनसामुग्रीच्या विपुलतेशिवाय करणें ह्मणजे मात्र शहाणपण होणार नाहीं.

कायद्यानें स्त्री पुरुषांस स्वतांच्या लग्नासंबंधानें सर्व हक्क पोंचतात आणि कायद्यानें निषिद्ध नात्यांतील लग्न खेरीज करून त्यांस वाटेल त्या मार्गानें जाण्यास कोणाची मनाई नाहीं तरी आमच्या मतें सर्वांनीं सरसकट लग्नें करणें ही गोष्ट तूर्तच्या स्थितीस घातुक आहे. प्रजावृद्धि फार जबर दडावयानें बळावत आहे, पोटापाण्याची नीटशी सोय लागण्याची मारामार पडते अशा समयीं पुष्कळजण अविवाहित राहून संभोगादि व्यापारांत व्रतस्थ राहतील असे नियम समाजानें घालून देणें फार हितावह आहे. सर्व आयुष्य ब्रह्मचर्य व्रतांत घालविणें फार दुर्घट आहे तरी त्यासंबंधानें फार कडक शिक्षा लोकांस लावण्याचा काल समीप आला आहे. तेव्हां पहिल्या लग्नासही अर्थ शास्त्र दृष्ट्या अपवाद आहेत तेव्हां लग्नाच्या पुनरावृत्तीस किती व्यत्यय व अपवाद असावेत ही अटकळ प्रत्येकानें वस्तु स्थिती प्रमाणें केली पाहिजे. हिंदूमधील वरिष्ठ वर्णाखेरीज खालील जातींत पुनर्विवाहा संबंधानें प्रतिबंधात्मक नवीन शिष्टाचार पडला पाहिजे.

ब्राह्मणादि ज्ञातींमधील पुनर्विवाहा विषयीं कांहीं जुन्या व नव्या मताच्या लोकांपैकीं विद्वान व अनुभवी गृहस्थांचा असा अभिप्राय आहे कीं, अक्षतयोनीच्या अवस्थेंतील बालविधवांचे पुनर्विवाह रूढींत यावेत. ह्मणजे वैधव्यदुःखाचा परिहार मनुष्यानें योग्य प्रकारें केला व पुनर्विवाहाच्या नादानें फार भलतीकडे उडी न घेतां सर्वांस संमत पडेल असा मार्ग घालून दिल्या सारखें होईल. ईश्वरी संकेताप्रमाणें संसारांतील सुखदुःखाचा ओघ ज्या गतीनें जाईल त्याबरोबर प्रवाहाच्या उलट दिशेस फारसें न जातां मनुष्यानें यथाशक्ति मार्ग क्रमण करावें हें चांगलें. मरणाच्या प्रकृति स्वभावा मुळें सहस्रावधि दुःखें व अनर्थ संसारी मनुष्यावर येऊन आदळतात त्यातून गतभर्तृका स्त्रियांना सर्वांस पुनर्विवाहाचा दरवाजा खुला असावा हें इष्ट नाहीं. सर्व गोष्टी अनुकूल असूनही सन्यासी व्रताची दीक्षा घेणाऱ्या व त्या प्रमाणें पापशुद्ध सर्व मान्य वर्तन ठेवून इश्वर भक्ती मध्यें उत्तम लोकांची प्राप्ती व्हावी म्हणून 'देह जावो अथवा राहो। पाण्डुरंगीं एकचि भावो' या साधुवाक्या प्रमाणें वागणाऱ्या विधवा व त्या प्रमाणें विधुरही समजतांत अवश्यमेव पाहिजे आहेत आणि अशा विधवांस आम्ही पुनर्विवाहित स्त्रिया पेक्षां अगदीं परमपूज्य मानतो. या प्रसंगीं आम्हांस असेंही कळविणें भाग आहे कीं पुरुषांना वाटत असेल कीं कितीही बायका मेल्या तरी त्यांस पुन्हा लग्न करण्याचा जसा जन्मतःच परवाना मिळाला आहे किंवा त्यांना वेश्यागमन करण्यांत कांहीं अनीतीचें कृत्य वाटत नसतें ही गोष्ट पुरुष वर्गास लांछनास्पद आहे.

पुनर्विवाहित दंपत्यास सध्यां प्रथम विवाहित दंपत्यां पेक्षां फार थोरवीच्या व मानमान्यतेच्या पदव्या देण्याचा रिवाज आहे त्याचा अर्थ इतकाच कीं पुनर्विवाह विरळा होतात आणि त्याची तर थोडीशी जरूरी आहे तेव्हां अर्थ शास्त्राच्या नियमा प्रमाणें दुर्मिळता व जरूरी या दोन्ही कारणामुळें पुनर्विवाहाची फाजील किंमत वाढली आहे ज्या राष्ट्रांत व ज्या लोकांत पुनर्विवाहाची रूढी आहे त्या राष्ट्रांत पुनर्विवाहित दंपत्यास अ-

नेकप्रकारें गौणत्व येत असतें तेव्हां ब्राह्मणादि उच्च वर्णांत पुनर्विवाहाचो चाल सुरूं झाल्यास लग्नाच्या आवृत्तीच्या संख्यें प्रमाणें विवाहित स्त्री पुरुषांस समानामध्यें खालच्या पायरीचे गणतील ही गोष्ट अगदीं उघड दिसते. हल्लीं शरीर संबंध ठरविण्याच्या समयीं कुलशील, आचारविचार, घराण्याचा लौकिक इत्यादि प्रकरणीं बारीक चौकशीं करितात त्या प्रमाणें पुनर्विवाहितांच्या मुलामुलींच्या संबंधानें प्रश्न निघाल्यास लोक वरील चौकशींत नाकें मुरडतील, कांहीं तरी दोष ठेवतील असें व अशा प्रकारचे अडथळे आपले लोक कितीही सुधारणेच्या आग्रहस्थानीं जाऊन बसले तरी नाहींतसे होणार नाहींत असें शोधक इतिहासवेत्त्यांचें मत आहे.

---

माणिपूर प्रकरणीं हाऊस आफ लार्डसच्या सभेमध्यें जंगी वादविवाद झाला त्यांत लार्ड रिपन साहेबांनीं फार खुलाशानें सर्व गोष्टी कळवून हिंदुस्थानचे दोष चांगलें व्यक्त करून दाखविले. त्या दोष परंपरेची माला अखेर कोणाच्या गळ्याशीं फांसा प्रमाणें जाऊन विलगली आहे हें यमाच्या दरबारच्या दरवाज्यांशीं बसलेल्या राजपुत्रांच्या वाणोच्चारणानें कळून येईल. येत्या पहिल्या तारखेस या राजपुत्रांचा अर्ज दाखल झाल्यावर व्हाइसराय साहेब चौकशी करून अखेर निकाल सांगणार आहेत. पार्लमेंटांतील भवतिनभवति वरून एवढ्या मात्र गोष्टी निर्णयात्मक ठरल्या आहेत कीं मणिपूर संस्थान खालसा होणार नाहीं व हिंदुस्थान सरकारच्या पदरीं कांहीं चुका अचानक पडत.त.

शिरजोरपणा चालूं नये ह्मणून अक्कलवान व शूर मुत्सद्दी कायम राहूं देणें नीट नाहीं असें विधान सरजान गोर्स्ट यांनीं केलें त्याचा अव्हेर केल्याची कितीही अश्वासनें सरकारनें दिलीं तरी मणिपूर प्रकरणीं सरकारचा वर्तनक्रम त्या विधानास अनुसरून होता व इतर नेटिव संस्थानांतूनही त्या विधानाचें प्रत्यंतर दृष्टी समोर येत असतें असा प्रजाजनांचा दृढ ग्रह होत चालला आहे तेव्हां सरकारावर गॉर्स्ट साहेबांच्या ह्मणण्यानें मोठी जबरदस्ती येऊन पडली आहे कीं, त्यांनीं लोकांचा विश्वास संपादण्यासाठीं फार खबरदारी घेतली पाहिजे.

नेटिव संस्थानाच्या संबंधानें दरबार ह्मणजे पोलिस कोर्टाहून त्याला अधिक अर्थ समजूं नये ह्मणून पुष्कळांनीं आपले अभिप्राय प्रगट केले तरी एकंदरीनें विलायतेंतील बहुमत अशा अर्थास प्रतिकूळ आहे व तिकडील वर्तमानपत्रें दरबारांत सेनापतीस पकडण्याच्या हुकुमाबद्दल सरकारास सर्वथैव दोष देतात. दरबाराला पोलिस कोर्टाची व्याख्या लागूं करण्यासाठीं मागील दोन तीन उदाहरणें दाखल्या सारखीं नमूद केलीं होतीं तीं ही कोणास पसंत पडलीं नाहींत इतकेंच नव्हे तर अतःपर ते दाखले पुढें आणू नयेंत ह्मणूनही बहुत पार्लमेंटाच्या सभासदांनीं समेंत कळविलें.

---

कलकत्त्या कडील वर्तमान पत्रांतून एक तार प्रसिद्ध झाली आहे त्यावरून माणिपूर कडील इंग्रजी लष्करांतील कांहीं अंमलदारांनीं मणिपूर नजिकच्या खेड्यापाड्यांत विलक्षण तऱ्हेनें लुटालूट केली असें समजतें. तारीख २९ जूनच्या सुमारास दोघा तिघा राक्षसी साहेबांनीं कांहीं मणिपुरी लोकांच्या घरीं जाऊन त्यांची मालमत्ता लुटली, गुलामसिंग नांवाचा एका खंबीर मनुष्यानें पुष्कळ अडथळा केला परंतु त्या दुष्टांनीं त्याच्या तोंडांत पहार खुपसून दांत पाडले व अशा प्रकारची अनेक अमानुष कृत्यें करून त्यांनीं सोनें, चांदी, व बहुमोल वस्त्रावरणें हिसकाऊन मालकांस निवदान देण्याची मात्र कृपा केली. लढाई चालूं नसतां, सर्व ठिकाणीं शांतता होत चालली असतां देखील अशी भयंकर उदाहरणें ऐकूं येतात हे इंग्रजांच्या कीर्तीस कलंक लावणारें आहे. तेव्हां सरकारांतून वरील बातमीच्या खरेपणा विषयीं फार कसोशीनें चौकशी होऊन अपराध्यांस जबर शिक्षा झाली पाहिजे ह्मणजे सरकारच्या न्यायीपणाच्या ब्रीदास थोडा बहुत वास्तविक अधिकार पोंचेल. असेंही ह्मणतात कीं एका बिचाऱ्यानें लष्करच्या वरिष्ठाकडे ओरड केली तेव्हां त्यास त्याची चीजवस्तु परत न करितां फाटक्या तुटक्या चिंध्या व भिकार पदार्थ त्याच्या पुढें मांडून नाना प्रकारें त्यांची अवहेलना व छळ केला.

लढाई सुरूं करावी किंवा लढाई शिवाय मणिपूरवाल्यास दुसरा प्राण संरक्षणाचा उपाय राहूं देऊं नये आणि जिवावर बेतल्या नंतर मणिपूरच्या राजपुत्रांनीं आपल्या लोकांकडून कांहीं साहेबांची चांगली खबर घेतली ह्मणून त्या इमानी चाकर लोकांस फौजदारी व लष्करी कायद्या अन्वयें फांशीच्या शिक्षा द्याव्या. हें जर न्याय्य आहे तर त्या धामधूमीच्या पश्चात किंवा राजवाडा व मणिपूर सर करून हस्तगत केल्यावर दारू गोळ्यानें देवाच्या मूर्ति उडवाव्या, लोकांस बळी देण्यासही चुकूं नये, लुटालूटी वगैरे त्या रितीनें कराव्यात वगैरे गोष्टी बद्दल चौकशी होऊं नये व अपराध्यांचा गत कृत्या बद्दल जाब घेतला जाऊं नये हा न्याय कोठला हें समजत नाहीं. बळी तो कान पिळी हें न्याय तत्व सरकारानें प्रतिपादिलें नाहीं तोंपर्यंत आह्मी प्रांजलपणें सरकारची विज्ञप्ति करितों कीं त्यांनीं मणिपूर प्रकरणीं इंग्रजी लष्करांतील लोकांच्या वऱ्यावाईट कृत्या विषयीं पक्का शोध करून सर्व खरी हाकिकत जाहिर करावी ह्मणजे लोकांचे कुतर्क लयास जातील व सरकारच्या चांगल्या वर्तना विषयीं लोकांस समाधान वाटेल.

---

निजाम सरकारच्या संस्थानाचा १२९८ फसलीचा वार्षिक रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे त्या वरून त्या संस्थानचा उत्कर्ष व भरभराटी उत्तरोत्तर होत असल्या विषयीं चांगली खात्री होईल. थोरले सर सालरजंग यांच्या तोडीचे मुत्सद्दी फार विरळा आढळतात तरी त्यांच्या पश्चात् सर अस्मानजहा यांनीं आपल्या दिवाणगिरीच्या कामांत संस्थानची व्यवस्था सुरेख ठेविली आहे. व हिंदुस्थानांतील या पहिल्या प्रतीच्या संस्थानाची गणना राज्य व्यवस्थेच्या प्रकरणीं चांगल्या संस्थानांत होत असते हें सरअस्मानजहा यांस भूषणावह आहे. रिपोर्टाच्या फसली शकांत मोजणी खात्याचें काम बरेंच झालें असून ३२० खेड्यांची मोजणी होऊन ७१८९३५ एकर जमिनीवर साऱ्याची आकारणी झाली. जकातीच्या खात्याचें उत्पन्न ९० ½ लाख रुपये झालें आहे व अबकारी खात्याचें ३० ½ लाख आहे. हैद्राबाद संस्थानांत एक विलक्षण गोष्ट दिसून आली कीं २८,३७,२७१ पत्रें साऱ्या वर्षांतून रवाना झालीं व ज्या भागला एका पोस्ट आफिसाचें प्रमाण पडतें त्या भागाला २७ दारूच्या गुत्त्याचें प्रमाण पडतें. मद्यपानाचा एवढा भयंकर प्रसार पाहून त्या शोचनीय स्थिती विषयीं फार दुःख वाटतें.

निजाम सरकारची निराळी टांकसाळ आहे त्यांतील कामाच्या खर्चाच्या मानानें उत्पन्न कमी असल्या मुळें टांकसाळीचा कारखाना चांगलासा चालत नाहीं. होळकर शाईतील व बडोदाशाईतील नाण्यांचा बाह्य मुलूखींही सरकारी व रेल्वे हीं दोन खातीं खेरीज करून इतर व्यापार धंद्यांत चलनी नाण्या प्रमाणें उपयोग करितात त्या प्रमाणें वऱ्हाड प्रांतांत हैद्राबादच्या चलनी नाण्यांचा उपयोग होऊं लागल्यास निजाम सरकारच्या टांकसाळेचें काम चालेल. गोंव्या कडील नाणीं सरकारी खजिन्यांत इंग्रजी नाण्या प्रमाणें चालतात. त्या प्रमाणें नेटिव संस्थानांतलि नाणीं इंग्रज सरकारनें कां मान्य करूं नयेत हें आम्हांस कळत नाहीं.

निजाम सरकारांत स्टांप कागद व त्या वरील किंमतीचें ठसे हैदराबादेस तयार करितात परंतु ते कागद चांगले सफाईचे व मोहरेदार नसतात व त्या वरील ठसे चांगले उमटत नसून स्टांप कागद उत्तम निघत नाहींत; म्हणून सर अस्मानजहा स्टांप कागद विलायतेहून तयार करवून मागविणार आहेत असें म्हणतात. ही गोष्ट घडून आली तर चांगली झाली असें आम्हांस वाटत नाहीं. रजिस्ट्रेशन खात्यांत काम फार ढिलाईनें चालतें तरी सुधारणा हळू हळू अमलांत येत आहे.

हैदराबाद संस्थानचें एकंदर उत्पन्न ४९५७७००० रु० आहे लार्ड रिपन साहेबांनीं निजाम सरकारास उपदेश केला होता त्या वेळीं वसूल जमाबंदी संबंधानें फार खबरदारी घेऊन खर्चाची रकम जमेच्या आंत राखण्या विषयीं निक्षून सांगितलें होतें. हैद्राबाद संस्थानाचें सन १८५३ सालीं दिवाळें निघालें होतें म्हणून इंग्रजी लष्कराच्या खर्चा साठीं व मागील थकलेल्या बाकीच्या फेडी साठीं वऱ्हाड प्रांत पन्नास लक्षांच्या उत्पन्ना ऐवजी इंग्रज सरकारास तंडूर दिला आहे. वऱ्हाड प्रांत परत मागण्याची ऐपत येण्यासाठीं निजाम सरकारनें आपल्या खजिन्याची नीट व्यवस्था ठेवावी म्हणजे मार्शानें गिळलेल्या माणिका प्रमाणें इंग्रजी अंमलानें रूळलेल्या वऱ्हाड प्रांताची प्राप्ती होण्या साठीं प्रयत्न करण्यास सुलभ पडेल. पब्लिक वर्कस् खातें, शाळा खातें, वगैरे सार्वजनिक खात्यांकडे हैदराबाद संस्थानचें चांगलें लक्ष पोंचलें आहे. स्थानिक स्वराज्याच्याही संस्था निजाम शाईत आहेत आणि त्यांची उत्तरोत्तर भरभराट होईल असें प्रस्तुतच्या त्या संस्थानांतील दोन मुन्सिपालिट्यांच्या सुयंत्र व सुरळीत व्यवस्थेवरून अनुमान करितां येतें.

---

एक चमत्कार वाटण्या सारखी गोष्ट अशी दिसून येते कीं इंडिया गव्हर्नमेंटनें प्रेसिडेंसी माजिस्ट्रेटच्या जागीं नेटिवांची नेमणूक करण्या विषयींच्या प्रश्नाचा विचार चालला आहे ह्मणून पार्लमेंटांत सांगावें आणि इकडे त्याच प्रश्नावर मुंबई सरकारानें बांम्बे प्रेसिडेन्सी असोशिएशनला अशा मतलबाचा जबाब द्यावा कीं प्रेसिडेंसी माजिस्ट्रेटच्या अधिकारावर नेटिवांना नेमण्या विषयीं इंडिया गव्हर्नमेंटचा आग्रहाचा व सर्व स्थळीं लागूं पडेल असा ठराव नाहीं. ज्याप्रकरणीं वरिष्ठ सरकारचा विचार कायमचा ठरावयाचा आहे त्या ठिकाणीं कनिष्ठ सरकारानें वरिष्ठाचा प्रतिकूळ ठरावाचा हुकूम आहे ह्मणून सांगावें. हाच प्रकारें मुंबईच्या प्रेसिडेन्सी माजिस्ट्रेटच्या जागीं लॉ प्रोफेसर बेव साहेब यांच्या नेमणुकी संबंधानें घडून आला आहे.

---

नेटिव संस्थानिकांचे अधिकार आकुंचित करण्या विषयीं सरकारचा पूर्ण मानस दिसतो. काठेवाडांत लहान मोठ्या संस्थानिकांनीं आपापल्या हद्दींतून मोठ्या खर्चानें रेल्वे सुरूं केली आहे त्या रेल्वे कडील पोलीस खातें त्या त्या राजवाड्यांच्या ताब्यांत न ठेवितां पोलिटिकल एजंटाच्या हाताखालील पोलीस सुपरिन्टेंडंटच्या हाताखालीं देण्या विषयीं घाटतें आहे. अगोदर नेटिव राजे ह्मणजे खरे राजे नसून राजांची प्रतिमा असतात. खप राजा प्रधान कायतो पोलिटिकल अधिकारी होय. नेटिव संस्थानांतील प्रजा ब्रिटिश प्रजेहूनही हक्कानें अगदीं नादान आहे. एका स्थानांत दोन सुऱ्या वागविण्या प्रमाणे त्यांना राजा व पोलिटिकल एजंट या उभयतांच्या आज्ञे प्रमाणें वागावें लागतें. आणि तशांत निव्वळ राजाची आज्ञा पाळली तर मणिपूरच्या प्रामाणिक व स्वामिभक्त चाकरा प्रमाणें फांशी जाण्याचा संभव असतो. असा वास्तविक प्रकार असूनही वरील प्रकारच्या घडामोडी चालू ठेविल्या ह्मणजे आमचीं संस्थानें खालसा करा अशी लोकांनां सरकार प्रत विज्ञप्ति करावी लागेल.

---

गेल्या चोविसावे तारखेस पुण्यास औद्योगिक परीषद् भरणार होती त्या समयीं निजाम सरकारच्या पदरचे कप्टन बोक्लार्क हे अध्यक्षस्थान स्वीकारणार होते. हे गृहस्थ खनिज शास्त्रवेत्ते आहेत असें म्हणतात.

---

## The Berar Samachar

MONDAY, JULY 27, 1891

The discussions in the House of Lords on the Manipur affairs are instructive in so far as they reveal to us the policy of the Govt. towards native states for more reasons than one. Two facts are now clear: first, the annexation of Manipur will not be effected; and secondly, the proceedings of the India govt. are not at all fair, and one blunder is committed to justify another blunder. Lord Ripon took a prominent part in the discussion. His recital of the whole history of Manipur was marked with dignified indignation and was highly impressive upon the minds of his he[illegible]
The question of annexation has [illegible]
posed of in a manner to dispel th[illegible]
and apprehension felt in a vast [illegible]
the native community of In[illegible]
the govt. was at fault no am[illegible]
ment will justify the measur[illegible]
tary court that sat to balance
of life and death of the Manip[illegible]

हु
ती या
सांगावयाचा
कळविण्य
माहे आ
र्जांची
लेखी
खो. तारीख १८ माहे जु
१०

V. N. Dandel
Civil Judg

वर्तमानसार.

is not indeed allowable for a paramount Govt. to extend its protection to native stat es to a certain degree and then to assume the hostile spirit of rival parties that are at daggers drawn with one another. By the end of the next week we shall be relieved of our suspence regarding the fate of the Senapati and the Jubraj pending the final decision of the Viceroy.

There were also some side-issues that were propounded in the House of Lords. Some sixty years before Lord Macaulay inaugurated a policy for Indian administration. It was to rule over India not at the point of the bayonet, but it was to assert supremacy on the ground of the voluntary subjection which the people yielded to secure peace and prosperity of a benign govt like the British rule. He strongly deprecated the principle to trade upon the weaknesses and short-comings of the subject races whilst he based the national glory of a vast dominion on the main support of education and consequent enlightenment of the conquered people. Let us compare with this general doctrine the recent assertion of the maintenance of the mediocrity of ability. Sir John Gorst betrayed himself when he expressed his inmost thought of securing a smooth and easy career. How ever alarming and ignoble it may appear, the declaration sounds to many a ear as just the mode of conduct realized in many decisive and imminent problems in regard to the Native States. If Macaulay did anger well for a prospect of national achievements let England redeem the promises which that great statesman has made in his policy and let her approach, after a lapse of more than half a century, a progressive path of national glory renounced in the history of mankind.

The next doubt was as to the meaning of the term Durbar. 'Durbar' was defined by some as a Police Court where a native king might be called upon to justify his previous conduct. If this interpretation be accepted on all hands Quinton was quite right to desire the Senapati to attend the Durbar and was perfectly justified in his proposal to arrest him there to be deported to some distant island like that of St. Helena. Certain similar arrests in the past were alluded to as a precedents to justify them in so defining the term Durbar. But wisdom prevailed and it was the general wish of the House to assert such opinions as will leave no ground to allow the lingering apprehension as to the meaning of the term Durbar.

---

✓ The life of a subject in a native state affords little chance of the safety of his purse and person. The trial at Manipur of those who took part in the measure of the English officers lays down a curious principle that the servants of native Rajas are responsible first to their master and then, including him also amongst them, they are to commend themselves to the good will of the political officer and his staff. It is practically safe and desirable that they should do so when both their king and the political agent live on terms of perfect amity and friendliness. But difficulty arises in a matter of conflicting orders. When the prince and the political officer are at cross purposes they do and undo the orders of each other: Whom are the state servants under such a state of things to obey? This has been no where definitely settled. Once for all the military court at Manipur solves the problem in a singular though objectionable manner.

In all good Governments the principle of discipline is summed up in a sho[rt] sentence: 'First obey the order and then complain.' So some Manipuris obeyed the Jubraj and the Senapati in [kil]ling Quinton and his comrades to [illegible] If the order be criminal the wh[ole] [guil]t should be narrowed down and level[led] at the princes. Still the state servants were responsible for acting up to any criminal order. But the order was not objectionable when hostilities were set on footing by Quinton with his regiment of 500 Gurkhas.

It is admittedly politic to regard a Sahib's life sacred and that one who lays hands on him should meet with the punishment of death. The awful English rule has established a high prestige and no native dares to look a Sahib in his face. But when matters come to such a pass as warranted the mutinous outbreak at Manipur it was useless to expect men to suffer themselves to be hemmed in in the prison of their own city. No one would question the wisdom of adopting a right measure to strike terror into the hearts of the enemies. But such a measure should not be divorced from justice. Justice demands to save the lives of those who obeyed the Jubraj and the Senapati as they stood bound to the service of the state in the times of common danger to the royal throne. It is besides legally allowable to kill another in self defence. The state-servants could not choose to have their heads cut off by doing against the wishes of their lord when the English army flashed their swords and fired their guns at them. The Manipur affairs have then taught this lesson that the Native kings are simple creatures of their political officers whom they must serve with their men and money to the last point. Even when the cups of their lives cannot hold a drop more they have no other help than to fall a prey to the enlightened tyranny of the 19th century.

---

Man is sometimes defined as a progressive animal. There is much in the definition that is worth noticing. To trace the history of human progress is to find out the chain of the causal links that distinguish the human family from the rest of the animal world. Man possesses in common with other animals the organic power of heridity. It is at work in all creatures. This power is the transmission of forces gathered up and focussed by the ancestry. A buffalo or wild horse that is stronger than its fellows or more sagacious becomes the leader. He is more likely to beget strong buffaloes or strong wild horses than is a week sire of the group or than a sire of only the average strength, activity, or sagacity. But with the human race strong as is the power of organic heredity the power of historic memory--the memory of the race is stronger still. One of the most powerful factors of progress resulting from the lever power of articulate speech was historic memory carried on by oral tradition at first, and afterwards by visual signs. This historic memory became another and a new lever of immense power. The experience of the entire race became the property of every individual. Owing to this distinguishing element the sweet freedom of nature's movement is set aside; the sins of the father are visited upon the children just as severely as the children are liberally rewarded for the father's virtue, This incalculable element in his toric memory might not be very great but owing to some peculiarity of the genus this is highly imperceptible. The play of environments has had a freer movement than with other creatures and heredity has lost its quality of inevitableness.

Man, says the editor of the Athenia-cum, is simply a gregarious animal highly developed by a series of circumstances over which he had only partial control. In many things the social economies in which he moves are superior to those of the bees and beavers but not in all. The royalties and aristocracies of other gregarious animals are entirely functional; and it is when we study the beautiful economies of an ant-hill that the absurdity of the civilized man becomes overwhelming in its humour.

---

Lieutenant Colonel H. C. Fox, R. E. Executive Engineer, Ist Grade, Hyderabad, is appointed to officiate as Superintending Engineer and Secretary to the Resident at Hyderabad in the Public Works Department, with effect from the 14th July 1891, during the absence on privilege leave of Mr. H. F. Storey, or until further orders.

G. of I.

---

## वऱ्हाड.

हवामान —आषाढी एकादशीपासून पाऊस एकसारखा पडतो आहे. मधून थोडा थोडा उवडतो परंतु जर आठ पंधरा दिवस उघडून चांगलें ऊन पडेल तर पिकें जोरानें येतील व जनावरांस चाराही होईल. दारव्याचा उपद्रव अगदीं कमी होत आला आहे परंतु पहिल्या पेक्षां मृत्यूचें प्रमाण जास्त आहे. काल त्या संबंधानें गांवची जत्रा काढली होती. आजपर्यंत एकंदर ३१७ लागले व त्यां पैकीं ११७ मेले.

---

येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत वे. रा. मोरशास्त्री पाटणकर नांवाचे चांगले पढीक व अनुभवशीर वैद्य मुंबईहून आले आहेत यांचा येथें बरेच दिवस राहण्याचा विचार आहे. यांजपाशीं हरएक प्रकारचीं चांगलीं खात्रीचीं औषधें आहेत तर लोकांनीं यांज पासून फायदा करून घेण्याची ही अमोलिक संधी साधावी.

---

"हें वाचा—मागें आमच्या पत्रांत बलभीम पाकाची जाहिरात प्रसिद्ध झाली आहे त्या पाकाच्या मागणी बद्दल ज्या आमचे वाचकांनीं मालकास पत्रें पाठविलीं असतील तीं त्यां । पोंचली नाहींत. या करितां लक्ष्मण अप्पाजी पुरंत धारवाड वृत्त आफिस, धारवाड या पत्त्यावर पुन्हा पत्रें रवाहावीत, म्हणजे मालक तावडतोब पाक पाठवितील"

---

अकोलें शहराकरितां पाण्याचा तलाव बांधण्याविषयीं हिंदुस्थान सरकारची मंजुरी मिळाली. या कामासाठीं सरकारानें म्युनिसिपालिटीस ९५०००० रु० ची देणगी दिली आहे.

---

पाळासिंग नांवाचा एक डाकेखोर वऱ्हाडच्या जेलांत होता त्यांस जुबिलीच्या वेळीं बंधमुक्त करण्यांत आलें होतें. नंतर तो निजामच्या हद्दींत जाऊन पूर्ववत डाके घालूं लागला. त्याच्या टोळींत बरेच बदमाश मिळाले होते. त्याला औरंगाबादेजवळ पकडण्यांत आलें व त्याचा एक साथीदार गोळी घालून मारण्यांत आला. पाळासिंग यास चौदा वर्षांचे ठेपेची शिक्षा झाली.

---

गेल्या ता० १८ रोजीं येथल्या जेलांत एक व उमरावती जेलांतून दोन कैदी पळाले उमरावतीचा एक पकडला गेला.

---

आत्महत्या—बडनेऱ्याहून एक माळी व त्याची बायको आपल्या नातलगांस भेटण्या करितां उमरावतीस गेली हे त्यांचे नातलग डा. लिटल पाशीं नोकर आहेत. तेथें एक दिवस राहून संध्याकाळीं बडनेऱ्यास येण्यास तीं नवरा बायको निघाली असतां बायकोनें बंगल्याचे काम्पाउण्डचे पश्चिमेस असणाऱ्या विहिरींत एकदम उडी घातली नवऱ्यानें तिला काढण्यासाठीं उडी टाकली, व दोघेंही बुडून मेले. आत्महत्येचें कारण कांहीं समजलें नाहीं. बहुत करून कांहीं तरी कुटुंब कलह कारण असावें.

---

मि. एच्. एफ स्टोरी हक्काचे रजेवर आहेत तों पर्यंत अगर दुसरा हुकूम येई पर्यंत लेफ्टनेन्ट कर्नल एच. सी. फाक्स. आर. ई फर्स्ट ग्रेड एक्सिक्युटिव्ह एन्जिनिअर हैद्राबाद हे सुपरिंटेंडेंट एन्जिनिअरचे व प. व. डिपार्टमेंटचें, रसिडेन्टचे सेक्रेटरीचें काम पाहतील.

---

नमुना नंबर १४२

## दिवाणी कोर्टास सूचना

अज्ञानाच्या माल मिळकतीच्या वहिवाटीचें सरटीफिकेट मिळण्याविषयीं अथवा आज्ञानाचें पालन व त्याचे माल मिळकतीचा कबजा करण्या लायक मनुष्य नेमण्याविषयीं सन १८५८ चा आक्ट ४० कलम ६ प्रमाणें अर्जींचा नंबर.

दि. कि. क्लास १३ मिसल नंबर ३/१८९१

स्पे० अ० कमिशनर साहेब जिल्हा अकोला यांचे कोर्टांत.

अर्जदार मलकार्जुन अ. पा. करणार मातोश्री इरू बाई मर्द जानापा, मुखत्यार लक्ष्मण आप्पा वल्द जानाप्पा जात वाणी राहणार अकोला.

वरील ( आज्ञान ) मलकार्जुन बापाचे नांव जानाप्पा जात वाणीं रहाणार अकोला. तालुके अकोला जिल्हे अकोला याचें पालन व माल मिळकतीचा कबजा करण्या लायक मनुष्य नेमला जावा म्हणून अर्ज दिला आहे यास्तव मृत्युपत्राचे आधारें किंवा दस्तऐवजा वरून किंवा अगदीं जवळचे नातलगपणाचे कारणावरून किंवा इतर प्रकारें ज्या कोणी मनुष्यास सदरहु आज्ञानाचे माल मिळकतीवर सांभाळकर्ता या नात्यानें कबजा करण्याचा हक्क सांगावयाचा असेल त्या सर्वांस या लेखानें कळविण्यांत येत आहे कीं, त्यांनीं तारीख १ माहे आगष्ट सन १८९१ इसवी रोजीं वरील अर्जाची चौकशी होणार आहे ते वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपापल्या हक्काची लेखी हकिकत दाखल करावी. तारीख १८ माहे जुलई सन १८९१ इ०

V. N. Dandekar
Civil Judge

---

## वर्तमानसार.

per annum in advance 5 Postage 13



पाटणाच्या आसपास सोन्याची खाण लागली आहे असें समजतें. सु. प.

मद्रास इलाख्याचा पाऊसपाण्याचा जो रिपोर्ट बाहेर पडला आहे त्यावरून सर्व इलाख्यांत दर वर्षाप्रमाणें यंदा पाऊस नाहीं. दुष्काळ निवारणार्थ सुरू केलेल्या कामावर १७५९८ लोक आहेत व या शिवाय २०९४ लोकांस सरकारा कडून शिजविलेलें अन्न देण्यांत येतें! दरवर्षी, मद्रास इलाख्यांत ओरड असतेच पण यंदा विशेष दिसते आहे. ईश्वरेच्छा बलीयसी.

मणीपुरास ९ पलटणें न ठेवतां १२ पलटणें ठेवावीं असें आतां ठरलें आहे.

लंडन येथें दुसरें विश्वविद्यालय लवकरच स्थापण्यांत येणार आहे.

न्यूयार्क येथील मि. स्टिफन अंडरसन नांवाचा एक लक्षाधीश मरण काळीं मृत्युपत्र स्वतः लिहिण्यास असमर्थ असल्यामुळें, त्याचेपुढें फानोग्राफचें ( जें यंत्र, त्यांत बोललेले शब्द जशाचे तसें वाटेल तेव्हां व लिहितें तें ) यंत्र आणिलें व त्यांत तो तें मृत्युपत्र बोलला. नंतर आठ दिवसांनीं वकिलाच्या व त्याच्या कुटुंबाचे देखत तें उघडिलें.

फ्रान्समधील कित्येक रेल्वेच्या कामदारांनीं या कामावर न जाण्याचा कट केला आहे असा कट केल्यामुळें त्या कामदारांचे ऐवजीं लष्करी खात्यांतील इंजिनियर लोकांस कामावर ठेवलें असून सर्व लायनीवर लष्करी लोक बंदोबस्तासाठीं नेमण्यांत आले आहेत.

न्युजेर्से नांवाच्या प्रांतांत सीब्राई नांवाचें शहर गेल्या १६ व्या तारखेस जळून खाक झालें. नुकसान सुमारें ३५,००,००० डालरचें झालें आहे असें ह्मणतात. या आगींत १ बाई व कित्येक मुलें जळून मेलीं. जिकडे तिकडे हाहाकार उडाला आहे.

रशियांतील ज्यू लोक बाह्य प्रदेशीं जाऊं लागल्यामुळें व्यापारास फार धक्का येईल असें ह्मणतात.

रशियांत दुष्काळपडण्याचें इतकें भयंकर चिन्ह दिसत आहे कीं, त्या प्रांतांतून बाह्य-प्रदेशीं धान्य जात नाहींच पण कदाचित् इतर ठिकाणचें धान्य अगोदर विकत घ्यावें लागेल कीं काय असें दिसत आहे.

एक नेटिव पत्रकर्ता ह्मणतो कीं, हिंदुस्थानांतील उष्णता अतिशय असल्यामुळें गोऱ्यांनीं आपला पोषाख बदलून नेटिवा प्रमाणें करावा, अन्न वगैरे नेटिवाप्रमाणेंच खावें. आणि आपलें आंग तेलानें चोपडून घ्यावें. ह्मणजे उष्णतेची वगैरे बाधा होणार नाहीं.

भावनगर येथें नुकताच जो २ इंच पाऊस पडला त्यावर अजून पाऊस नाहीं. भावनगर पासून वढवाण पर्यंत सर्व शेतें कोरडीं ठणठणीत पडलीं आहेत.

लोअर प्राव्हिन्स मधील जिल्ह्याच्या ठिकाणीं असलेल्या सर्व शाळा बंद करण्याचा बेंगाल सरकारचा हेतु आहे असें ह्मणतात.

अफगाणिस्थानच्या सरहद्दीवरील जांडोलचा उमराखान हा हल्लीं पुन्हा जोरावर आला असून त्याची खोडकी मोडण्याचे काबूलच्या अमिरानें ठरविलें आहे असें ह्मणतात. हा खान अमिरास सहसा हार जावयाचा नाहीं असें ह्मणतात.

संगमेश्वर तालुक्यांत मुचरी गांवीं वाघशेट शेटये नांवाचा एक ११४ वर्षें उमरीचा वाणी, व त्याच तालुक्यांत मौजे कोंड ओडरें येथें भिवा बापु मोरे या नांवाचा १०९ वर्षांचा मराठा असे हल्लीं हयात असून त्यांत ५११० कोस चालून जाण्यासारखी शक्ति आज आहे, असें तिकडील आमचा बातमीदार कळवितो ! !

सेंटपिटर्सबर्गची तार सांगते कीं, रशियांत प्रसिद्ध होणाऱ्या मास्को ग्याझेट नांवाच्या सरकारी कामदारांच्या मताच्या पत्रानें याच दिवशीं सकाळीं एक लेख प्रसिद्ध केला असून त्यांत तें पत्र इंग्लंडला असी धमकी देतें कीं, जर युरोपांतील राष्ट्रें एकत्र होऊन रशियाच्या विरुद्ध खटपट करूं लागतील तर हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्यास रशिया चांगलाच धक्का मारील. तसेंच हिंदुस्थानांत बंड उद्भवल्यास त्या बंडांत इंग्लंडचा जय किंवा पराजय होणें सर्वस्वी रशियाच्या वर्तणुकीवर अवलंबून राहील. हें या पत्राचें ह्मणणें आमच्या सरकारानें विचार करण्या सारखें आहे; तसेंच हिंदुस्थानचें दैव सर्वस्वी युरोपांतील हाल चालीवर अवलंबून आहे. हें ही या पत्राच्या ह्मणण्यावरून उघड होत आहे. जर्मन बादशहा हल्लीं विलायतेस गेला असून तेथें कांहीं राजकीय खटपटी चालू आहेत आणि त्या खटपटींत इंग्लंडनें आपलें अनुमोदन द्यावें अशा साठींच जर्मन बादशहा विलायतेस गेला आहे असेंही ह्मणतात. जर्मनीला इंग्लंड मिळाल्यास त्या दोघांचाही वंशपरंपरेनें शत्रू बनलेला फ्रान्स रशियाला मिळेल हें उघड आहे. तसेंच इंग्लंडनें युरोपांत चाळवाचाळव केल्यास इंग्लंडचें नाक दाबण्यास रशिया हिंदुस्थानावर येण्यास तयार आहेच. या सर्व राज्यक्रांती होण्यास युरोपांतील तीन बड्या राष्ट्रांचा जो एक नवा तह होणार आहे तो कारणीभूत होईल असें होतें. वरीलपत्राच्या दुसऱ्या गोष्टीबद्दल विचार करूं लागल्यास हिंदुस्थानांत बंड उत्पन्न झाल्यास रशिया, युरोपांत तो तह पूर्ण झाल्यास, बंडखोरांस मदत करील किंवा हिंदुस्थानांत बंड होण्यास रशियाच कारणीभूत होईल. असेंही विधान काढण्यास हरकत नाहीं. या सर्व गोष्टींचा हिंदुस्थान सरकारच्या काश्मीर, ब्रह्मदेश, मणीपूर वगैरे संस्थानाबरोबर होणाऱ्या वर्तनाशीं मेळ घातल्यास मनांत नानातऱ्हेचे तरंग उत्पन्न होतात. असो, कोणत्याही रीतीनें पाहूं लागल्यास हिंदुस्थानांत राज्यक्रांति होणें आम्हांस हितावह नाहीं ही गोष्ट निर्विवाद आहे. ठा. अ.

हिंदुस्थान सरकारानें अमदाबाद धोलेरा रेल्वे करण्याचा ठराव केला. इंडियन लाईट रेलवेज कंपनी लिमिटेड या कंपनी कडून बहुतेक ही रेल्वे होईल.

शिरोली पासुन हातोपाल पर्यंत ट्रामवे करण्याचा ठराव होऊन सेवें करण्यास परवानगी दिली ह्मणून समजतें. ही ट्रामवे बैलाकडून चालविली जाणार आहे आणि ही सदर्न मराठा लाइनला आणून मिळविणार आहेत.

पोर्तुगालचे राजे राज्य सोडणार.

ब्रिटिश आरमार १२५००० लोक ठेवून जास्त वाढविण्यांत आलें आहे.

एक सामाजिक सुधारणा—पहिली बायको असतां पुरुषांनीं मनास येईल तेव्हां दुसरी बायको किंवा बायका कराव्या. आणि तेणें करून पहिल्या स्त्रियांचा छल व्हावा, हा समाजरीतीला मोठा कलंक आहे. या करितां पुरुषांनीं याचा कांहीं तरी विचार करावा अशी विनंति आमदाबाद येथील खत्री जातीच्या स्त्रियांनीं तेथील हितेच्छु पत्रांत केली आहे. त्या विनंतीकडे लक्ष देऊन तेथच्या खत्री लोकांनीं आपली एक सभा भरविली. व ३५ वर्षांची स्त्री हांईपर्यंत पुरुषानें दुसरें लग्न करूं नये. केल्यास त्यानें रु० ५००० जातीस दंड द्यावा असा ठराव केल्याचें समजतें. ठराव योग्य रीतीनें अमलांत आला तर फार चांगला आहे.

आफ्रिका खंडांतील नेटल, ट्रान्स व्हाल वगैरे प्रांतांत व्यापार धंद्याचे संबधानें सुमारें ९० लक्षांहून जास्त हिंदुस्थानचे रहिवाशी गेल्या वीस वर्षांत जाऊन राहिले आहेत. त्या लोकांस रशिया जसा ज्यू लोकांस आपल्या राज्यांतून हाकलून देत आहे. त्याप्रमाणें तिकडून हाकलून लावण्याचा विचार तेथील अधिकाऱ्यांनीं व लोकांनीं चालविल्याच्या बातम्या ऐकण्यांत येऊं लागल्यामुळें व कांहीं लोकांस अमुक मुदतींत निघून जावें अशा प्रत्यक्ष नोटिसाही येऊं लागल्यामुळें महाराणी सरकारांनीं आपल्या या नेटिव प्रजेची दाद लवकर घ्यावी आणि त्यांचा आफ्रिकेंत जो व्यापार आटला आहे. त्याचें रक्षण होण्याचे उपाय करावेत. असा एक अर्ज मि. बद्रुद्दीन तयबजी, मि. सयानी वगैरे मुंबईंतील गृहस्थानीं मुंबई सरकारा मार्फत विलायतेस पाठविला आहे.

चमत्कार—कलादगी येथील रत्नाकर पत्रांत पुढील चमत्कारिक हकिकत आली आहे. सुपा तालुक्या पैकीं मुल्लावणी या गांवीं एका सावकाराची कन्या आपल्या घरीं मुलीबरोबर खेळत असतां एकाएकी नाहींशीं झाली. शोध करतांना असें समजतें कीं, प्रातःकाळीं तिचा करुणास्वर एका जवळ असलेल्या डोंगरांतून ऐकूं येतो. पण मुलगी सांपडत नाहीं. रडूं लागली ह्मणजे मोठा घंटा नाद होऊं लागतो. त्यामुळें तिचें रडणें ऐकूं येत नाहीं हें काय असावें बरें? मागें तेथें याच प्रमाणें एक लातारा मनुष्य नाहींसा झाला होता. त्यावेळीं बळी वगैरे अर्पण केल्या मुळें तो सांपडला. हल्लीं त्या मुलीचा शोध लावून देणारांस १००० रुपये बक्षीस देण्यांत येतील. असें त्या मुलीच्या बापानें प्रसिद्ध केलें आहे.

नापिकांचा कट—श्रीरंगपट्टण येथील देवालयांत न्हाव्यांनीं येऊं नये असा तेथील ब्राह्मणांनीं ठराव केल्यामुळें सर्व न्हाव्यांनीं कट करून त्यांच्या हजामती न करण्याचा निश्चय केला आहे.

एशिया खंडापेक्षां युरोपखंडांत कुत्र्यांची चहा फार असते ही सर्वत्रांस महशूर असणारी गोष्ट होय. फ्रांन्स, जर्मनी, इटाली, आस्त्रिया, बसेनिया, हर्जेगोविनिया इत्यादि देशांत लढाईच्या उपयोगीं पडण्या करितां कुत्रीं पाळलीं जात आहेत. आणि त्यांचा त्या देशांत फार चांगला उपयोग होतो, अशी प्रसिद्धी आहे; परंतु कुत्र्यांचें शहाणपणाचा उपयोग जर्मनीनें फार चांगल्या रीतीनें करून घेतल्याचें दिसतें. जर्मन फौजेंत बरींच कुत्रीं बाळगलेलीं आहेत, त्यांचें मुख्य काम लढाईंत घायाळ होऊन पडलेल्या वीरांचा पत्ता लावून देणें हें आहे. त्या कुत्र्यांस ते लोक नेहमीं शिकवून तयार करीत असतात. शिक्षण पद्धत मोठ्या गमतीची असते; फौजेंतील कांहीं लोक आड रानांत जाऊन दडून रहातात, झाडझुडपाचे खालीं पालथें पडून राहतात; त्यांस बिलकुल हालचाल करण्याची परवानगी नसते. इतकी तयारी झाली ह्मणजे फौजेंतील कुत्र्यांस मोकळीं सोडतात, तेव्हां तीं छपून राहिलेल्या मनुष्यांच्या शोधार्थ आड रानांत हिंडतात. एखादा छपून राहिलेला मनुष्य सांपडल्या बरोबर त्याच्या पाठीवर आपले पायाचे पुढचे दोन पंजे ठेवून भुंकूं लागतात. तें ऐकून फौजेंतील भोई लोक त्या ठिकाणीं जातात आणि त्या मनुष्यास उचलून नेतात. तोंपर्यंत कुत्र्यांचे भुंकणें सुरू रहातें. या पडलेल्या मनुष्यास उचलून नेल्या बरोबर कुत्रा दुसऱ्या मनुष्याचा शोध लावण्या करितां चालता होतो. प्रत्येक प्रत्येक फौजेच्या कंपनींत अशा प्रकारच्या एकेक डझन कुत्र्यांची नेमणूक झालेली आहे. मनुष्य जनावरांचा उपयोग कसा कोणत्या रीतीनें करून घेईल हें सांगवत नाहीं. न्या० सिं०

काळेंमोतीं—थोड्या दिवसां पूर्वीं लंकेच्या समुद्रांतून सरकारानें मोतीं काढविलीं, त्यांत एक काळें मोतीं सांपडलें होतें तें कारोलीस नांवाच्या व्यापाऱ्यानें विकत घेतलें होतें तें त्यानें ५००० रुपयांस विकलें यावरून काळ्या मोत्यास किती किंमत पडते हें सहज दिसेल. काळें मोतीं फार क्वचित सांपडतें व तें फार तेजःपुंज असतें. न्या० सिं०

कणीक —गतवर्षीं मुंबईहून १४० लाख मण कणीक विलायतेस पाठविण्यांत आली. इकडून गहूं पाठविण्यापेक्षां कणीक पाठविण्यांत इंग्रजी व्यापाऱ्यांस फायदा फार मिळतो.

गव्हांची निर्गत—गेल्या एप्रिल व मे ह्या दोन महिन्यांत मुंबई बंदरांतून ग्रेटब्रिटनास १०४ लक्षांचे बेलजमास ४० लक्षांचे आणि फ्रान्सास ८३ लक्षांचे गहुं रवाना झाले.

—रशियांत धान्याचा पुरवठा पुढच्या सालीं करितां येणार नाहीं ह्मणून त्यांना धान्य बरेंच विकत घ्यावें लागेल असें समजतें.

## जाहिरात.

एलिचपूर येथें होणारा सर्व प्रकारचा माल कोणास पाहिजे असल्यास आह्मांस कळवावें. माफक कमिशन घेऊन पाठवीत जाऊं. विशेष माहिती करितां टिकीट पाठवा.

जी. डी. कावेटकर

मर्चंट आणि कमिशनर एजंट

शहर एलिचपूर

☞ हें पत्र अकोला येथें के० बा० खरे अशा आणि बा राव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण छापून प्रसिद्ध केलें.

वरून कोणी लक्ष त्याकडे विशेष ये ह्मणून आमच त्यांना जरू : ) कों रांत ण्यास त्या देश सें मल सा प्रमाणेंच मला वागतां आलें नसतें. राजा लछमनसिंग व कुवर झोरासिं